★ कथासंग्रह

# चांदण्याचा पाऊस !

लेखक
ॲड. यशवंत बाबुराव कदम
(नमनेश्वर)

कथासंग्रह

# चांदण्याचा पाऊस !

लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

a

चांदण्याचा पाऊस कथासंग्रह

**Chandnyacha Paus /Kathasangrah**

पहिली आवृत्ती : ११ फ़ेब्रुवारी २०२४

लेखक :

ॲड. यशवंत बाबुराव कदम

बी-1101, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई 400 066.
भ्रमणध्वनी : 9892046868/9619360661

**E-mail : ybkadam14@gmail.com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

a


# ई प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

मुखपृष्ठ व अक्षरजुळणी : राजेश शेलार

राज ग्राफिक्स, चिपळूण 415605.

मोबाईल : 9049982038

मुद्रक :

मूल्य रु. 160/- (छापिल पुस्तक)



©esahity Pratishthan®2024

ई पुस्तक विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

“चांदण्यांचा पाऊस” या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा...

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# अल्पपरिचय

ॲड. यशवंत बाबुराव कदम

बी.ए., एल.एल.बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

जन्मतारीख : 14 ऑगस्ट 1948

मूळगांव : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

प्राथमिक शिक्षण : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

महाविद्यालयीन शिक्षण : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

नोकरी : आयकर खाते (मुंबई) येथून वरिष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त

सध्या - मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग

काव्यमंच, मुंबई

कोकण मराठी साहित्य परिषद

मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई

लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

a

1. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय 1975
2. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह 2008
3. जीवनगाणे (काव्यसंग्रह) 5 जून 2010
4. अंतरंगत (काव्यसंग्रह) 28 फेब्रुवारी 2010
5. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह 2011
6. जय दुर्गे (आरती संग्रह) 2011
7. भक्तिरंग (काव्यसंग्रह) 2012
8. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) 11 जानेवारी 2013
9. तांडव (चरित्र) 11 जानेवारी 2013
10. जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
11. श्री कुलस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, 8 मे 2013
12. बोलके झाड (कथासंग्रह) मार्च 2016
13. महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च 2016
14. दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल 2016)
15. आकाशाचे पंख (कथा संग्रह) 18 फेब्रुवारी 2017
16. अंतरीचा दीप (अभंगगाथा) 12 एप्रिल 2018
17. गडगीचा डोह (कथासंग्रह) 20 मे 2018

a

18. देव माणूस (व्यक्तिचित्र) मे 2018

19. लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च 2019)

20. हरिपाठ चिंतन (मार्च 2019)

21. वळणावळणाची वाट (कादंबरी) 16 डिसेंबर 2022

22. मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

23. गरुडझेप (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

24. ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

25. लंडनचा किनारा (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

26. आडवळणाची वाट (कथासंग्रह) 16 डिसेंबर 2022

27. चांदण्याचा पाऊस (कथासंग्रह) 1 जानेवारी 2024

आगामी पुस्तके : मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)

शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)

क्षितीजा पलीकडच्या प्रवासात

(मराठी काव्यसंग्रह)

आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ - एक अभ्यास

(ज्ञानदेव आणि तुकाराम)

a

नक्षत्रांच्या सहवासात (व्यक्तिचित्र)

आठवणींचा पेटारा (चरित्र)

गोंधण (ललितलेख)

गुडघ्याला बाशिंग (एकांकिका)

| | | |
|---|---|---|
| पुरस्कार | : | “जीवन गौरव पुरस्कार” - वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल.<br>लोटिस्माचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार 2018<br>बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार 2018<br>कोकण मराठी साहित्य परिषदेचा “गडगीचा डोह” या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, 2018. |

# अर्पणपत्रिका

माझे प्रिय कुटूंबिय सौ. सुजाता, डॉ. नितीन,

सौ. शितल, सौ. शलाका, कु. सोनिया, कु रोहित.

यांना प्रेमपूर्वक अर्पण करीत आहे.

लेखक

**अॅड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेश्वर)

a

# माझे दोन शब्द

आजवरच्या माझ्या सव्वीस पुस्तकांमध्ये ‘आठ’ कथासंग्रह, तीन चरित्र, एक ‘संशोधित’ पुस्तक आणि उर्वरित वैचारिक लिखाणाचा समावेश आहे. शिवाय एक कादंबरीचा समावेश आहे.

यातील सहा पुस्तके ‘साहित्य प्रतिष्ठान’ या साईटवर सध्या प्रकाशित झाले. त्यामध्ये पाच कथासंग्रह व एक कादंबरीचा समावेश आहे. त्यामध्ये लंडनचा किनारा, उन पावसाचा खेळ, आडवळणाची वाट, गरूडझेप, मावळतीच्या सावल्या आणि वळणावळणाची वाट, ही कादंबरी याचा समावेश आहे.

आता अजून कथासंग्रहाचा समावेश साहित्य प्रतिष्ठानच्या साहित्यात होत आहे. चांदण्याचा पाऊस आणि या कथासंग्रहाचा समावेश होत आहे. याचा समावेश होत आहे.

हे कथासंग्रह मी माझ्या गावात राहूनच लिहिले. समाजाच्या वैगुण्यावर प्रकाश टाकणाऱ्या समाज प्रबोधनाच्या या कथा आहेत. आपण स्थिर असलोना आणि नजर सभोवताली फिरवली तर अनेक कथांची सुत्रे लेखकाच्या नजरेसमोर येतात. त्यात काही वास्तववादी, काल्पनिक, असतात त्या त्यातील माझ्या कोकणच्या पार्श्वभूमीचा आधार घेत शब्दबद्ध होत जातात आणि त्या कथा साकार होतात.

तसे पाहिले तर येथे गावात तालुक्याच्या ठिकाणापासून 8/9

किलोमीटरवर वसलेले एक छोटेसे हिलस्टेशन, त्यातला आल्हाददायक निसर्ग, विविधरंगी स्वभावाची माणसे कथा लिहिताना काठावर जमा होतात आणि कथेच्या प्रवाहात कधी समाविष्ट होतात हे तो पांडूरंगच जाणे, यात माणसांचे स्वभाव, त्यांचे भावविश्व, कोकणातली घरे स्वभावातला गोडवा, कधी कधी कडवटपणा ही आपल्या अनुभवाला येतो.

येथे गावात येऊन पाच वर्षाचा काळ कधी कसा भुर्रकन निघून गेला हे कळतच नाही.

मुळात कोकणातला माणूस सोशिक, अर्ध्या भाकरीवर समाधान मानणारा. पण स्वाभिमानी, सुस्वभावी, शेजारधर्माची कदर करणारा, पण न विकला जाणारा, त्याचे चित्रण आजवरच्या अनेक बुजुर्ग साहित्यिकांनी आपल्या साहित्यात, कथात मांडले. याचा विचार खरेतर आमच्या पिढीला जमला की नाही, माहीत नाही. काही स्वभावाच्या पैलुचा उल्लेख झाला असेल पण आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात हे बदल होत आहेत पण, कितपत जमले वाचकच जाणोत. अजून खूप पल्ला उरलेल्या आयुष्यात जमेल तेवढे प्रवाहीत व्हावेत हीच अपेक्षा.

कोकणातला निसर्ग अप्रतिम सुंदर, पिऊन घेतला तरी अजून मन नाही शांत झाले. डोळयात भरून ओसंडून वहावा असे वाटते. इथल्या नात्यांचा पीळ औरच. थोडी फाटाफूट झाली पण सणासुदीला कोकणवासियांच्या झुंडीच्या झुंडी येताना पाहिल्या की, कोकणचा जिवंतपणा जाणवतो. घरोघर चाकरमानी येतात. गोड-धोड होते. खूप मजा येते. कोकणातल्या मुंबईच्या सिमेपर्यंत म्हणजे गोव्यापासून सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड येथील संस्कृतीत थोडा फरक आहे. भाषेत देव-देवतांच्या पूजेत, पण एकजीवपणा आहे हे मात्र खरे.

आमच्या मधूभाईंच्या कथांचा कणाच कोकणच्या संस्कृतीचा, चाली-रितीचा, भाषेचा, पण म्हणून काही मराठीपण सोडले नाही. उलट ते अधिक गडद होत गेले. स्वभावातले बारकावे, सारी श्रीमंती भाईंनी आपल्या कथात ओतून मराठी भाषा समृध्द केली. त्यात कोकणाची प्रादेशिक श्रीमंती वाचायला मिळते. ना. सी फडकेंपासून भाईंपर्यंतचे चित्र आणि त्याच्या पुढच्या पिढीचे लिहिणे यात फरक तर आहेच.

को.म.सा.प. ची स्थापना झाली आणि या भूमीतल्या नव्या पारंब्यांना सशक्त कोंब फुटले. हिरवीगार पालवी आली. अख्ख कोकण शहारल. काय सांगू

या कथासंग्रहात कथांचा समावेश आहे. आता हे पहा मुस तीच म्हटल्यावर, तशीच निर्मीती होणार ना. पण नवा मोड येईल यात खात्री बाळगा.

हा नवा 'चांदण्याचा पाऊस' या कथा संग्रहातून पाहूया काही नवे घडते काय?

हा कथासंग्रह ई-साहित्य प्रतिष्ठानवरचे + माझे सातवे पुस्तक आणि एकूण सत्ताविसावे. अजून एका कथासंग्रहाची तयारी चालू आहे. पाहुया.

या पुस्तकाचे डीटीपी चिपळूणच्या राज ग्राफिक्समध्ये झाले आणि मुखपृष्ठ आमचे मित्र राजेश शेलार यांनी केले आहे.

या पुस्तकाला प्रस्तावना माझ्या कोकण मराठी साहित्य परिषदेतील सहाअध्यायी कवीयत्री, कथाकार, समिक्षक प्रा. प्रतिभा सराफ यांची लाभली आहे. त्यांचा मी आभारी आहे. त्यांच्या उपकारांचे ओझे मला अधिक स्फूर्ती देईल.

ही 'चांदण्याचा पाऊस' माझ्या वाचकांच्या मनाला नवनव्या

आशावादाचे बाळकडू देईल अशी आशा करतो.

हे पुस्तक प्रकाशनाचे सगळे श्रेय ई-साहित्य प्रतिष्ठानचे श्री. सुनील सामंत यांचे आहे. त्यांचा मी आभारी आहे.

जगभरातील माझ्या वाचकांना हा कथासंग्रह आवडेल यात शंका नाही.

आता थांबतो. धन्यवाद.

**- ॲड. यशवंत बाबुराव कदम**

# प्रस्तावना

लेखकांनी अनुभवलेला माणसातला चांदण्यांचा पाऊस जवळजवळ सत्तावीस  पुस्तकांचा अनुभव पाठीशी असणारे सिद्धहस्त लेखक ॲड. यशवंत कदम यांचा ’चांदण्यांचा पाऊस’ हा नववा कथासंग्रह आहे. दरम्यान आयुष्यातील निसर्गातील अनेक पावसाळयांचा आणि चांदण्यांचा अनुभव त्यांच्या पाठीशी जसा आहे तसा माणसांचाही आहे. कारण गेले चाळीस वर्ष ते आसपासच्या माणसांना अभ्यासून, अनुभवून सातत्याने विविध प्रकारचे लेखन करीत आहेत आणि त्यांचा हात आजही लिहिता आहे!

एकंदरीत सोळा कथांचा ‘चांदण्याचा पाऊस’ या कथासंग्रहात समावेश केलेला आहे. ‘तोडगा’, ‘दैवगती’, ‘त्याग’, ‘धुमशान’, ‘पडताळा’ अशी काही कथांची शीर्षके आहेत.

‘चांद्रयान मोहिमे’मुळे भारताची मान उंचावली. या मोहिमेचे पडसाद जगभर उमटले. लेखक हा शेवटी समाजाचा आरसाच असतो. त्याच्याही कथांमध्ये हे पडसाद उमटणे स्वाभाविकच आहे. तर ‘चांदण्यांचा पाऊस’ या पहिल्याच कथेत लेखकाने चांद्रयानाविषयीची सरळ माहिती न देता ‘शशांक’ या शाळेतील सोबती असलेल्या मित्राची कथा येथे रंगवली आहे. शशांक इस्त्रोच्या चेअरमनच्या बाजूला बसलेला दिसला तेव्हा नेमके काय वाटले आणि मग बॅकग्राऊंडमध्ये तो तिथपर्यंत कसा पोहोचला, शाळेपासून त्याची मानसिकता, अभ्यास करण्याची वृत्ती, कोणती पूर्वतयारी त्याने इथपर्यंत पोहोचण्यासाठी केली होती... यावर या कथेतून प्रकाश टाकला आहे.

(कथा: चांदण्याचा पाऊस)

‘आशा’ नावाच्या उच्चशिक्षित मुलीला ‘शंभू’ नावाचा मुलगा, लग्नाची पत्रिका छापून झाल्यावर लग्नासाठी नकार कळवतो तेव्हा आशा खंबीरपणे हे प्रकरण हाताळत त्याच हॉलमध्ये, त्याच मुहूर्तावर ‘राज’ नावाच्या राजबिंड्या तसेच इस्त्रोमध्ये संशोधक असलेल्या मुलाशी लग्न करते आणि शंभू पश्चातापाच्या अग्नीत होरपळतो. लग्नाच्या बाबतीत इतरही काही घटनांची उदाहरणे देत लग्न हा ‘पोरखेळ’ नसल्याचे लेखकाने दाखवून दिले आहे. या कथेची मध्यवर्ती कल्पना देणारे एक वाक्य उद्विग्न करते- “दैवाच्या फेऱ्यानेही तिच्या हिमती पुढे हार खाल्ली होती.” (पृष्ठ:65) (कथा: पोरखेळ)

सुनंदासारख्या निष्पाप जीवाचे रक्षण नेमके कसे होते आणि अशा अनेक कोवळया, निष्पाप जीवांचे रक्षण कसे महत्त्वाचे आहे हे ‘सतर्कता’ या कथेत आहे. ‘नमू’ ही मुलगी एका संस्थेला आपला पहिला पूर्ण पगार देते कारण या संस्थेने तिला दिलेली स्फूर्ती तिला घडवण्यासाठी मौल्यवान होती, याविषयीची कृतज्ञतेची भावना ती मनात बाळगून होती. (कथा: स्वप्नपूर्तीचे यशोगाथा)

एकंदरीतच या संग्रहातील बहुतांश कथा सकारात्मक आहेत आणि कोणतातरी संदेश देणाऱ्या आहेत. आठवणीतल्या पेटाऱ्याचे पहिले पर्व शब्दात बांधून (पृष्ठ 95), ते मनोहर जगणे मनाला उभारी देते. (पृष्ठ: 30)

“शंकरच्या मनातला गाव साकार झाला होता.” (पृष्ठ 72)

अशी कितीतरी चमकदार वाक्य या कथांमध्ये सहजपणे आलेली आहेत. समाजातील चुकीचे पायंडे, रुढी-परंपराचे जोखड बाळगत चुकीचे

वागण्याची अनेक उदाहरणे आपल्या कथांमधून देत लेखकाने या सगळ्याचा त्याग करण्याची आता गरज आहे, हे दाखवून दिले आहे. दुसऱ्यांच्या भावभावनांचा आदर करण्याची आणि प्रत्येक गोष्टीचा खोल विचार करण्याची गरज आहे, हेही लेखकाने आपल्या कथांमधून दाखवून दिले आहे. या कथा तरुण वर्गाला घडवण्याचे तसेच वयस्करांना तरुणांना समजून घेण्याचेही मार्गदर्शन करतात.

ॲड यशवंत कदम लिखित 'चांदण्यांचा पाऊस' या कथासंग्रहात उत्तम संवाद आहेत. गावात घडणाऱ्या घटना, गावातील माणसांची मानसिकता, नैतिकता-अनैतिकता, आर्थिक व्यवहार, तडजोड, शिक्षणाचे महत्त्व, अवयवदानाचे महत्त्व, राजकारण-समाजकारण-कौटुंबिक कलह याचा माणसाच्या मनावर होणारा परिणाम, आजच्या काळातील माणसाचे तुटलेपण या सर्वांचा उहापोह या कथांमधून केला आहे.

प्रादेशिक संस्कृतीची बीजे अचूकपणे अधोरेखित करून "परिवर्तन हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे" त्याला स्वीकारण्याचा अप्रत्यक्ष संदेश या कथांमधून आपल्याला लेखकाने दिला आहे. या कथा जितक्या मनोरंजक आहेत तितक्याच वैचारिक प्रगल्भतेकडे नेणाऱ्या आहेत म्हणूनच सुज्ञ रसिक वाचक 'चांदण्यांचा पाऊस' या कथासंग्रहाचे स्वागत करतील!

**- प्रा. प्रतिभा सराफ**

(ज्येष्ठ साहित्यिक)

a

# अनुक्रमणिका


1. चांदण्याचा पाऊस
2. आर या पार
3. साती आसरा
4. तोडगा
5. पोरखेळ
6. पूण्यकर्म
7. दैवगती
8. स्वप्नातलं गांव
9. मसिहां
10. त्याग
11. स्विकार
12. सतर्कता
13. आठवणींचा पेटारा
14. धूमशान
15. पडताळा
16. परीक्षा जीवनादानाची
17. स्वप्नपूर्तीची यशोगाथा

a

# चांदण्याचा पाऊस !

सारे जग आज अति उल्हासाने, आदराने भारताच्या इस्रोच्या चंद्रयान, सूर्याचा वेध या मोहिमांकडे व त्याच्या एकंदर संशोधनातून उलगडत जाण्याच्या अत्युच्च कामगिरीची स्तुती करते आहे. नवनवे आयाम जगाच्या या क्षेत्रातील काम करणाऱ्या संस्थांना यातून उपलब्ध होणार आहे. त्यांना अधिक स्फूर्ती मिळणार आहे. साऱ्या जगातील संशोधक, शास्त्रज्ञ मोठ्या आशेने त्याकडे नजर लावून आहेत आणि इस्रोच्या या कामगिरीचे कौतुक संपूर्ण जग करीत आहे. यामुळे याक्षेत्राकडे भारतातील सगळया आबालवृध्दांची नजर लागली आहे. चंद्राचा पौर्णिमेचा प्रकाशच आम्हाला माहिती होता, पण आता अमावस्येच्या काळातही आदराने चंद्राकडे पाहत आहेत. कोट्यावधी भारतीय चंद्राच्या प्रकाशाचा आनंद लुटत आहेत. चंद्राबद्दलचे प्रेम, आदर, जवळीक याकडे या पृथ्वीतलावरचा माणूस आशाळभूतपणे पाहतो आहे. त्याच्यावरून येणाऱ्या नव-नव्या माहितीचा आस्वाद जग घेत आहे. जसा ऊन, पावसाचा आस्वाद आपण घेतो तसा.

आमच्या शाळेतला एक मुलगा ‘शशांक’ ज्याला आम्ही त्याकाळात वेड्यात काढीत होतो. तो काहींकाही बडबडायचा, कळत नव्हते आम्हाला त्यातली काही पण परवा जेव्हा आम्ही त्याला. टि.व्ही.वर इस्रोच्या शास्त्रज्ञांच्या गर्दीत पाहिला तेव्हा सगळा भूतकाळ उभा राहिला डोळयासमोर, अरे हा

शशांक, हा कसा पोहोचला इस्रोत ? आम्ही मात्र कारकूनी करीत अख्खी 40 वर्षाची सर्व्हीस करून निवृत्त झालो.

त्याचा मोठा भाऊ इंजिनियअर होता. यू.एस.ए. मध्ये तो काही पुस्तके, मॅगझिन शशांकला पाठवायचा. तो दाखवायचा आम्हाला त्यात चंद्र, पृथ्वी, ग्रह व त्यावर जाणाऱ्या यानाचे फोटो असत असंख्य. तो आवडीने पाहायचा. आम्हाला त्यात काही स्वारस्य नव्हते. पण त्या बद्दल तो मात्र वेड्यासारखा म्हणायचा मला येथे जायचे आहे. मी जाणार अमेरिकेत. होणार इंजिनियर, सायंटिस्ट माझ्या भावासारखा. अभिजित हा त्याचा मोठा भाऊ. तो त्यावेळी अमेरिकेत होता. सहाजिकच त्याला ते शक्य झाले असणार. मानलिया ! भाऊ मानलिया ! त्यादिवशी मोदींनी त्याचे खास अभिनंदन केले. आमच्या डोळयावर विश्वास बसेना. क्षणभर मी डोळे बंद केले. त्यावेळचा शाळेचा परिसर, तो, माझे इतर मित्र सारे साकार झाले नजरेसमोर. मी पूर्णपणे भूतकाळात हरवून गेलो होतो. आणि मुखातून शब्द उमटले ‘शशांक’ ! धन्य तुझी, तुझ्या इच्छाशक्तीची. तुझ्याकडून अजून चांगल्या संशोधनाची अपेक्षा आहे ! तुझे अभिनंदन !

त्याला कारणही असे झाले. आमचे त्यावेळचे हेडमास्तर टीपणीस सर यांचा मुलगा इंजिनियरींगची एम.एस. डीग्री घेऊन भारतात आला आणि एक दिवस आमच्या शाळेत 9 वी. ते 11 वी. च्या विद्यार्थ्यांसाठी एक सेमिनार घेण्यात आला. त्यात आम्ही दहावीची सगळी मुले आलो होतो. तो जे काही त्याच्या भाषणात सांगत होता ते सगळे आमच्या डोक्यावरून जात होते. पण

शशांकचा चेहरा पार उजळला होता. त्याला सारे समजत होते. त्यांचे व्याख्यान संपले आणि शशांक उभा राहिला....

“सर! माझ्या काही शंका आहेत. मी आपणास काही प्रश्न विचारू का?” शशांक

“हो! का नाही?” टिपणीस सर

आणि शशांकने प्रश्नांचा भडीमारच सुरू केला. अनेक प्रश्न त्याने विचारले. अणूपासून-परमाणूपर्यंत, नासाबद्दल, अंतरिक्ष यानासंदर्भात, रॉकेटबद्दल, चंद्रासंबंधी, आकाशातील ग्रह-ताऱ्यासंबंधी. टिपणीस सरांना आनंद झाला. त्यांनी शशांकच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे दिली. खूप आनंद झाला त्यांना. त्यांनी शशांकला जवळ बोलाविले.

“शाब्बास बेटा! तू मोठा सायंटिस्ट होशील. तू अमेरिकेत जा. ज्ञान मिळव आणि आपल्या देशासाठी त्याचा वापर कर ! प्रॉमिस?” टिपणीस सर

“होय सर तीच माझी मनीषा आहे. जे जे काही ज्ञान मिळेल त्याचा वापर आपल्या देशाच्या विविध कामासाठी मी येथे येऊन करीन !” शशांक

असे म्हणत त्याने टिपणीस सरांना नमस्कार केला. टिपणीसांनी आपला किमती पेन त्याला बक्षिस दिला.

आणि आज जेव्हा मी शशांकला इस्रोच्या चेअरमनच्या बाजूला बसलेला पाहिला, माझा ऊर भरून आला. तो आमच्या शाळेचा विद्यार्थी आहे आणि माझा बॅचमेट याचा मला सार्थ अभिमान वाटला.

a

आता जेव्हा माझी नजर चंद्राकडे जाते तेव्हा त्याच्या प्रत्येक किरणात मला शशांकचा चेहरा दिसतो. ध्येयाने पेटलेला. काहीतरी भव्यदिव्य करण्यासाठी

परवा माझी नात सोनिया बी.ई. करून एम.एस. करायला अमेरिकेत गेली तीही अशीच ध्येयाने पेटलेली आणि अनेकवेळा बोलायची मला इस्रोमध्ये काम करायचे आहे. ती यू.एस. ला गेली त्याच दिवशी चंद्रयान चंद्रावर उतरले हा योगायोग नव्हे काय?

खरे सांगू , अशी अनेक मुले ध्येयाने पेटून आपले उद्दीष्ट सफल करतील. चंद्राच्या पृष्ठभागावरील पृथ्वीवर येणाऱ्या किरणाच्या प्रकाशात असे  हजारो संशोधक निर्माण होतील.

चंद्रयानामुळे पृथ्वीवर येणाऱ्या चंद्राच्या नवनव्या माहितीच्या प्रकाशाचा ‘पाऊस’ असाच पडत राहो हीच अपेक्षा, जेव्हा आमच्या पिढीतील लोक मावळतीकडे जात असताना करायला हवा. असे वाटणे सहाजिकच आहे की नाही!!

चंद्रावरून येणाऱ्या नवनव्या बातम्याने मन उल्हासीत होत आहे. हा नव्या मनुचा अवतार मानवी जीवनाला नव्या दिशा देणारा आहे हे तर खरंच पण नव्या आयामातून बरेच काही जगाच्या नव्या पिढीला शिकता येईल हेही खरे.

हा चांदण्यांचा पाऊस संशोधनाची झेप कोठपर्यंत घेऊन जाईल याचा काहीच अंदाज करता येत नाही. पण जगभरातील आशावादाने पेटलेली

a

आजची जगातील संशोधक शास्त्रज्ञ मंडळी कोठवर मजल मारेल हेच आता पहायचे आहे.

आता यातून खरोखर या विश्वाच्या उगमापर्यंत जाता येईल का, कारण आजवर याबाबत झालेल्या संशोधनात अनेक मोलाची भर घालता येईल.

हा चंद्रावरून येणारा आशावादाचा पाऊस मानवी जीवनाला अधिक सुंदर बनवील. हे स्वप्न उराशी बाळगुन आजची पिढी जगत आहे. प्रकाशातून येणारे आशेचे किरण हे जग सुजलाम सुफलाम करील यात शंका नाही.

इस्त्रोने तर आता नवनव्या आयामांना गवसणी घालण्यासाठी चंद्रावर मानव पाठवण्याची योजना आखलीय व तत्पूर्वी सूर्याच्या दिशेने एक अंतराळ यान सोडून त्याच्या अंतरंगाचा भेद करण्याची योजना आखली आहे. आहे की नाही कमाल.

हि "सारे जहाँ से अच्छा" अशा आमच्या वसुंधरेला अधिक सुंदर बनविल यात शंका नाही.

आणि आम्हीही या चांदण्याच्या पावसात इथेच डूंबत राहू!!

|||||

# आर या पार

बारा वर्षांचा काळ म्हणजे एक तपाहून अधिक काळ भूतकाळाच्या काळया कुट्ट अंधारात गडप कधी झाला हे फक्त शशांकच जाणत होता.

खूप मनस्ताप देऊन गेला हा काळ, सोनेरी स्वप्नांचे रंगवलेल्या अनेक गोष्टी पार काळवंडून विस्मृतीत जायला लागल्या होत्या. प्रचंड अस्वस्थतेचे ढग अंगावर घेत शशांक ही बारा वर्षे जगत आला. आनंदाची एक झुळुकही या काळात नाही स्पर्शू शकली शशांकच्या मनाला. ना शांती, ना झोप, एखाद्या मढ्यासारख्या तिरडीवर जाळीत भूतकाळातल्या दाहकतेला,

आता तर हे सगळे अधिकच दाहक होत जात होते. वयाच्या चाळीशीजवळ आलेला हा त्यावेळचा तरणा बांड गडी आताशा साठीतल्या म्हातारपणाचा अंगरखा पांघरून घेत जगत होता, नगण्य आयुष्य लूत लागलेल्या कुत्र्यासारखे. आठवीत आपल्या तारूण्याचा विस्कटत गेलेला दाहक काळ.

वयाच्या पंचविशीत आल्यावर इंजिनिअर झालेला हा देखणा गडी टी.सी.एस. मध्ये चांगल्या पगारावर रूजू झाला. त्याला आता वर्ष होऊन गेले होते. त्याच्या आई वडिलांना उतारवयात झालेले हे मुल वयात येताच, त्यांनी शशांकने लग्न करावे असा घोशा त्याच्या मागे लावीत त्याची इच्छा नसतानाही त्याला लग्नाला तयार करीत होते आणि शशांकही त्या दोघांचे वय व इच्छाशक्तीला बळी पडला.

a

शशांकच्या आई बाबांनी मुली शोधायला सुरूवात केली, शक्यतो मुलगी मुंबईची असावी असे शशांकला वाटत असताना, खूप दूरची म्हणजे सांगली-कोल्हापूरची मुलगी पसंत केली आणि नाखुशीने का होईना शशांकने ती स्विकारली.

शशांक शाळेत असताना 'आदिती' या मुलीकडे आकर्षित झाला तो अकराविला असताना, पण हे प्रेमाचे प्रकरण मध्येच हवेत विरून गेले, जेव्हा ती नागपूरला निघून गेली.

पुनः इंजिनिअरींगला तो ठाकूर कॉलेजमध्ये असताना, या सुंदर, देखण्या शशांककडे अनेक मुली घोटावत होत्या, पण शशांक अजून आदितीच्या प्रेमातून सावरला नव्हता. म्हणून इतर मुलींपासून तो दूरच राहिला. म्हणजे त्यांच्या पासून तो फटकूनच वागे, तसा गैरसमज मुलींच्या मनात त्याच्याबद्दल केल्याने चार वर्षाच्या काळात फक्त अभ्यास या पलीकडे त्याची प्रेमाची पाटी कोरीच राहिली.

मग गुंतला नोकरीच्या चक्रात दोन दोन शिफ्टमधल्या मेरी गो राऊंड चक्रात तो स्वतःलाच हरवून बसला, तशा ऑफिसमध्ये खूप मुली होत्या, देखण्या, पण का जाणे शशांक त्यांच्यापासूनही दूरच राहिला आणि त्याच्यावर मरणाऱ्या मुलींनी लग्ने करून आपले संसार थाटले. शशांक मात्र एकला चलो रे या सरळ रेषेत तसाच लग्नाशिवाय राहिला तो सांगलीचे स्थळ येईपर्यंत.

त्या मुलीचे नांव रंजना. तशी ती सुंदर होती पण ज्या एक दोन वेळा काही निमित्ताने ती मुंबईला आली तेव्हा तीची शशांकशी गाठ पडली. एवढीच तोंड ओळख. ती पदवीधर होती पण तीच्या नजरेतला छछोरपणा त्याला स्पर्शुन

a

गेला आणि लग्नाआधीचे पंधरा दिवस शशांक टू बी ऑर नॉट टू बी या चक्रात अडकला. ती चंचल होती, नजरेला नजर देत नव्हती. त्यांची घरची परिस्थिती फारशी ठीक नव्हती पण शशांकची श्रीमंती, बंगला, नोकरी यावर भाळून तिने हे स्थळ स्विकारले.

मात्र लग्नाला पंधरा दिवस असतानाच तिच्या दुसऱ्या भेटीत तो अस्वस्थ होऊन गेला. तिच्या बोलण्यातला असंबंधपणा, शशांकपासून दूर दूर रहाणे हे शशांकला खूपच अस्वस्थ करीत राहिले. ऐवढे मात्र खरे आणि तिच्या त्या वागण्याने शशांकच्या मनात पाल चुकचुकून गेली.

लग्नाची तारीख ठरली. ते सांगली येथेच करावे हे रंजनाच्या वडीलांचा आग्रह शशांकच्या आई-वडिलांनी मान्य केला व लग्नाच्या खर्चापोटी दोन लाखाची रक्कम त्यांनी रंजनाच्या वडिलांना दिली.

रंजनाच्या वडिलांचा व्यवसाय हळदीचे अडते म्हणून ते करीत. त्यातून मिळणाऱ्या कमीशन व्यतिरिक्त ठणठणात होता. म्हणून त्यांना शशांकचे श्रीमंत स्थळ पसंत पडले. तिचे कुटूंब शशांकच्या वडीलांपासून फटकूनच वागत होते. त्यांच्या मनात काय चालले आहे याचा थांगपत्ता शशांकच्या कुटुंबियांना येत नव्हता. पण तो माणूस बेरक्याच होता हे शशांकने जाणले होते.

लग्नापूर्वी आठवडयाभरापूर्वी रंजनाचे वडील ते दोन लाख रूपये घेऊन जाण्यास आले. चांगले दोन तास थांबले होते आणि त्यावेळी या कुटुंबाची पूर्ण माहिती घेण्याच्या इराद्याने काही प्रश्न शशांकच्या वडीलांना विचारले...

“अहो संपतराव हा फ्लॅट किती चौरस फुटाचा आहे आणि तो कोणाच्या नावावर आहे?”

“का? माझ्या!” संपतराव

“म्हणजे शशांकच्या नावावर दुसरा फ्लॅट घेतला आहे का?” रंजनाचे वडील

“नाही, तशी गरज भासली नाही,” संपतराव

“मग लग्नानंतर ती दोघे कोठे रहाणार?” रंजनाचे वडील

“ का ! आमच्या सोबत !” संपतराव

“म्हणजे?...” रंजनाचे वडील

“काही अडचण आहे काय?,” संपतराव

“नाही! नाही! सहज विचारले!” रंजनाचे वडील

या संभाषणानंतर शशांकच्या वडीलांच्या मनाची चक्रे उलटी फिरायला लागली. हे स्थळ काही माझ्या भोळया भाबड्या मुलाला लाभदायक होईल असे वाटत नाही. ही माणसे बेरकी आहेत यांच्या मनात काहीतरी काळेबेरे नक्कीच आहे, हे त्यांना जाणवले.

त्यानंतर दोनच दिवसांनी शशांकची बदली बंगलोरला झाली व तो तातडीने तेथे रूजू झाला. लग्नाला अजून 10 दिवस होते. दोनच दिवस बंगलोरला जाऊन शशांक 5 दिवसाची रजा घेऊन परत मुंबईला आला. त्याने उटीला हनीमुनला जायचे ठरवले. पण त्याबाबत तो रंजनाजवळ बोलला नाही.

नाहीतरी त्यांचे फोनवर बोलणे फारसे होत नसे. म्हणजे शशांक तिला फोन करी, बऱ्याचवेळा तिचा फोन एंगेज लागे, पण रंजनाने एकदाही फोन केला नाही. ही गोष्टही शशांकला आवडली नाही. म्हणून त्याने परस्पर उटीचा कार्यक्रम ठरवला व लग्नानंतर, एक दिवस सत्यनारायणाची पूजा करून दुसऱ्या दिवसाची विमानाची तिकीटे त्याने काढली. ही हनिमून टूर केसरी टूरची होती. तेथून परत आल्यावर शशांकला बेंगलोरला नोकरीवर जायचे होते.

सांगलीला लग्न असल्याने शशांकचे कुटुंबीय आदल्या दिवशीच तेथे पोहोचले सोबत काही नातेवाईकही होते. लग्न तसे सामान्य पध्दतीनेच झाले. 50/70 माणसेच होती. पण रंजनाच्या बाजूचे हातावर मोजण्याइतकेच लोक होते. त्याच रात्री शशांक, रंजना, आई-वडिल आपल्या गाडीने मुंबईला त्यांच्या घरी परतले. शिवाय रंजनाचे आई-वडिलही एका भाड्याच्या गाडीने मुंबईला आले. सकाळी 5 वा. गाड्या सोसायटीच्या आवारात आल्या. एका बेडरूममध्ये शशांक व आई-वडिल झोपले व दुसऱ्या बेडरूममध्ये रंजनाचे कुटुंबीय व रंजना.

त्यांच्या सांगली मुंबईच्या प्रवासात रंजना शशांकच्या बाजूला बसली होती. पुऱ्या प्रवासात शशांकचा डोळा लागला नाही आणि रंजनाही थंडपणे डाराडूर झोपली होती. त्या दोघांचा एकमेकांना फारसा स्पर्श झाला नाही. त्रयस्थासारखा हा प्रवास झाला.

दुसऱ्या दिवशी पूजा आटोपली. शशांक उभयता महालक्ष्मीचे दर्शन घेऊन आले. रात्री 9॥ वाजता जेवणे आटोपली. रंजनाचे आई रात्री सांगलीला निघतील असा कयास शशांकचा होता पण ते गेले नाहीत. मग त्यांची व्यवस्था

हॉलमधल्या सोफा कम बेडवर करण्यात आली आणि शशांक रंजना एका बेडरूममध्ये

रात्रीचे 11 वाजले होते. त्या दिवशी दोघांना एकांत दिला खरा पण रंजना कशालाच तयार नव्हती. तीने आपली सुटका शशांकच्या मिठीतून करून ती हॉलमध्ये आपल्या आई-वडिलांकडे आली. हे शशांकने पाहिले. ठीक आहे, आज पहिलाच दिवस. शिवाय आई वडील बाहेर हॉलमध्ये म्हणून तिने शरीर संबंधास टाळाटाळ केली असणार, नवी नवरी ती, परके ठिकाण, शशांक मात्र एकटाच पलंगावर पडून होता व त्यात त्याचा डोळा लागला.

रात्री 4 वा. शशांकला जाग आली. रंजना बेडरूममध्ये नव्हती. त्याने हॉलमध्ये बाहेर डोकावले तर ते तिघे काहीतरी बोलत होती. पुनः शशांक आपल्या पलंगावर झोपला. आणि त्याचा डोळा लागला. सकाळी तो उठला तेव्हा 6॥ वाजले होते. रंजना त्याच्या बेडरूममध्ये नव्हती. बाथरूमही सताड उघडा होता. बेडरूममधली तिची बॅगही गायब होती. म्हणून शशांक बाहेर हॉलमध्ये आला तर रंजनाचे आई, वडील, रंजना व त्यांचे सामानही गायब होते. शशांकला वेगळाच संशय आला. त्याने आई वडीलांना उठवले तर तेही चक्रावून गेले.

शशांकने रंजनाला, तिच्या वडीलांना फोन केले पण नॉट रिचेबल लागत होते शिवाय त्यांनी आणलेली गाडीही कंपाऊंडमध्ये नव्हती. वॉचमनने सांगितले ती गाडी व काही माणसे गाडीतून 5॥ वाजता गेली.

मग मात्र संशयाचे ढग शशांकच्या मनात घोळू लागले. लागलीच त्याने बोरीवली पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार नोंदवली व रंजना गायब असण्याची

नोंद करून तो घरी आला. आता मात्र घरातले वातावरण पार तापले होते. उलट-सुलट चर्चेला उत आला होता. सांगलीत त्यांच्या परिचयाचे कोणी नव्हते ना घराचा पत्ता. फोनही लागत नव्हते. तो दिवस कमालीचा टेंशनमध्ये गेला.

शशांक आज उटीला जाणार होता पण हा बखेडा उभा राहिला आणि साराच घोळ झाला. पुढच्याच आठवड्यात उटीवरून आल्या आल्या शशांकला बेंगलोरला जायचे होते आणि त्याच दिवशी वकिलाचे एक नोटीस त्याच्या हातात पडली. भयानक आरोप रंजनाने, तिच्या वडीलांनी शशांकच्या कुटुंबियावर केले होते. फसवणुकीचे, शारिरीक छळाचे इ. या पहिल्याच नोटीसमध्ये कोणा माने वकिलाचे पत्र ते होते. त्यांनी सांगलीच्या फॅमिली कोर्टात ही तक्रार नोंदवली होती. पण या मॅटरला आता खूप काळ जाईल. कोर्टाच्या तारखा पडत राहतात. निकाली केसेस काढले जात नाहीत. त्याला अशील, देऊन बाजूचे वकील यांच्या खाबुगिरीत सारा मामला कुजवला जातो. शशांक आता खूपच अस्वस्थ झाला होता. शेवटी त्याने बेंगलोर गाठले आणि तिकडे कायमची नेमणूक करून घेतली.

महिन्याभराने कोर्टाची नोटीस आली शशांकला, वडिलांना आणि आईला कोर्टात हजर राहण्याची. नाही म्हटले तरी कोर्ट मॅटर यांचे टेंशन असणार ना. तुम्ही जरी गुन्हेगार नसलात तरी तुम्हाला या मांडवाखालून जावेच लागते.

शशांक बेंगलोरवरून मुंबईला आला व आई-बाबांना घेऊन सांगलीला गेला. कोर्ट 11 वा. सुरू झाले. त्यांची केस ॲडमिशनची असल्याने बोर्डवर पहिलीच लागली होती. शशांकचे कोणी वकील नव्हते. पण रंजनाचे वकील माने यानी प्रथम या केसची पार्श्वभूमी मांडली. शशांकच्या वडिलांनी स्वतःच

a

या सगळ्या आरोपांना विरोध केला व पुढच्या वेळी वकील देतो असे कोर्टाला सांगितले. पण माने वकिलाने नव्या आरोपांची यादी कोर्टाला सादर केली व त्याची प्रत शशांकला दिली. त्याबाबत त्यांची बाजू पुढच्या तारखेला कोर्टात मांडण्याचे सांगितले आणि पुढची तारीख दोन महिन्यानी लागली. यावेळी रंजना कोर्टात आली नव्हती.

त्यानंतर दोन महिन्यांनी तारखा पडत राहिल्या. मॅटर थोडे फार पुढे सरकले. त्या प्रत्येक तारखेला शशांक व आई-बाबा हजर राहिले होते. मुंबई ते सांगली हा प्रवास आता शशांकच्या आई-बाबांना झेपत नव्हता. शिवाय खर्च वाढला, शिंदे म्हणून वकिल नेमला. त्याची भरमसाठ फी. ही सोन्याची कोंबडी त्यांना सापडल्यासारखी होती. शिवाय हॉटेलचा खर्च. पण प्रत्येक वेळी रंजनाचा वकील पुढची तारीख घेत राहिला. हा प्रकार शशांकला खूपच मनस्ताप देत होता.

एक वर्ष होऊन गेले, शशांक व कुटुंबीय प्रत्येक तारखेला हजर राहत पण रंजना कधीही कोर्टात आली नाही.

शिवाय दर 3 वर्षाने जजेसची बदली होई. वकील तारखेवर तारखा घेत होते. आता शशांक एकटाच कोर्टात यायचा. आई बाबा 70 च्या पुढचे तेही थकले होते. प्रवास होत नव्हता. हा हा म्हणता सात वर्षे होऊन गेली पण केस काही निकाली निघत नव्हती.

रंजनाच्या आई-वडिलांनी सांगली पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारीचा मामला बोरीवली पोलीस स्टेशनकडे वर्ग करण्यात आला. त्यानीही

a

याबाबत कोर्टाला आपला रिपोर्ट कळवला व सर्वांना निर्दोष असल्याची ग्वाही दिली.

कंपनीने शशांकला 2 वर्षासाठी अमेरिकेला पाठविण्याचा निर्णय घेतला आणि पुढच्या तारखेला वकील शिंदे यांनी तसे कोर्टाला सांगितले. पण ॲड. माने याने कडकडून विरोध केला. आणि कोर्टानेही भारत न सोडण्याची ऑर्डर दिली.

आता मात्र शशांक कमालीचा खचला होता. केस सात वर्ष या न त्या कारणाने पुढे जात होती. त्याच्या भविष्याच्या प्रगतीत हा अडसर होता. त्याचे सगळे भविष्यच काळेकुट्ट दिसत होते. या प्रकरणात काहीतरी काळेबेरे आहे हे शशांकने जाणले आणि या सगळ्या प्रकरणाला स्वतःच सामोरे जायचे ठरविले. त्याने दोन वर्षांच एलएलबी ला प्रवेश घेतला होता आता फायनल परीक्षा झाली होती. शशांक फर्स्ट क्लासमध्ये पास झाला आणि त्याने ताबडतोब सनदही घेतली. आता तो वकील झाला होता. त्याने याकाळात या संबंधीच्या कायद्याचा सखोल अभ्यास केला आणि ठरविले की पुढच्या डेटला आपणच आपली केस लढवायची.

तो मे महिना होता. याच महिन्यात केसला 12 वर्षे होणार होती. 8 मे ची तारीख लागली. शशांक बेंगलोरहून मुंबईला आठ दिवसापूर्वीच आला होता. शिवाय त्याने आपल्या या कोर्टमॅटर बद्दल त्याचे प्रोफेसर ॲड. शिरकर, ॲड. भट यांच्या जवळही चर्चा केली. हा 12 वर्षे चाललेला कोर्ट मॅटर हा अन्यायकारक होता. या मॅरेजच्या बाबतीत त्याने त्या व्यक्तिचे पूर्ण करीअर, कौटुंबिक आयुष्य बरबाद केले होते.

a

यापूर्वी कोर्टाच्या सुचनेप्रमाणे हे मॅटर या दोन पार्टीनी बाहेर सामंजस्याने मिटवावे. पण शशांकचे झालेले करीअरचे नुकसान, परदेशी जाण्याचे स्वप्न व कौटुंबिक जीवन पार उध्वस्त झाले होते. ते त्याच्या मनाला इतके लागले होते की एक घाव दोन तुकडे पुढच्या डेटला करून टाकायचे. शिवाय वकील बदमाश निघाले. दोन्हीही ते पैसे खाऊन हा मामला अधिक पुढे नेण्याचाच प्रयत्न करीत होते. रंजनाचा वकिल पुढची डेट मागे आणि शिंदे होकार देई. पार खचून गेला होता शशांक. पण आता तो वकील झाला होता. ही केस म्हणजे मोठा फ्रॉड होता. हे तो जाणत होता.

त्यात शशांकचे आई-वडिलही एक वर्षापूर्वी गेले. आता तो एकाकी जीवन जगत होता. एक एक दिवस त्याला वर्षासारखा वाटत होता. तेव्हा उद्याच्या डेटला या गोष्टीचा फैसला करायचाच या तयारीने तो आला होता. एक घाव दोन तुकडे करायचेच.

आज कोर्टात दोन्हीही वकील हजर होते. शशांकही आला होता. त्याची केस पहिल्या नंबरवर लागली होती. जज्ज बसले.

“ॲड. माने तुम्हाला कोर्टाला काय सांगायचे आहे काय?” जज्ज

“नो मेलॉर्ड, माझे अर्ग्युमेंट पूर्ण झाले आहे पण अजून एक तारीख मिळावी. अशी विनंती मी कोर्टाला करीत आहे.” माने

“ॲड. शिंदे तुमचे काय म्हणणे आहे ?” जज्ज

“नाही मेलॉर्ड, ॲड शिंदे तुम्ही पुढची तारीख द्या.

एवढ्यात मागे बसलेला शशांक पुढे आला.

a

“मेलॉर्ड माझी केस यापुढे मीच चालवणार आहे. माझे वकील शिंदे यांना मी काढून टाकले आहे.” शशांक

“तसे तुम्हाला नाही करता येणार तुम्हाला तुमची बाजू वकीलामार्फतच मांडावी लागेल” कोर्ट

“मेलॉर्ड, मी माझी सनद व अर्ज तुमच्याकडे सादर करीत आहे. मी स्वतः आता वकील आहे. मला माझी बाजू मांडण्यास परवानगी द्यावी.” शशांक

“तुम्ही तुमचे म्हणणे आरोपीच्या बॉक्समध्ये येऊन मांडा.” कोर्ट

“या केसला आज 12 वर्षे होत आहेत तरी ती निकाली काढली जात नाही. आम्ही म्हणजे मी, माझे आई-वडील एकाही तारखेला गैरहजर राहिलो नाही. प्रत्येक वेळी रंजनाच्या वकीलानी पुढची डेट घेत आज 12 वर्षे हे मॅटर असेच प्रलंबित ठेवले आणि अजून किती काळ तो प्रलंबित राहिल याचा नेम नाही. मला माझी बाजू मांडण्यास परवानगी देण्यात यावी. मी माझ्या वकिलाला काढून टाकले आहे. पण आज कोर्ट संपेपर्यंत त्याना कोर्टाबाहेर जाण्यास मज्जाव करावा मेलॉर्ड.

मेलॉर्ड, आज या केसला 12 वर्षे झाली तरी ही केस प्रलंबित आहे. पण आजवर माझ्या विरूध्द तक्रार करणारी रंजना व तिचे आई वडिल केव्हाही कोर्टात दिसले नाहीत. मात्र आम्ही प्रत्येक डेटला हजर झालो. ती रंजना का येत नाही, असा सवाल ना तुम्ही केला ना माझ्या वकिलाने. त्यांना मी याबाबत

कितीतरी वेळा सांगितले पण ते चकार शब्द काढीत नाहीत. आपणही याबाबत काहीही विचारणा केली नाही.

"मेलॉर्ड या केसमध्ये मला बरेच काही काळेबेरे दिसत आहे!" शशांक

मेलॉर्ड आता मी चाळीशीला आलो आहे. त्या रंजनाने माझे आयुष्य कुजवले आहे. तिचा माझा शारिरीक संबंध आला नाही. जे जे आरोप आमच्यावर झाले हे या माने वकिलाने पदरचे घुसडून केस मोठी करण्याचा प्रयत्न केला. माझे पूर्ण करियर या लग्नाने बरबाद झाले आहे. मी कोणत्या मानसिक अवस्थेतून जात आहे याची कल्पना तुम्हाला नाही. मला न्याय हवा आहे. आता मी स्वतःला रोखू शकत नाही. आज या प्रकरणाचा सोक्षमोक्ष मला लावायचा आहे.

"मेलॉर्ड तुम्हाला याबाबत काही विचारायचे असल्यास मला विचारा. मी त्याची समर्पक उत्तरे देईन." शशांक

एवढे बोलून त्याने कोर्टासमोर एक रिटन स्टेटमेंट सादर केले व एक कॉपी अ‍ॅड. माने यांना दिली.

कोर्टात भयाण शांतता पसरली होती. सर्व वकील, अशिल चिडीचूप होते. असे पूर्वी कधी त्यांनी ऐकले वा पाहिले नव्हते एवढ्यात...

"अ‍ॅड. माने याबाबत तुम्हाला या आरोपीला काही विचारायचे आहे काय?"

आणि माने वकील उभा राहिला.

“एवढ्यात शशांकने कोर्टाला सांगितले, प्रथम रंजना का येत नाही कोर्टात. गेल्या 12 वर्षात तिचा चेहरा मी पाहिला नाही वा तिच्या आई-वडिलांचा. या बाबत या माने वकीलांना निवेदन करायची विनंती करावी!” शशांक

“ॲड. माने आरोपीने विचारलेल्या प्रश्नांबद्दल निवेदन करा!” कोर्ट

ॲड. माने गडबडला, तो उठला आणि आरोपीच्या कठड्याजवळ आला, तो काहीच बोले ना...

“बोला ॲड. माने बोला,” शशांक आणि त्याने त्या माने वकिलाची टाय पकडली आणि आपल्या जवळ खेचला. मानेची बोलती बंद झाली होती....

“मेलॉर्ड मला अजून एक डेट द्या. मी रंजनाला हजर करतो कोर्टात” माने

“मग आजवर ती या कोर्टात का आली नाही ?” शशांक

शशांक तापला होता. तो माने वकीलाची टाय सोडायला तयार नव्हता.

आणि मोठ्याने शशांकने दरडावले

“बोला!” शशांक

तरीही माने गप्पच

मग मात्र शशांकचा तोल सुटला.

मेलॉर्ड ही सगळी मिलीभगत या माने आणि शिंदे वकीलांची आहे. यांनी गेल्या 12 वर्षात माझे लाखो रूपयेची रक्कम खाल्ली आहे. असे म्हणत...

शशांकने उजव्या हाताचा एक ठोसा माने यांच्या नाकावर मारला व दुसरा दातावर... माने रक्तबंबाळ झाला होता आणि त्याने बसकण मारली. सारे कोर्ट उठून उभे राहिले. काही वेळ कोर्टही आपल्या खुर्चीत उभे राहिले.

एवढ्यात शिंदे वकील कार्टातून पळून जाण्यासाठी उठला आणि निघणार -

“मेलॉर्ड या शिंदे वकीलांना थांबायला सांगा” शशांक

“ॲड. शिंदे तुम्ही कोर्ट उठेपर्यंत्न थांबायचे आहे, ही चौकशी अजून संपलेली नाही,” कोर्ट

माने वकीलाच्या नाका-तोंडातून रक्ताची धार लागली होती. रूमालाने पुसीत तो खुर्चीत बसला.

“ॲड माने आता 1 वाजला आहे. लंचब्रेक होईल. तुम्ही तुमच्या अशिलांना आताच्या आता बोलवून घ्या.” कोर्ट

“होय मेलॉर्ड” माने

जेव्हा एखाद्या अन्यायाची सिमा होते तेव्हाच आरोपी अशी पावले उचलतो. असा प्रकार पूर्वी जज्ज सावंत यांच्या जीवनात आला नव्हता. अन्यायाने कोपलेला माणूस असे शेवटचे पाऊल उचलतो हे जज्ज जाणून होते.

दुपारी 2 वाजता कोर्ट पुन्हा उभे राहिले. शशांकचीच केस आज चालवण्याचा निर्णय जज्जनी घेतला होता व ती आजच निकाली काढावी अस त्यांनी ठरवले असे त्यांच्या एकंदरीत बॉडी लँग्वेजवरून वाटत होते.

आता शशांक वकीलांच्या टेबलामागे बसला होता. ॲड. माने अजून

नाकाला रूमाल लावूनच होता. शिंदे वकील शशांकच्या नजरेला नजर देण्याचे टाळत होता.

रंजना आणि तिचे वडील हे आता कोर्टात हजर झाले होते.

“मेलॉर्ड रंजनाला मला काही प्रश्न विचारायचे आहेत. आपली परवानगी असेल तर!” शशांक

“रंजना, तुझे माझे लग्न झाले हे खरे ना?” शशांक

“होय,” रंजना

“मग तुम्ही दुसऱ्या दिवशी न सांगता चोरासारखे निघून गेलात का?” शशांक

“मला ही लग्न पसंत नव्हते.” रंजना

“तुमचा माझा शरीर संबंध आला होता का?” शशांक

“नाही” रंजना

“मग मी नपुंसक आहे, ते तुला कसे कळले त्या रात्री, हे खरे का?” शशांक

“हे खोटे आहे!” रंजना

“तुला हे लग्न पसंत नव्हते तर तू का तयार झालीस” शशांक

“माझा नाईलाज होता. मी वडिलांच्या दबावाला बळी पडले!” रंजना

“तू इतकी वर्षे म्हणजे 12 वर्षे कोर्टात का आली नाहीस?” शशांक

"मला माझ्या वडिलांनी याबाबत काहीही सांगितले नाही. त्यांनी त्याच आठवड्यात कर्नाटकातल्या बेळगावच्या एका मुलाशी माझे लग्न लावून दिले. या केसबाबत मला आजच समजले आहे. मला दोन मुले आहेत. मी बेळगावला राहते." रंजना

"मेलॉर्ड! हिने लग्न केले मजा केली आणि माझे आयुष्य बरबाद केले याला तिचे वडील, हा माने वकील आणि माझे वकील हेच जबाबदार आहेत. मी निर्दोष आहे. हे वकीलच अशिलाला नाडतात. वर्षानुवर्षे केस चालू ठेवतात आणि मेलॉर्ड सत्यापासून माझ्यासारख्या निरपराध्याचे आयुष्य बरबाद करतात, ही या तिघांची मिलीभगत आहे. आणि यात माझा बळी गेला. माझे आयुष्य बरबाद केले माझ्या आई-वडिलांना नाहक त्रास भोगायला लागला!" शशांक

"मेलॉर्ड! या दोन वकिलांना रंजना आणि तिच्या वडीलांना योग्य ती शिक्षा द्या! माझे वाया गेलेले आयुष्य परत येणार नाही. माझ्या करियरचे तीन-तेरा वाजले आहेत. रंजनाही तितकीच दोषी आहे!" शशांक

"या चौघांना योग्य ती शिक्षा देण्यात यावी. या वकिलांची सनद रद्द करण्यात यावी म्हणजे एक चांगला संदेश समाजात जाईल." शशांक

आता या केसचे कामकाज संपले असले तरी मी आजच निकाली काढीत आहे. पुन्हा अर्धा तासाने कोर्ट बसेल.

ॲड. माने, शिंदे यांचे चेहरे पार काळवंडले होते. रंजनाचा बाप तर थरथर कापत होता. रंजनाही भयभित झाली होती.

अर्ध्या तासाने कोर्ट पुन्हा बसले जजने आपले निकाल पत्र वाचण्यास सुरूवात केली.

“आज शशांक या तरूणाला मी पूर्णपणे मुक्त करीत आहे.” जज्ज

“अॅड शिंदे आणि माने यांच्या सनद रद्द करण्यात येत आहेत व त्यांना कोणत्याही कोर्टात वकीली करण्यास मनाई करण्याचा हुकूम मी देत आहे.”

“रंजनाच्या वडीलांना फसवणूक, नाहक त्रास देणे यासाठी दोषी ठरवून वयाचा विचार करता पाच वर्षाच्या सक्त मजुरीची शिक्षा देत आहे. पोलीसांनी त्यांना ताब्यात घ्यावे !” जज्ज

“रंजनाचा मुख्य तक्रारदार म्हणून दोष नाही म्हणता येणार नाही. तिचे लग्न झाले असताना तिने दुसरे लग्न करावे. हाही मोठा दोष आहे. ती सज्ञान होती तेव्हा तिच्या दोषाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तिचे आता झालेले लग्न हे मी रद्द करतो आणि तिला एक वर्षाची सजा सुनावतो. तिच्या मुलांची काळजी तिच्या नवऱ्याने घ्यावी!” जज्ज

“शशांक यांच्या वडिलांकडून घेतलेले दोन लाख रू. व्याजासह त्यांना परत करावे व या केससाठी झालेला खर्च त्यांना झालेला मनस्ताप व मानसिक छळ यापोटी पाच लाख रूपयेची रक्कम शशांक यांना देण्यात यावी!” जज्ज

“शिवाय या दोन वकिलांनी आजवर घेतलेली सगळी फी शशांक यांना परत करावी” जज्ज

"ॲड. शशांक यांचे विशेष आभार मानतो. त्यांच्या मुळेच आज या केसचा पर्दापाश झाला आहे. धन्यवाद. त्यांनी पुढेही कोर्टाची प्रॅक्टीस करावी व गरजू, नडलेल्यांना मदत करून समाजात एक आदर्श निर्माण करावा." जज्ज

आणि कोर्ट उठले.

शशांकला खर्च झालेली सगळी रक्कम मिळाली. पण आयुष्य बरबाद झाले त्या तारूण्याचे काय, शिवाय प्रचंड मनस्ताप. शशांक बँगलोरला गेला. त्या प्रवासात त्याचे त्यालाच कौतुक वाटले. मी एलएलबी केली काय सनद घेतली काय, माझी केस चालवण्याची मानसिकता कुठून आली याचा विचार तो करीत होता.

आता या 43 व्या वर्षी लग्न करावे हे त्याच्या मनाला पटत नव्हते. पण यापुढे अशा नाडलेल्या कुटूंबांना मदत करावी. त्यांची फसवणूक होणार नाही हे पहावे असे शशांकला वाटत होते.

आणि 5/6 दिवसांनी अशा 7 केसेस त्याच्याकडे आल्या. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील अशा लोकांना करावा हे त्याने ठरवूनच टाकल. एक वकील म्हणून त्याचा त्याच्यावरच विश्वास बसत नव्हता, असे काही मी करू शकतो !!

|||||

a

# साती आसरा

तसे पाहिले तर अस्मादिकांची गणना उनाड पोरातच व्हायची, सरळमार्गी जगणे नव्हतेच ते; चालणेही सरळ नव्हते, अनेक छंदात रंगले ते बालपण. आज जेव्हा डोकावतो ना मी त्यात, साऱ्या गजाली जाग्या होतात, मोहरते मन, आठवतात सगळे मित्र, आमच्या रंगतदार करामती आणि हरवून जाते मन त्या आठवणीच्या डोहात अलगदपणे. काय दिवस होते ते.

रानभर भटकणे, नदीत डुंबणे, करवंदे, आंबे हा तर सुगीचा काळ असायचा. मासे पकडणे आणि घरी आल्यावर शिव्यांची फोडणी ठरलेली असायची रोज. शाळेची वेळ संपली की आमचे खरे जगणे सुरू व्हायचे अगदी दिवस मावळेपर्यन्त. पायाला थारा नसायचा, भिंगरीला मागे काढता येईल असे भटकणे, बेचकी, तिरकामटे, कनवटीला असायचेच. पण खर सांगू आज तेच जगणे मनाला विरंगुळा देते. रमते मन त्या बालपणात इतके की विसरायला होते आज आपले वय, आजच्या जगण्यातले टक्के रोजचे आणि परिस्थितीचे चटके. जीवनातलेच उत्तर. आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर आल्यावर.

आणि आता तर उतारवयात हेच टॉनिक होऊन बसले आहे. ते मनोहर जगणे मनाला उभारी देते, रमते आठवणीत आणि हरवते मन पार बालपणातल्या तळ्याचा तळ शोधीत, निसर्गाच्या सोबत, नद्या नाले झरणे आणि फुलपाखरे, प्राणी यांच्या विश्वात.

a

परवा रात्री तीन वाजताच जाग आली साती आसरांच्या आठवणीने, म्हणजे नदीच्या डोहातल्या हो. खूप काही कानावरून जायचे आजी-पंजीच्या बोलण्यातून आणि मन रमायला लागायचे त्या विश्वात. रात्री जेवल्यावर एकदा मी कान देऊन ऐकत होतो गडगीच्या डोहातल्या साती आसरांबद्दल. ही जुनी माणसे ना उगाच पेरायची आम्हा पोरांच्या मनात भितीची जाळी, आणि रात्रभर तोच रवंथ सुरू असायचा. कल्पनेच्या दुनियेत.

एकदा तर आजोबा सह्याद्रीत काही लोकांबरोबर गेले ते गडगीच्या डोहाला माज घालवण्यासाठी विषारी वनस्पती आणायला. हे फक्त ऐकून होतो. ही गोष्ट माझ्या आजोळची हं. पेढांब्याची. सकाळ संध्याकाळ लोक येत तीच चर्चा, मासे मारण्याची. तेव्हा मी असेन चौथी-पाचवीला आणि कल्पनेच्या विश्वात त्या डोहाच्या नांवाने. प्रत्यक्ष नव्हता पाहिला मी तो डोह आणि डोहाला घातलेली माज. पण सहावी सातवीत गेल्यावर उनाडक्यांना ऊत आणि सगळे डोह पालथे घातले आम्ही, खापराचा डोह, गडगीचा डोह, वाशिष्ठीचे सगळे डोह जेव्हा उन्हाळा असायचा, गुरा-वासरांना पाणी पिण्यास तेवढाच आधार असायचा आणि आम्ही सगळी पोरे गुरा-ढोरांना, म्हशींना घेऊन निघायचे ते संध्याकाळीच परतायचे

त्यात मोठा डोह म्हणजे वाशिष्ठीचा म्हणजे गडगीचा. थोरल्या नदीचा, नदीच्या पाण्याचा खडखडाट झाला तरी तो डोह भरून वहायचा, वाहते पाणी स्वच्छ. त्यातच मी पोहायला शिकलो म्हणजे बाप झालो. डोहाच्या वरच्या अंगाला उंच कडा होता. तेथून आम्ही उड्या मारायचे. खूप मजा यायची. कसा

वेळ जायचा पोहण्यात, खेळण्यात त्या पाण्याच्या खोलवर कपारीत समजत नसायचे. सारे विसरून आम्ही मनमुरादपणे जगलो या पाण्यात खेळत.

केव्हातरी नव्हे, रोजच आजी सांगायची, पाण्यात उतरू नका हं. गडगीच्या डोहात. त्यात म्हणे साती आसरा असतात. नेतात ओढून माणसांना खोल पाण्याच्या कपारीत. नी मुडदा येतो फुगून पाण्यावर तरंगतो.

पण आम्ही कसले असल्या गोष्टींना भिणारे. आमचा हा सगळा खेळ आजीच्या नजरेआडचा आणि एकदा कोणीतरी चुगली केली, बस, निंगडीच्या शिमटीचा प्रसाद पाठीवर, पायावर झेलला मी. रडरड रडलो मी आणि आजीचा राग थंड झाल्यावर तिने जवळ घेतले. आंजारले-गोंजारले आणि अनेक आठवणी तिच्या तिने पेरल्या माझ्या मनात.

“हे बघ बाळ त्या डोहात साती आसरा आहेत. दरवर्षी दोन-चार लोकांचे मुडदे तरी सापडतात. त्या पार घेऊन जातात पाताळात त्या माणसांना, तेथे त्यांची राणी असते. खेळवतात त्यांना आणि मारून टाकतात. दूर रहा त्या डोहापासून. अरे तुला तुझ्या आईने येथे शाळेत शिकायला ठेवलय. तुझी ब्याद एकदा त्यांच्या हवाली केली की आम्ही मोकळे, आम्ही काय झाडाची पिकलेली पाने, जाऊ गळून पण तुला त्यांच्या हवाली केले की आम्ही मोकळे.” आजी

सारे मन लावून ऐकले मी आणि चरकले मन. खर असेल कां हे आजी म्हणते ते? का उगाच भिती दाखवायची म्हणून पेरतेय ही मनात. पण दोन चार दिवसांनी पाठविले तिने गुरे घेऊन त्या डोहावर मे महिना, विहीरी आटल्या,

गावातल्या छोट्या मोठ्या नद्या, पऱ्यातले पाणी आटले. मग गडगीचा डोह होता एकच आसरा.

पण पुढचे दोन तीन दिवस त्या गडगीच्या डोहात उतरण्याचे धाडस झाले नाही. मन साशंक झाले. असेलही खरे आजी म्हणते ते. पण शित्या न्हाव्याच्या मुलाने मला वेडात काढले.

“नाही रे, हे सगळे झूट. ही म्हातारी माणसे अशीच भितीचा बागुल बुवा उभा करतात. आम्ही पाण्यात उतरू नये म्हणून.” चंद्र्या

पण अजूनही माझे मन त्या जंजाळातून बाहेर यायला तयार नव्हते. मे महिन्याच्या रजेत मुंबई-पूण्याहून पोरे येत गावात. त्यांच्या मनात भिती नसायची. बेलाशक पाण्यात उतरत आणि ते पाहून गेल्या आठ दिवसात पाण्यात न उतरणारा मी डोहाच्या वरच्या खडकावर गेलो. पाण्यात ही मुले डुंबताना आजीच्या गजाली विसरलो आणि मारला सूर डोहात.

खूप बरे वाटले त्या थंडगार पाण्यात नाहीतरी उन्हाने शरीर तापले होते आणि मनातली भिती पार दूर झाली.

घरी आलो तो भिजलेल्या कपड्यानिशी आणि पुन्हा चंपी झाली, शिव्यांचा रतीब. पण चिडीचीप मनाने दुर्लक्ष केले.

“अगं आजी आता मी अट्टल पोहणारा झालो आहे. भिती कसली ? अग आता मी लहान नाही” मी

“अरे मेल्या, नाही सुधारणार तू, देते पाठवून आयशीकडे थांब!” आजी

a

मग वादळ शांत ! पण आमचे पाय डोहाकडे वळत मे महिना होता, मी सातवीला होतो सकाळच्या शाळा. 11 वाजता शाळा सुटे मग रेंगाळत घराची वाट, भुकेचा आगडोंब पोटात. मग मात्र पाऊले वळत भराभर घराकडे. दुधात घालून निखाऱ्यावर तापवलेली भाकरी खायला.

तस पाहिले तर गाव काही सपाट नव्हता. खाच-खळग्यांचा, चढ-उताराचा मी इतर मुलांबरोबर नदीची डाग चढून वर आलो तर समोरच वाटेवरच्या चव्हाण यांच्या अंगणात खूप माणसे जमा झाली होती. आम्ही सगळीच पोरे तेथे ती गर्दी पाहून थांबलो. आमच्या बरोबर त्या चव्हाणांचा मुलगाही घरी परतत होता. ही गर्दी पाहून तोही चपापला आणि कोणीतरी म्हणाला,

“म्हामद्या! तुझा बाप गडगीच्या डोहात बुडून मेला. साती आसरांनी दाबून ठेवला होता त्याला रात्री आणि हे प्रेत फुगून...” कोणीतरी.

त्याने भोकांड पसरलेली आम्ही सगळी पोरे गर्दीतून पुढे सरकलो, नी पहातोतो म्हामद्याच्या बापाचे प्रेत डालग्यातच होते आंगणात....

आम्ही पळ काढला, घामाघूम झालो म्हणजे आजी म्हणायची त्यात काहीतरी नक्कीच गोम असणार. वाऱ्याच्या वेगाने घर गाठले. भूक पार मरून गेली होती आणि आमची आजी-पंजी आणि वाडीतल्या म्हाताऱ्या बायका वाटेने चव्हाणांच्या घरी येताना दिसल्या. मी आडोशाला थांबलो नी त्या गेल्यावर घर गाठले. बोबडी वळली होती. खूप वेळ त्या अवस्थेत मी ओठीवर बसून होतो.

“बघीतलस ना तो चंद्या चव्हाण मेला त्या डोहात साती आसरानीच नेला त्याला खाली आणि....” आजी

मी गप्पच होतो, आजीची ठेवणीतली निंगडीची शिमटी शोधत होतो.

“जाशिल पुन्हा त्या डोहावर” आजी

माझीतर बोबडीच वळली होती...

आणि दोन दिवसानी आमची बॅद मुंबईला रवाना झाली....

पण म्हणून काय आम्ही पोहणे बंद केले काय?

पण आज आठवण झाली की मन चरकते भितीने डोहाजवळ आल्यावर.

आता केव्हातरी जाणे होते आजोळी आणि त्या साती आसरा मनाचा थरकाप करतात. पण तो डोह आता भरला कोयनेच्या रेवशाने, पण तो कडा आहे तसाच आणि त्या आठवणी हुंदडायच्या गडगीच्या डोहात आणि त्या साती आसरांत. एवढे मात्र खरे !!

|||||

# तोडगा

विश्वाच्या या बाजारात तुम्ही आलात की जगण्यासाठी धडपडत रहावे लागते. सुख दुःखाच्या प्रचंड लाटांचे तडाखे खाता खाता काहीना मार्ग सापडतो, तरून जाण्याचा, तर काही गटांगळ्या खात गडप होतात. त्याच्या गर्भात मोजकेच आयुष्य प्रत्येकाला दिलेले असते. बालपणातही तुम्ही ज्या आई-वडिलांच्या पोटी जन्म घेता त्यांच्या आयुष्याचा भाग होऊन राहता. तरूणपणाचा मधला भाग हा या जगात आपण आपल्या योग्यतेप्रमाणे खेळत राहतो, मग निवृत्ती आणि शेवटचे चाळीस वर्षांचे जगणे हे तुम्ही तरूणपणात कसे जगलात, काय काय केलेत यावर अवलंबून असते.

अर्थात तुम्ही म्हणजे तुमचे आयुष्य एकट्याचे नाही. तुमच्या कुटुंबासोबत प्रपंचाचा गाडा ओढीत निवृत्तीच्या सीमारेषेवर येऊन जगणे थांबते, तेथेच खऱ्या अर्थाने जगणे सुरू होते. किती लोक, पत्नी, मुलेबाळे तुमच्या सोबत जगतात. तुमच्या सोबत? नाही, काळ बदलला, समाजाचा ढाचाच आज विस्कळीत झाला आहे. पूर्वीची एकत्र कुटुंब पध्दती मोडीत निघाली. माणूस उघडा पडतो त्याच्या उतारवयात. पाखरांना पंख फुटतात नी सोबत उरते ती आपल्या पत्नीची, असेल तर, नाही तर एकाकी पणाचे, भयाण चित्र समोर उभे राहते.

जोवर नोकरीत आहे तोवर सहकारी, मित्र, सवंगडी यांच्या सोबतचा काळ छान व्यथित होतो पण मग एका पोकळीला सामोरे जावे लागते. त्यात

टिकून राहिलात तर ठीक नाहीतर? त्यासाठी मार्ग अनेक असतात पण शोधावे लागत आपल्या सोईचे योग्य तेच, पचनी पडतील आणि परवडतील असे जुळवून घ्यावे लागते त्या सोबत. तो काही रेडीमेड अंगरखा नसतो. अनेक बदल करून त्याला. आपल्या योग्य करावे लागते काळ बदलतो. अंगरखाही बदलतो. ही सगळी सर्कस करीत आपले तारू उतारवयात पाण्यात लोटावे लागते आणि जगण्याचा मार्ग आपण आपला निवडावा लागतो. कधी एकट्याने, कधी इतरांना सोबत घेऊन... तो असा की...

पंजाबरावांचे कार्यालय तसे मोठे. हजारांनी काम करणारे. अर्थात ते सरकारी, प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या तारखेला पाच पन्नासजण निवृत्त होणारे. जसा उंबरठ्याच्या आत सगळ्यांबरोबर जगणे आणि जेव्हा आपण ऑफिसचा उंबरठा ओलांडून बाहेर येतो. एका भयाण शांततेला आपण सामोरे जातो, एकाध दुसरा महिना हे निवृत्तीचे ओझे आपण आनंदाने स्विकारतो. पण मग काय ? मन जड होते.

आपण कुटुंबाला, अनेक मित्रांच्या आयुष्यात डोकावण्याचा अनुभव घेतलेले आपण, जेव्हा आपल्या प्रपंचात वावरतो, आपण एकाकी आहोत, आपल्या कुटुंबात कोठेतरी अडगळ होत आहोत याची जाणीव क्षणाक्षणाला होत राहते.

खरे सांगू आपली अडगळ नाही होत सहन इतरांना, मुले मोठी झालेली असतात. सुना-मुलांचे घर आहे असे जाणवत राहते आपल्याला. त्याचा परिणाम नेहमीच्या जगण्यावर, वैचारीक जीवनात सतत डाचत राहते आपल्याला आणि येते मायुसी जगण्यात क्षणाक्षणाला.

a

पंजाबरावांचे तसेच झाले. ते आयुष्यभर खपत राहिले आपल्या कुटुंबासाठी, अधिकारी म्हणून निवृत्त झाल्यावर अगदी भल्यामोठ्या जागेत पत्नी, दोन मुले त्यांच्या पत्नी, नातवंडे असा मोठा परिवार.

दोन महिने निवृत्तीचे ठीक गेले नातवंडांच्या सहवासात. कुटुंबात कुरबुर नव्हती असे नाही. नव्याने आलेल्या नव्या सुनेचे आणि पत्नीचे काही ना काहीतरी खटके उडत. नोकरीत असताना हे फारसे जाणवत नव्हते, पण मग घरातील हे वातावरण निवृत्तीच्या दोन महिन्यात प्रकर्षाने त्यांना जाणवत राहिले. अस्वस्थ होत गेलेले वातावरणात. लिखाणाची सगळी उर्मी पार विरघळून गेली. या घरात आपली जागा कोणती? या समस्येने त्यांना पछाडले होते. कविता लिहावी तर मन सैरभैर. मनासारखी आपली जागा त्यांना सापडत नव्हती. पंजाबराव मराठी सारस्वतातले मोठे नाव. 25 पुस्तके त्यांच्या नावावर, कथा 10, दोन कादंबऱ्या, ललीत लेखन, संशोधनपर लेखन, कवितांचे 8 कविता संग्रह हे सारे त्यांना निष्क्रीयतेचा ढीगारा वाटायला लागला होता. खरेतर जगण्यातला राम दोन महिन्यात पार हरवला होता. प्रचंड पोकळी आपल्या जीवनात निर्माण झाली आहे.

अनेक वेळा त्यांच्या मनात विचार येई आपल्या गावाला रामपूरला जावे. चांगला बंगला, सगळ्या सुविधा होत्या. पण कुटुंब, पत्नी तयार नव्हती; शिवाय मुले आता एकत्र राहायला तयार नव्हती. त्यांना मुंबईचा 3 बीएचके विकून वेगळे फ्लॅट्स घ्यायचे होते. खरेतर ही जागा पंजाबरावांनी मोठ्या कष्टाने उभी केली होती. याशिवाय दुसरी जागा त्यांच्याजवळ नव्हती. ही विवंचना पंजाबरावांना खूप सतावत होती. त्यांचे या वास्तूवर नित्यांत प्रेम होते.

a

गरीबीचे चटके खाऊन त्यानी ही वास्तू निर्माण केली. आणि आता ही वास्तू विकणे त्यांच्या जीवावर आले होते.

आता त्यांनी वयाची 65 पूरी केली निवृत्तीनंतरची पाच वर्षे त्यांनी कशीतरी पार केली. अनेक व्याधीनी त्यांना, त्यांच्या पत्नीला आता सामोरे जावे लागत होते. तेही त्यानी स्विकारले. शेवटी त्यांनी गावी जाण्याचा निर्णय घेतला. आपल्या गावातल्या घरात त्या वास्तूला ते आता वृध्दाश्रम म्हणत असत. म्हातारपणाचा आधार म्हणून.

मुंबईची वास्तु विकून टाकली आणि गावाला मोर्चा वळवला. प्रचंड मानसिक ताण सहन करावा लागला. त्यांना वाटू लागले या जीवनाच्या ‘वलयात’ काय ठरवले आपण आणि घडले काय? जीवन निरर्थक वाटायला लागले.

लग्न केले, त्यांचा हा प्रेमविवाह. तारूण्यातली तिची साथ सोडलीत तर सगळी भरकटच. वैचारिक मतभेद, कौटुंबिक कलहाचे चटके, मुलांचे विचित्र वागणे त्यांचे वाद. सारे मिटवता मिटवता ते मेटाकुटीला आले होते. शेवटी प्रपंचाचे सुख ते काय?

शेवटी आपण एकटे ते एकटे. याच गोष्टीने आज त्यांना पछाडले होते. शेवटी माझे कोण? जीवन शुन्याकार झाले होते त्यांचे.

आणि एकाएकी संकट उभे राहिले ते पत्नीच्या आजारपणाचे. त्यांच्याही काही कमी अडचणी नव्हत्या, ढोपराचे दुखणे, मध्ये झालेले त्यांच्या हृदयाचे ऑपरेशन, आणि त्यानंतरची दोन मोठी दुखणी.

a

बर हे सारे त्यानाच निस्तरावे लागले होते. ना मुलांची, ना सुनांची मदत. त्यांना आर्थिक मदत नको होती. हवी होती मानसिक, पण हे घडले नाही आणि आपण एकाकी आहोत ही भावना बळावत गेली. त्यात पत्नीची साथ सोडून गेली. त्यावेळी त्यांचे बस्तान रामपूरला होते. गेल्या दोन महिन्यात मुलेही फिरकली नाहीत. अनेक अडचणी, जेवणाची, वाढत्या वयामुळे आलेला शारिरीक थकवा, दिवस दिवस भयाण वाटायचा त्यांना. कोणी नातेवाईक, मित्र, गावातले लोकही फिरकत नव्हते. सारा दिवस भूतासारखा वाटत होता.

आता आता तर मुलांचे फोनही यायचे थांबले. कसलीच करमणूक नव्हती. होता तो टी.व्ही.चा सहवास. तोही आता राजकीय घडामोडीने व्यापलेला, नकोसा झालेला. काय करणार या सगळ्या घडामोडीत दोन महिने गेले.

त्यांना हवी होती माणसांच्या सहवासाची गरज. आपली सुख-दुःखे इतरांना सांगावी इतरांची ऐकावी, माणसा माणसातला संवाद हवासा वाटत होता. पण हे गावात शक्य नव्हते.

तसे ते हिंडत फिरत होते. जवळपासची तिर्थस्थळे, अष्टविनायक त्यांनी पुढचा महिना काढला.

आता तर मे महिना जाऊन जून सुरू झाला होता. तत्पूर्वी त्यांचे एक मित्र राजाभाऊ उभयता अचानक घरी आले. त्यांच्या सहवासात 15 दिवस छान गेले पण ते गेल्यावर काय?

राजाभाऊंच्या चर्चेतून त्यांना खूप माहिती मिळाली आणि त्यांच्या विचारचक्रानी प्रचंड वेग घेतला. आपण रामपूर सोडावे आणि रत्नागिरीला 8 दिवस मुक्काम करावा एक नव्याने सुरू झालेल्या वृध्दाश्रमात.

ते तेथे पोहोचले आणि रमलेही. त्यांना हवा होता तो त्यांच्या योग्यतेच्या लोकांचा सहवास, वाचनालय, करमणूकीची साधने, निसर्गाचा सहवास, खेळ, गप्पा, त्यांचा पुरा दिवस त्यात व्यतित होऊ लागला. 8 दिवसासाठी आलेले पंजाबराव येथे रूळले. चार महिने निघून केव्हा गेले हे त्यांना समजले नाही.

स्वामींचे एक ध्यान मंदिर त्या 25 बंगल्यांच्या वृध्दाश्रमात बांधले होते. तेथे सकाळ संध्याकाळी होणाऱ्या आरत्या, स्वामींचे गुरूपौर्णिमा व इ. कार्यक्रमात आजकाल रमले होते.

तसे पाहिले तर संपूर्ण 65 वर्षाच्या जीवनमानात असा आलेला फरक. त्यांना खूपच भावला होता. मागचे पान पलटावे आणि नव्या पानावर आपले आयुष्य नव्याने सुरू करावे आणि त्यात रममाण व्हावे. असा फरक त्यांच्यात त्यांच्या रोजच्या वागण्यात, पडलेला जाणवत होता.

बरे ते छोटेखानी बंगले सर्व सुखसोईंनी परिपूर्ण होते. त्यात सगळ्या सुखसोयी होत्याच. आधुनिक किचन, नवा टी.व्ही, स्वच्छ वातावरण, बंगल्यासमोर फुलांनी उभारलेले गार्डन, खूप भावले होते त्यांना मागची सारी दुःखांची झालर पार विरघळून गेली होती.

शरीर मन ताजेतवाने झाले आहे हे त्यांचे त्यांना स्वतःला जाणवत होते. प्रपंचातली कुटुंब, कलहाची सारी प्रकरणे ते आता विसरले होते. पत्नीच्या

a

वियोगानंतर आलेले नैराश्य आता ते विसरले होते. आता त्यांच्या जगण्याला खरोखर पालवी फुटली होती. हा सगळा बदल या वृध्दाश्रमाच्या परिसरात आल्यावरच घडला होता एवढे मात्र खरे.

त्याचवेळी अक्कलकोट येथून स्वामी समर्थ मठाचे एक सद्गुरूंचे आगमन वृध्दाश्रमात झाले. सद्गुरू चंद्रसेन महाराज या 25 बंगल्यात राहाणाऱ्या 40 वृध्द लोकांनी त्यांचा अनुग्रह घेतला. 4/5 दिवस त्यांचे वास्तव्य या वृध्दाश्रमात होते. त्यांनाही हा परिसर खूप आवडला. ते आल्यापासून त्या मठात किर्तने होत. आता पंजाबरावांच्या जीवनात पार बदल झालेला त्यांना जाणवत होता. परिसाचा दगड आपल्याला सापडला आहे. असा भास त्यांना क्षणोक्षणी जाणवू लागला होता. खूप आनंदात, ते होते एवढे मात्र खरे.

आठवडाभरात राजाभाऊ व उभयता यांचे आगमन या वृध्दाश्रमात पुनः झाले. खरेतर या वृध्दाश्रमाचा विचार पंजाबरावांच्या मनात पेरला गेला आणि त्याला गोमटी फळे आली आहेत. असा फरक राजाभाऊ उभयताना जाणवत होते. हरवलेले सापडले असा फरक राजाभाऊंना जाणवत होता. पंजाबरावांच्या दिनचर्येत, विचारधारेत, आमुलाग्र बदल राजाभाऊना जाणवला.

याच परिसरात अभ्यागतांसाठी दोन वेगवेगळे ‘सूट’ ठेवण्यात आले होते. तेथे राजाभाऊ कुटुंबी यांचे वास्तव्य होते. तरीपण त्यांचा पुरा दिवस पंजाबरावांच्या सानिध्यात जात होता.

या सगळ्याचा नाही म्हटले तरी परिणाम राजाभाऊंवर झाला होताच. या कुटुंबाला आवडू लागला होता हा परिसर, येथील व्यवस्था.

a

या वृध्दाश्रमातील लोकांसाठी याच परिसरात छान मेस होती. नेहमी गोडधोड व्हायचे. उत्तम जेवणाची व्यवस्था होती. सारे काही अगदी काटेकोर जगणे, राजाभाऊंना खूप भावले.

गेल्याच वर्षी त्यांच्या लहान मुलीचा विवाह झाला. त्यांना दोन मुली. आता हे कुटुंब अगदी मोकळे होते. तब्बेत ठीक होती. सातत्याने त्यांची देवदर्शन, वेगवेगळया परिसराचा आस्वाद घेण्यासाठी जाणे होत होते. पंजाबरावही अनेकवेळा त्यांच्यासोबत जात.

मुख्य म्हणजे या वृध्दाश्रमातील वयस्क वृध्द लोकांसाठी संचालकांनी दर रविवारी डॉक्टरांच्या मार्फत तपासणीची व्यवस्था केली होती. औषध पाण्याची व्यवस्था केली होती. तेव्हा या परिसरातील 25 बंगल्यातील लोक निश्चिंत होते. सुखी होते. शिवाय जवळपास लाईफ-केअर, अपरांत यासारखी अद्ययावत सोईंनी उपलब्ध हॉस्पिटल होती. थोडक्यात जीवनाची सुरक्षितता येथील लोकांना मिळत होती.

हे सगळे पाहिल्यावर राजाभाऊसारखा चाणाक्ष रसिकांच्या मनात हा वृध्दाश्रम अगदी पुरेपूर उतरला होता आणि ज्याप्रमाणे एखादा रसिक त्या वातावरणात एकरूप होता. तशी अवस्था राजाभाऊंची झाली होती. त्यांच्या पत्नीही अगदी ठरवून जावे तशी या वातावरणाशी एकरूप झाली होती.

एक दिवस संध्याकाळी गप्पांचा डाव रंगला होता.

“काय राजाभाऊ तुम्ही आल्याला महिना होऊन गेला. तुम्ही आला होतात एका आठवड्यासाठी आणि हा हा म्हणता दिवस कसे गेले समजलेच नाही” पंजाबराव

“तुम्ही म्हणता ते खरे हो भाऊ. आमचे पाय येथून मुंबईतील गिरगावच्या खुराड्याकडे वळायला तयार नाहीत. अहो गिरगावच्या 10 बाय 10 च्या जागेत माझा जीव घुटमळला होता. आणि गेल्या महिनाभराच्या येथल्या वास्तव्यात माझे तीन किलो वजन वाढले राव” राजाभाऊ

“अगदी तीच अवस्था माझी झाली आहे. मुली तेथे होत्या. त्यांचे शिक्षण, नोकऱ्या यातून माझ्या निवृत्तीनंतर मला बाहेर निघताच येत नव्हते. पण आता या परिसरात मनाने आपले पंख पिसकारले आहेत. आपण येथून जाऊच नये असे सारखे वाटतेय” पत्नी

“आणि उद्या माझ्या दोन्ही मुली त्यांच्या मुलांसह येत आहेत. त्यांच्याशी चर्चा करू आणि मगच निर्णय घेऊ. पुढच्या महिन्यात आमची राहती गिरगावची जागा ही पुर्नबांधणीसाठी घेतील. ती गेल्यावर अगोदर खाली करावी लागणार आहे.” पत्नी

“आणि मी काय म्हणतो आम्ही कायमचे येथे येऊन रहाण्याचा निर्णय आज रात्रीच घेतला आहे.” राजाभाऊ

“अरे वा, छान मेतकुट जमेल आपले येथे. राजाभाऊ तुमच्या संगीत साधनेचा आस्वाद मात्र येथल्या मंडळीना मिळेल.” मजा येईल. पंजाबराव

a

“खरे सांगु तुमच्या कुटुंबाची एकंदरीत अवस्था मी पाहिली. तुम्ही येथे येण्याचा निर्णय घेतला हा सोळा आणे परफेक्ट ‘तोडगा’ मला पटला. शिवाय मुलांच्या प्रपंचात लूडबूड करण्याची आम्हा दोघांचीही इच्छा नाही.” राजाभाऊ

पंजाबराव अंतरमुख झाले. त्यांनी आपल्या प्रपंचाचे पुर्नवाचन मनातल्या मनात केले.....

“खरे सांगु हा वृध्दाश्रमाचा तोडगा माझ्या जीवनाला वेगळ वळण देऊन गेला आणि आपण येथे आलात तर तो मोठा दुग्धशर्करा योग ठरेल माझ्यासाठी.” पंजाबराव

“पटतय मला ते. आम्ही योग्यवेळी योग्य निर्णय घेऊ.” राजाभाऊ

“आम्ही आमच्या दोन्ही मुलींना हे पटवून देऊ! कसे ?”

आणि हास्याच्या फवाऱ्यात गप्पा संपल्या. रात्री 11 वाजून गेले होते. त्यारात्री राजाभाऊ आणि पत्नी दोघेही याच विचारात हरवले होते !!

|||||

# पोरखेळ

प्रश्न असा पडतो जेव्हा अचानक आजूबाजूच्या घटना घडतात खरोखर स्त्री-पुरुषामधले प्रेम हे खरे असु शकते का ? की नुसत्या शारीरिक आकर्षणाने ही फसवा फसवी चाल जेव्हा जीवघेणी ठरते, कोण कोणाचे जीवाशी खेळते की, हे हसण्यावर नेणे असू शकते का?

लग्नाच्या आणाभाका घेताना कोणी पुढचा विचार करीत नाही. क्षणात बदलतात मने आणि दोन जीव. जे जीवनभर एक दुसऱ्याचे होण्याचे स्वप्न तकलादु असते का? आणि जेव्हा साखरपुडा झाल्यावर मुलांनी नकार कळवणे लग्नाच्या अक्षता पडण्यापूर्वी, हे कितपत योग्य? हा जीवघेणा खेळ त्या मुलीच्या किंवा मुलाच्या मनाचा, समाजाचा, कुटुंबाचा विचार न करता हात वर करणे; याला कृतघ्नता म्हणावे नाहीतर काय? हा 'पोरखेळ' म्हणावा, तर प्रेम इतके तकलादू असू शकते का? अशा घटनांनी आज सारा समाज बेजबाबदार झाला आहे, प्रेमाला काहीच किंमत उरली नाही का?

आजवर आपण पुस्तकातून कवीला, कथा, कादंबऱ्यातून जे उदात्त प्रेमाने भारावून जात आलो त्या विश्वासाला, तडा जाणाऱ्या या घटना म्हणजे प्रेमावरचा विश्वासच उडून जातो. आणि आजची तरुण पिढी कोठे चालली आहे असा प्रश्न सामान्य माणसाला पडतो. प्रेम इतके तकलादु असते का? आपल्या प्रेमाला जीवनभर जपणारी जुनी पिढी खरोखर वेडी होती का?

a

अशा घटनांमध्ये पुरुष नामा निराळा राहतो, पण त्या मुलीचा कोण विचार करणार. तिच्या मानसिकतेतून अनेक दुर्घटना घडताना आपण आज समाजात पाहतो. आत्महत्या हे भयानक पाऊल अनेक मुली उचलतात, आणि आयुष्य संपवतात. जर असे अस्वस्थ जीव धरून बांधून एकत्र आणले तर त्यांचा प्रपंच सुखाचा होईल याची शाश्वती नसते. प्रेम हे आकर्षणाच्या मार्गाने होत असेल तर दोन दिवसात लग्नानंतर संपुष्टात येते आणि अनेक जोडपी विभक्त होण्याचा निर्णय घेतात. तो जर दोघाजणांनी जाणीवपूर्वक विचारपूर्वक घेतला तर ठीक नाहीतर आज आपण पाहतो अशी हजारो प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहून दोघांचेही आयुष्य नासून जाते, याची पर्वा त्यांना नसते. जेव्हा ते नशेत असतात पण वय वाढते तारुण्याचा बहर ओसरतो योग्य जोडीदार मिळत नाही आणि एकाकी जीवनाचे जगणे मरण यातनाच ठरतात.

पण असे घडू नये यासाठी नातेसंबंधातच लग्न व्हावीत, असे मी म्हटलं तर चूक ठरू नये. कारण समाजाचे बंधन दोघांवरही नसते. आणि ही लग्न टिकणे कठीण होऊन बसते.

अशीच एक घटना आमच्या शेजारी घडली. मुलगी खूप शिकलेली, मुलगाही शिकलेला. कोणत्यातरी सेमिनार मध्ये भेटी होतात. भेटीगाठी वाढतात. प्रेमाचे गुऱ्हाळ सुरू होते. ते खरोखरच प्रेम की आकर्षणातून निर्माण झालेली ओढ हे त्या दोन्ही वेड्यांना कळत नव्हते. गेली दोन वर्षे त्यांचे गुटुर गु चालू होते. इथल्या नोकरीत मुलगा खुश नव्हता त्याला अमेरिकेत जावे असे वेडाने पछाडले होते हे त्या मुलीला समजले तेव्हाच तिने सावध व्हायला हवे

होते पण डोळ्यावरच्या प्रेमाच्या भ्रमाने ती भरकटत गेली. त्यांच्या भविष्यातील स्वप्नांचे थेरं वेळेवर जाणून दोघांनी दूर व्हायला हवे होते पण मुलगी बेसावध.

त्या मुलीचे नाव आशा आणि मुलाचे शंभू. काय होते एकदा का मुले मोठी झाली त्यांना पंख फुटले की आई वडिलांचा धाक भीती संपर्क उरत नाही. आणि ते प्रेम नावाच्या वेडात वाहत जातात. भेटीगाठीना, फिरण्यातून जवळ येतात, आणि शारीरिक आकर्षणही कमी होत जाते त्यात आशा आकांक्षांचे स्वप्नाचे ढग त्यांना विचलित करतात. नाही धर बंद राहत दोघात आणि परिणामी पुढचे पाऊल टाकण्यापूर्वी त्या मुलांनी सावध पावले उचलायला हवीत पण असे होत नाही. प्रेमाचे भूत त्यांना पुढे पुढे खेचत नेते आणि अचानक घेतलेल्या निर्णयाने सगळा डोलाराच कोसळतो. मग उरतात ती फक्तच आसवे.

मुलांना फरक पडत नाही भुंग्यासारखी ही जात दुसरी फुले कधीही कोठेही शोधत फिरतात. मरण यातना होतात त्या मुलीला. हे प्रकरण अत्यंत नाजूक अवस्थेतून जात असते. दुसरी स्थळे शोधणे कठीण. साखरपुडा हा विधी अर्ध्या लग्नासारखा होतो. दोन्ही बाजूचे लोकांच्या समोर लग्नाचे हॉल बुक होतात. पत्रिका वाटल्या जातात नातेवाईकांना. इज्जतीचा बभ्रा होतो मुलीच्या, तिच्या आई-वडिलांच्या आणि दुसरा मुलगा तयार होणे कठीण. प्रचंड तणावातून ते घर जात असते. तसेच या मुलीच्या बाबतीत घडले.

पण अशावेळी ही आशा शांत होती. पण गेल्या आठवडाभर तिने घरातून बाहेर पडण्याचे टाळले. ती खंबीर मनाची मुलगी होती, खूप शिकलेली होती. सध्या ती मुंबई विद्यापीठातील प्रोफेसर ची नोकरी सोडून पीएचडी चा अभ्यास करीत होती. तिच्या विषयात पीएचडी करीत होती त्यामुळे पीएचडी

नंतर जगाच्या पाठीवर तिला कोणतेही सन्मानाची नोकरी मिळण्याची शक्यता होती. असा तो विषय अत्यंत दुर्मिळ होता. तिला मुंबई विद्यापीठाव्यतिरिक्त अमेरिकेतील बोस्टन व लंडनच्या हावर्ड विद्यापीठातील विद्वान प्राध्यापकांचे मार्गदर्शनही मिळत होते.

यापूर्वी तिच्या संशोधनाचे अनेक प्रबंध जागतिक कॉन्फरन्स मध्ये मान्यवरांनी प्रशंसिले होते.

लग्नाची तारीख महिनाभरावर होती. शंभू ने लग्न करण्यास नकार दिल्याने थोडीफार नाराजी तिच्या मनात होती. पण तशी तिने खंबीरपणे ही घटना स्वीकारली होती. तिला तिची काळजी नव्हती. कुटुंबातील सदस्यांची चलबिचल मानसिकतेने ती थोडी अस्वस्थ झाली होती एवढेच.

यामधल्या एका महिन्याच्या काळात ती लंडनलाही जाऊन आली होती. येथे येताच तिने आपल्या अनेक नातेवाईकांजवळ संपर्क साधला व त्यांची अस्वस्थता दूर करत कोणी चांगला शिकलेला मुलगा शोधण्यास सांगितले. तिने वडिलांना सांगितले “पत्रिका पुन्हा छापू नका”. हॉलचे बुकिंग रद्द करू नका. माझे लग्न त्याच मुहूर्तावर पार पडेल, पण मुलगा वेगळा असेल. तुम्ही बाकी सगळी तयारी करा.

देशातील आणि परदेशातीलही अनेक उच्च शिक्षित मुलांनी तिच्याशी संपर्क साधला. आता परीक्षा होती आशाची. तिने त्यातील एक स्थळ स्विकारायचे ठरविले. तो मुलगा राज. तो इस्त्रोमध्ये संशोधक होता. घरची परिस्थिती त्याची बेताची होती. पण ध्येय दृष्टी अत्यंत उच्च दर्जाची होती. तो कोकणातला. त्याची फक्त आई होती. अत्यंत कष्टाने त्याने आपली योग्यता

सिध्द केली होती. दोन महिन्यापूर्वी चंद्रावर गेलेल्या यानासाठी त्याचे योगदान मोठे होते. आता तो सूर्य व मंगळावरील यानासाठीच्या 'सोलर' साठी संशोधन करीत होता. आशाने आपली सगळी परिस्थिती व घटना त्याला सांगितली, त्याने होकार कळविला. पण प्रत्यक्ष भेट अजून झाली नव्हती. या स्थळाबाबत तिने फक्त आपल्या वडिलांना कल्पना दिली होती. खरेतर राजला जराही फुरसद नव्हती, संचालाकांना सांगून त्याने तीन दिवसांची रजा घेतली आणि तो मुंबईला आला. त्याने आपल्या आईला मुंबईला बोलावून घेतले.

या सगळ्याची जराही कल्पना आशाने शंभूला कळविली नव्हती. हे ठरलेले लग्न मोडले, अशाच संभ्रमात तो होता. त्याच्या नकार घंटेनंतर त्याने आशालाही फोन, मेल केले नव्हते. पण गेला आठवडाभर तो अस्वस्थ होता आपण हे काय करून बसलो. असाही विचार त्याच्या मनाला सतावीत होता. लग्नाआधी तीन दिवस अगोदर त्यांनी आशाला फोन केला, पण तिने त्याचा मोबाईल नंबर ब्लॉक केलेला त्याला दिसला. त्यामुळे त्याची अस्वस्थता अधिक वाढली. त्याच्या या लग्नाला नकाराचे कारण होते त्याला युएस ला पाठवण्याचे कंपनीचे पत्र. ही ऑफर दोन वर्षासाठी होती. पण याची जराही कल्पना आशाला त्यांनी दिली नव्हती ना त्याच्या नकाराने एवढे मोठे वादळ आशाच्या आयुष्यात येईल याची जराही पर्वा त्यांनी केली नव्हती. त्यामुळेच आशाला त्याच्याबरोबर लग्न न करण्याचा निर्णय घ्यावा लागला होता आणि खंबीरपणे तिने हा विषय नंतर हाताळला.

राज मद्रासहून मुंबईला व विमानतळावरील 'लिबीएस' या हॉटेलला उतरला व त्याने आशाला संपर्क केला. आशा, तिच्या आई-वडिलांनी त्याची

भेट हॉटेलमध्ये घेतली. त्याच भेटीत लग्नाची रूपरेषा आशाने राजला दिली. त्याचवेळी राजची आईही हॉटेलात आली होती. तेथेच राज आणि आशा यांनी एकमेकांना अंगठी घालून त्यांचे वाङनिश्चय साजरा केला.

राज हा उंच पुरा गोरापान, सुंदर चेहऱ्याचा मुलगा आशाला पसंत पडला आणि त्यांनीही आशाला पसंत केले. दुसऱ्या दिवशी लग्नाचा मुहूर्त सकाळी 11 चा होता. राज हॉटेल वरून हॉलवर आईसह पोहोचला. आशाचे कुटुंबीय तत्पूर्वीच हॉलवर पोहोचले होते. उपस्थित मंडळीत फक्त आशाचे नातेवाईक होते. आणि ठरल्या मुहूर्तावर लग्न पार पडले. संध्याकाळचे रिसेप्शन त्यांनी रद्द केले होते. व लग्नानंतर आशा व तिचे कुटुंबीय लिबियस हॉटेलवर आले. सारे कसे अगदी व्यवस्थित पार पडले.

त्याच दिवशी शंभू त्या हॉलमध्ये येऊन गेला. लग्न पार पडले हे त्याला समजले. कारण हॉलच्या दरवाज्यावरील बोर्डवर त्यांच्या ऐवजी राजचे नाव लिहिले आहे त्याला समजले. त्याच्या वाटेला पश्चातापाशिवाय काय येणार?

लग्नाच्या संध्याकाळी आशाचे कुटुंबीय, राज व राजची आई यांना राजने डिनरची ऑर्डर दिली होती. आणि दुसऱ्या दिवशी आशा आणि राज मद्रासला सकाळच्या विमानाने रवाना झाले. हे सगळे घडले ते आशाच्या खंबीरपणामुळे. लग्न हा पोरखेळ नाही हे त्या मूर्ख शंभूला समजायला हवे होते.

आठ दिवसांनी आशा राज मुंबईला आले, आनंदी आशाच्या मनात अधिक आनंदाची घटना घडली ती म्हणजे बोस्टन विद्यापीठाने तिला पीएचडी दिल्याच्या बातमीने. लागोपाठ हॉवर्ड विद्यापीठानेही तिला पीएचडी दिली व

a

विद्यापीठात प्रोफेसरच्या नोकरीची ऑफर दिली. या दोन विद्यापीठांची पीएचडीच्या बातमीने मुंबई विद्यापीठानेही तिला पीएचडी दिली. हा राजशी झालेल्या विवाहाचा पायगुण म्हणायला हवा. संपूर्ण कुटुंब आनंदाच्या डोहात नहात होते.

आशाने मुंबई विद्यापीठातच पी.एच.डी. ची गाईड म्हणून नोकरी स्विकारली. तसेच बोस्टन आणि हॉवर्ड युनिर्व्हसिटीत संशोधक म्हणून भूमिका निभवायची स्विकारली.

खरे तर असे प्रसंग अनेक मुलींच्या जीवनात येतात. पण त्यासाठी खंबीरपणे उभी राहिली आशा, अशाच मुलींचे भले होते. रडत बसणे हा त्यावर उपाय नाही.

शंभू सारख्या प्रेमवीरांचे प्रेम किती तकलादु होते हेच यावरून सिद्ध झाले. समाजातील मुलींनी ‘आशा’ सारखी भूमिका स्वीकारली तर जीवनाचे सोने होईल व जीवन आनंदी करता येईल. लग्न हा ‘पोरखेळ’ नाही हेच खरे. होय की नाही!!

|||||

# पूण्यकर्म

रामपूर अगदी छोटेसे गांव, पण आता आताशा बाळशे धरले होते. गावाचा आमुलाग्र बदल होत गेला. मुळात हे गाव चिपळूण-गुहागर रोडवर. पूर्वी गावात एक प्राथमिक शाळा होती. पण तेथील खासदारांच्या प्रयत्नाने हायस्कूलची योजना सफल झाली. आता आता तर त्या शाळेच्या परिसरात 10/12 वी चे ज्युनियर कॉलेज झाले. “रामपूर एज्युकेशन संस्थेने” चांगले बाळसे घेतले. त्या पंचक्रोशीतली सगळी मुले त्या शाळा कॉलेजात आता शिकत होती. जयंतही त्याच कॉलेजमध्ये शिकत होता.

मुलामुलींसाठी एकच शाळा व वर्गात मुलगे मुली असा फरक नव्हता. आता शाळेत दहावी पर्यंत मुले शिकत होती.

त्याच गावातली प्राथमिक शाळेतली सगळी मुले याच शाळेत जात असतात. त्यातलीच एक रश्मी. दिसायला सुंदर, गोरीपान, हुशार तर होतीच पण शाळेत त्या सगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमात खेळात तीचा समावेश असायचा.

याचवर्षी या पंचक्रोशीत त्या शाळांच्या स्पर्धा भरवल्या गेल्या. कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या सगळ्या खेळांचा समावेश केला होता. रश्मी एक अव्वल ॲथलेटिक. खो-खोत बाप. अर्थात त्यांच्या शाळेने तिचा समावेश या स्पर्धेसाठी केला.

या स्पर्धा होत्या गुहागरला 10/12 किलोमीटरवरच्या सांगले हायस्कूलच्या मैदानावर तीन दिवस चालल्या. रश्मीने आपली चमक या खेळात दाखवून दिली आणि शाळेला छान ट्रॉफ्या मिळवून दिल्या. याच 20 मुलात जयंतचा समावेश होता. त्यावर्षी तो 10 वी ला होता. कबड्डीचा तो कॅप्टन होता. यावर्षी कबड्डीत चिपळूणच्या हायस्कूलचा पराभव करून जयंतच्या टीमने ट्रॉफी जिंकली आणि टीमचे सिलेक्शन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाले. या स्पर्धेत जयंतने त्याच्या टीमला दहा गुण मिळवून दिले व त्याला स्वतंत्र ट्रॉफी देण्यात आली.

सकाळच्या एस.टी. ने ही सगळी मुले गेले तीन दिवस या स्पर्धेला जात होती. अर्थात एसटीत रश्मी आणि जयंतची ओळख झाली. दोघेही खेळात तरबेज. दोस्ती जमली आणि एकमेकांकडे आकर्षित झाले.

रश्मीला त्यावर्षी 14 संपून 15 वर्षे लागले होते. ती अंगाने सुदृढ असल्याने वयाच्या मानाने खूपच मोठी वाटत होती. तिच्या मनात जयंताबद्दल प्रेमाचा अंकूर फुलला होता.

जयंताने यावर्षी 16 वे वर्ष पूर्ण केले होते. 10 वी ला अव्वल मार्कांने पास होऊन जयंताने त्याच शाळेच्या 11 वी सायन्सला प्रवेश घेतला होता.

रश्मी एका शेतकऱ्याची मुलगी. घरची आर्थिक स्थिती फारशी ठिक नव्हती, तर जयंताच्या वडिलांचे त्याच गावात एक मेडिकलचे दुकान होते. म्हणजे थोडे सधन होते ते कुटुंब.

a

तशी त्या दोघांची घरे जवळ-जवळ होती. रश्मी अजून शाळेत शिकत होती. दहावीनंतर कॉलेजमध्ये न जाता रश्मीने टायपिंगचे कोर्स पूर्ण केला आणि तिला डी.एड.ला प्रवेश मिळाल्यावर एक वर्षाचा कोर्स तिने चिपळूणच्या सावर्डे येथील कॉलेजमध्ये पूर्ण केला. त्याच गावच्या प्राथमिक शाळेत रश्मीला नोकरी मिळाली.

गावात रश्मी व जयंत यांच्या भेटीगाठी होत. अगदी लग्नाच्या आणाभाका घेईपर्यंत त्यांची मजल गेली होती. जयंता अत्यंत महत्वाकांक्षी होता. बीएस्सी केल्यावर त्याने चिपळूणच्या अर्बन बँकेत नोकरी धरली. त्याची मनीषा तेथे थांबायची नव्हती. जयंतने अकाऊंटसचे कोर्सेस केले. बाहेरून परीक्षा दिल्यावर आता एचडीएफसी, ॲक्सिस सारख्या बँकेत मोठ्या पगाराची नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्नशील होता.

रश्मी वयाच्या मानाने खूपच थोराड दिसत असे. तिचे कोठेतरी लग्न करून मोकळे व्हावे असे तिच्या वडीलांना वाटत होते. पण रश्मीचे जयंतवरचे प्रेम घरी माहिती नव्हते असे नाही, तिने अनेक स्थळे नाकारली. बाप पार वैतागला होता. तिच्या या नकारघंटेने. तिच्या सौंदर्यासाठी अनेकजण माना टाकीत होते, पण रश्मी पक्की बेरड. ती कोणाच्या ताकास सूर लागून देत नव्हती.

त्यातलाच एक शाम. शामचा जीव होता रश्मीवर. त्याने एक पत्र रश्मीला लिहिले आणि आपले लग्न व्हावे अशी तीव्र इच्छा व्यक्त केली. तोही त्याच शाळेत होता. बिचारा मरत होता रश्मीवर. अधेमधे गाठायचा तो रश्मीला. तोही चांगला शिकलेला होता. गावातल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये तो प्राध्यापक होता. त्याने रश्मीच्या वडीलांना याबाबत विचारले, पण तेही बिचारे सांगून

दमले. शेवटी त्याने रश्मीचा नाद सोडला होता. अजून त्याने लग्न केले नव्हते. तसे पाहिले तर जयंत व शाम समवयस्क बालपणीचे दोस्त. एकाच शाळेत एकाच वर्गात. पण अजून त्यांचे संबंध चांगले टिकून होते.

जयंतची बँकेची ट्रेनींग बेंगलोरला होती. ती संपवून तो रजेवर आला. आता तर या दोन जीवांना चांगला निवांतपणा मिळाला. दिवाळीचे दिवस होते. रश्मीलाही शाळेला रजा होती. दोघांचे राजरोसपणे हिंडणे, फिरणे चालू होते. एकमेकांच्या घरी जाणे-येणेही.

एक दिवस जयंत आणि रश्मी चिपळूणला रंगायन सेंटर मध्ये पिक्चर पहायला गेले. शो रात्री 9 वाजता संपला. पण भले मोठे संकट समोर उभे होते. त्या संध्याकाळी ढगफूटी झाली अर्धे अधिक चिपळूण पाण्यात बुडाले. सगळी वाहतुक केव्हाच बंद झाली होती. एकही वडापवाला रामपूरला यायला तयार नव्हता. अगदी चिपळूण स्टँडवरूनही एस.टी ने गाड्या सोडणे बंद केले. चारी बाजूनी या दोघांची गोची झाली होती. बायपासकडे पाणी अजून आले नव्हते. पण गुहागर रस्त्याला कमरेएवढे पाणी तुंबले होते. शेवटी त्यांनी बायपासजवळच्या छोट्या हॉटेलात आसरा घेतला. जेवणाचा पत्ता नव्हता पण त्यांनी आणलेल्या वडापाववर त्यानी रात्र काढली.

आज त्यांना एकांत मिळाला होता. पण त्याच एकांताने घात केला. बाहेर पाऊस पडत होता. आणि त्याच निरव शांततेत तापलेले दोन जीव एकरूप झाले. त्या नशेत आपण काय करतोय याचे भान त्यांना राहिले नव्हते. पण नंतर रश्मीला आपली चूक कळून आली. आपण आपले शारिरीक पावित्र्य गमावून बसलोय हे तिला जाणवले.

जयंतच्या मनात हे लग्न लवकर व्हावे असे वाटत होते. त्याने रश्मीच्या वडिलांना त्याच्या वडीलांमार्फत विचारलेही. पण त्यांनी काहीच उत्तर दिले नव्हते. त्याचे खरे कारण त्या दोन कुटुंबातल्या आर्थिक परिस्थितीमुळे रश्मीच्या वडीलांना स्विकारणे जड जात होते आणि सगळेच फाटले.

आपला आणि जयंतचा आलेला शरीरसंबंध रश्मी कोणाला सांगू शकत नव्हती. घरीही पण मग आता जयंतशिवाय पर्याय नव्हता. त्याच्यावर रश्मीचे नितांत प्रेम होते. त्यानी लग्नाच्या आणाभाका घेतल्या होत्या.

जयंत नव्यानेच एचडीएफसी बँकेत लागला होता आणि त्याची पोस्टींग सांगलीला झाली आणि तो सहा महिने तिकडे अडकला. अधेमधे रश्मी जयंतचे बोलणे मोबाईलवर होई. तेवढेच पण रामपूरला येणे झाले नव्हते.

तो प्रसंग झाल्यापासून रश्मी कमालीची टेंशनमध्ये होती. जर आपली पाळी चूकली तर ? जीवनाची वाताहात होईल. या भितीने तिची झोप उडाली होती. रात्र-रात्र ती जागून काढायची. शेवटी जयंतच तिच्या फोनना कंटाळला आणि त्याने तिच्याशी संपर्क टाळण्यास सुरूवात केली.

पण रश्मीचे नशीब बलत्तर पाच-सहा दिवस पुढे गेले पाळीचे पण पाळी आली. अशा प्रकारांचा बभ्रा व्हायला वेळ लागत नाही. तिने त्यासाठी गुहागरच्या डॉ. उल्का साने या डॉक्टरकडे जाऊन काही औषधे घेतली. खरेतर त्यातूनच तिची सुटका झाली.

दिवाळीचे दिवस आले पण रश्मीच्या दृष्टीने ते बेचव होते. शाळेच्या रजा संपल्या नी पुन्हा शाळा सुरू झाली.

a

एवढ्यात एक नवे संकट येऊन त्याने रश्मीच्या जीवनाचा पार भूसा केला. रात्रीच्या झोपेचे खोबरे झाले अगदी पार म्हणजे पार, घरात पाहुण्यांची वर्दळ वाढली आणि रश्मी कमालीची घाबरली.

रश्मीचा आतेभाऊ पेढांब्याचा शशांक अचानक दुबईहून तिच्या घरी आला. तो यायचा मामाच्या घरी लहानपणी. पण मग शिक्षण, नोकरी यात अडकला तो पार. 5/6 वर्षांनी तो रामपूरला आला होता.

येथे येताच रश्मी त्याच्या दृष्टीस पडली. आणि त्याच्या विचारचक्रांना चालना मिळाली. एक तर मामाची मुलगी, सुंदर पण फिदा झाला तो तिच्या सौंदर्यावर आणि त्याच रात्री मामाना शशांकने विचारले लग्नाबाबत.

मामालाही आनंद झाला. मुलगा दुबईला चांगली नोकरी. आर्थिक स्थिती चांगली. तो राजबिंडा होता, काहीच कमी नव्हते त्यात. रश्मीच्या वडिलांनी रात्री ही गोष्ट तिच्या कानावर घातली. वडिलांना हे स्थळ पसंत होते. पण रश्मी मात्र यासाठी तयार नव्हती. तिने त्यांना नकार दिला आणि वडिलांना साफ नकार कळवला. तिने जयंतवर असलेल्या तिच्या प्रेमाचा पुर्नरूच्चार केला आणि बापाच्या मस्तकात कळ गेली. मोठा राडा झाला त्यारात्री. रश्मीने स्वतःला आपल्या रूममध्ये बंद करून घेतले. प्रचंड टेंशन रश्मीला आले होते आणि त्यात भर म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळी शशांकचे आई-वडिल, बहिण, भाऊ सगळी मंडळी रश्मीच्या घरी आले.

सकाळी 11 वाजले तरी रश्मी रूममधून बाहेर आली नव्हती. आता पुढे काय करावे. जयंतचा संपर्क नव्हता बँकेच्या कामाच्या वेळात तो फोन सायलेंटवर ठेवायचा आणि त्यादिवशी तर त्याने फोन ऑन केला नव्हता.

a

रात्री रश्मी जेवली नव्हती सकाळीही काही खाल्ले नव्हते. विचारानी तिच्या डोक्याचा भुगा झाला होता. आपण आपले शरीर जयंतच्या हवाली केले होते. त्याचे पावित्र्य राहिले नव्हते आणि शशांकला ती जराही स्विकारायला तयार नव्हती. तसे तिचे प्रेम त्याच्यावर नव्हतेच. रामपूरात असताना तो सारखा तिच्याभोवती पिंगा घालीत होता. तो कधीच तिच्या मनात भरला नव्हता. तिने मनोमन जयंतलाच पसंत केले होते आणि आपले सर्वस्व त्याला अर्पण केले होते. कोणत्याही परिस्थितीत आपण शशांकचा स्विकार करायचा नाही हे तिने मनोमन ठरवले होते. पण आजच्या घरातल्या गोंधळात तिची मानसिक स्थिती पार बिघडून गेली होती. आता तिच्या मनात नको नको ते विचार थैमान घालीत होते. आपण आत्महत्या करावी असाही विचार तिच्या मनाला स्पर्शून गेला, पण आपणास जयंत का फोन करीत नाही असाही विचार तिच्या मनात येऊन गेला. जयंताविण जगणे म्हणजे व्यभिचार या विचारांनी तिला ग्लानी आली. केव्हातरी तीन वाजता तिला जाग आली. दुसरा विचार म्हणजे या आजच्या ब्यादितून सुटकेसाठी आपण कुठेतरी पळून जावे असाही विचार तिच्या मनात येऊन गेला. आताच्या प्राप्त परिस्थितीत तोच एक उपाय तिला योग्य वाटला आणि शशांकच्या घरची मंडळी, शशांक दुपारी निघून गेल्यावर तिने तो विचार पक्का केला. पण जायचे कोठे ? तो गाव तसा लहान. तिच्या अनेक मैत्रीणी त्या गावात होत्या. पण या गोष्टीचा बभ्रा नको म्हणून आपले पाय फुटतील तिकडे निघून जावे आणि आपले नशीब आजमवावे म्हणून तिने शाळेतून एक महिन्याची रजा घेतली. जुजबी कपडे व पैसे घेऊन रश्मी घरातून निघून गेली. आपण प्रथम सांगलीला जावे जयंतला भेटावे यासाठी तिने चिपळूणला येऊन

सांगलीची गाडी पकडली. त्यावेळी रात्रीचे 9॥ वाजले होते. रात्रीचा प्रवास शेजारी एक पुरूष, त्यांचे सारखे धक्के बसत होते म्हणून तिने कंडक्टरला सांगून जागा बदलली.

“ओ ताई, इथे माझ्या बाजूला बसा. काही काळजी करू नका.” कंडक्टर

रश्मीने जागा बदलली नी त्या कंडक्टरजवळ येऊन बसली पुन्हा तोच प्रकार, तिला कळाले बाईमाणूस आजच्या जगात काही सुरक्षीत नाही. हे त्या दिवशी तिला समजले. त्यात डोळा कधी लागला हे तिलाच समजले नाही.

रात्री 4 वाजता ती सांगली स्टँडवर उतरली. खूप काळोख होता बाहेर. उजाडायला 7 वाजले. रश्मीने कँटीनमध्ये जाऊन चहा घेतला. आणि मग जयंतला भेटण्यासाठी एचडीएफसी बँकेचा प्रथम शोध घ्यावा असे ठरवून बँकेच्या दरवाजाजवळ बसली ती एमआयसीटीची शाखा होती.

11 वाजता दरवाजे उघडले. तिने मॅनेजरकडे जाऊन चौकशी केली तर ज्या शाखेत जयंत होता ती एका खेड्यातली होती. तिने जयंतला फोन केला पण सतत एंगेज किंवा ‘आऊट ऑफ कव्हरेज’ असा मेसेज येत होता. ती पुन्हा एसटी स्टँडवर आली तर त्या गावात जाणाऱ्या दोनच गाड्या सकाळी 10 ची आणि संध्याकाळी 6 वाजताची. म्हणजे आता 11॥ वाजले होते. संध्याकाळी ती पोहोचू शकत नव्हती. कारण बँक 5 ला बंद होते. शिवाय सांगलीपासून 40 किमी वर ते गाव. म्हणजे रात्री 8॥ वाजता पोहोचणार. शिवाय जयंतचा राहण्याचा पत्ताही माहिती नव्हता. ती पार गोंधळून गेली होती.

शेवटी 5 ची गाडी पकडून रश्मी निघाली. रात्री 8॥ वाजता गाडी राळेगणतीगावांत पोहोचली. ती एसटीची गाडी रात्री वस्तीला राहायची आणि पुन्हा सकाळी 7 वाजता निघून सांगलीत यायची.

रश्मी जेव्हा त्या गावात उतरली तेव्हा बाहेर मिट्ट काळोख होता. शिवाय सोबत बॅटरीही नव्हती. एसटीची लाईट गेली आणि काळया कुट्ट अंधाराने तिला गिळले. थोडावेळ ती एका मोडक्या बाकड्यावर बसून होती, कोणी येत आहे का पाहत. पण कोणीही फिरकले नाही. रात्रीचे 10 वाजले होते. रश्मीच्या पोटात भुकेचा डोंब उठला होता. आता या रात्री कोठे जायचे? ती पुरती घाबरली होती.

एसटी स्टॉपच्या बाजूला एक घर होते. अगदी छोटेखानी. त्यात दिवा मिणमिणताना दिसला. ती उठली आणि त्या घराजवळ जाऊन घराची कडी वाजवली दरवाजा उघडण्याआधी एका स्त्रीचा आवाज आला.

“कोण आहे?” ती स्त्री

“मी, चिपळूणवरून आली आहे, दार उघडा.” रश्मी

हो म्हणत त्या स्त्रीने दरवाजा उघडला. ती एक थोराड मध्यम वयस्क स्त्री होती.

रश्मी त्या घरात आली, आणि त्या बाईला सगळी हकीकत सांगितली.

“मला आज येथे आसरा द्या, मी उद्या सकाळी निघून जाईन.” रश्मी

तिने रश्मीला जेवण दिले आणि घराच्या आऊट हाऊसमध्ये झोपायला सांगितले. तो शुक्रवार होता. सकाळी रश्मीने त्या स्त्रीचे आभार मानले. रश्मीला

त्या स्त्रीची वागणूक काही ठीक वाटली नाही. ती सारखी सारखी तिच्याकडे पहात होती. सुंदर रश्मीला तिच्या डोळ्यातले भाव काही विचित्र वाटले.

तो गाव तसा मोठा होता. पण वस्ती विरळ होती. गावात रस्त्याला लाईट नव्हती. एक बकाळ गाव आहे हे तिला जाणवले. आता जयंत त्याच गावात कोठेतरी राहत असावा असे तिला वाटले तिने सर्वत्र चौकशी केली पण जयंतचा शोध लागेना. पण बँक मात्र सापडली.

तो शनिवार होता. जयंतचा शोध लागेना. पण त्याच्या एका बँकेतल्या माणसांकडून जयंतचा पत्ता मिळाला. तो दुसऱ्या शहर वजा गावात रहात होता. तो गाव तिथे जवळ पण 6/7 किमी वर होते. रश्मीने तेथे जायचे ठरवले. पण काही साधन वा वडाप नव्हते. ती पुन्हा त्या बाईच्या घरी आली.

त्यावेळी त्या घरात दोन पुरूष आले होते. त्या बाईची नजर संशयास्पद जाणवली रश्मीला.

“ओ, गजाभाऊ हिला त्या गावात नेऊन सोडा.” बाई

रश्मीला दुसरा उपाय नव्हता. ती त्याच्या गाडीवरून तिला घेऊन गेला.

“मी तुम्हाला त्या गावात सोडेन तुम्ही तुमच्या माणसाला शोधा.” तो पुरूष

सहा सात किमी चे अंतर एक तास झाला तरी संपेना.

“भाऊ अहो आपण गेला एक तास प्रवास केला ते गाव का लागत नाही?” रश्मी

a

त्याने काहीच उत्तर दिले नाही. आणि 1॥ तासानंतर एक छान टुमदार गाव लागले. या गावात येताच त्या गृहस्थानी...

“तुला मी माझ्या बहिणीकडे सोडतो,” गृहस्थ

असे सांगून पलायन केले रश्मी तेथे आली तेव्हा 3 वाजले होते. तिला उत्सुकता होती ती जयंतला शोधण्याची. पण हे गाव तर वेगळे होते. आता तिच्या पुढे मोठे संकट उभे राहिले होते. त्या गृहस्थाने तिला पार फसवले होते.

तेथे आल्यावर ती प्रथम बाथरूमला गेली. बाहेर येताच तिने पाहिले 4/5 रूम तेथे तयार करण्यात आले होते. तेथे आल्यावर... त्या घर मालकिणीला तिने विचारले,

“ताई हे रूम भाड्याने देता का? कोण राहतात येथे ?” रश्मी

“कळेलच तुला,” ती बाई

संध्याकाळी निरनिराळ्या मुली, पुरूष यांची वर्दळ वाढली. रश्मी ‘आऊट हाऊस’ मध्ये एका खुर्चीत बसली होती. तिने त्या लोकांचे संवाद ऐकले आणि आपण चुकीच्या जागेत आलो आहे हे तिला जाणवले.

“तू नविन आहेस का येथे? आज आम्ही तुला प्रथमच पाहत आहोत.” त्यातली एक मुलगी

“हो, मी आता दुपारी येथे आले आहे.” रश्मी

“ताई तुम्ही येथे राहता का?”

“नाही धंदा करतो,” ती मुलगी

हे ऐकून रश्मीच्या पायाखालची जमीन सरकल्याचा भास झाला. आपणाला चूकीच्या ठिकाणी त्या गृहस्थाने सोडले. कदाचित आपण धंद्यासाठी विकले गेलो आहोत हे तिने ओळखले.

एवढ्यात ती घरवाली तिच्या जवळ आली.

“कशी आहेस? नाव काय तुझे? बाळा”

पण रश्मीच्या तोंडातून शब्द फुटेना

“माझी तब्बेत ठीक नाही. आजपासूनच माझे पिरीयड सुरू झाले आहेत. पाच-सहा दिवस तरी त्रास होतो” रश्मी

असे ठोकून देताच ती बाई तिच्यापासून दूर उठून गेली. रश्मीला हायसे वाटले. आता आपली सुटका कशी होणार, हिच विवंचना तिला होती. मार्गतर कठीण दिसतोय, 5/6 दिवस ठीक पण मग काय ? आपण आलो जयंतच्या शोधात आणि या संकटात सापडलो. त्या रात्री तिला झोप लागली नाही. प्रचंड ताण तिला जाणवू लागला होता. ती सतत देवाची प्रार्थना करीत होती. खरोखर घरून पळून जाण्याचा तिचा निर्णय चुकीचा आहे हे तिच्या आता ध्यानात आले होते.

शशांक एक सिव्हील इंजिनिअर होता. चांगला पगार होता दुबईत. पण रश्मीच्या प्रकरणानंतर त्याचे मन काही दुबईत लागेना. शेवट त्याने येथूनच राजीनामा दिला आणि सांगलीत चालू असलेल्या धरणाच्या कामातील L&T या मोठ्या कंपनीत नोकरीला लागला. सांगलीत आल्यावर शशांक पूर्णपणे बदलला त्याला वेगवेगळे नाद लागले, दारू पिणे, बाईचा नादही लागला होता.

a

तो नियमितपणे दर रविवारी सांगलीतल्या राजावाडीत जायचा. अगदी नित्यनियमाने. याच कुंदणखाण्यात ‘सायली’ नावाची मुलगीच्या तो प्रेमातही पडला. त्यांचे बाहेर हिंडणे फिरणे चालू होते. शशांक तिचे पहिले गिऱ्हाईक तेव्हापासून त्याच्या व्यतिरिक्त ती कोणालाही उभे करीत नसे. ती रश्मीच्याच घरात होती. शशांक रहायला होता त्याच कॉलनीत जयंतही राहत होता. त्यांच्या भेटीगाठी होत. पण शशांकने आपल्या या प्रकरणाबद्दल कधीही चकार शब्दही काढला नव्हता. पण एकमेकांकडे जाणे-येणे होते.

“उद्या रविवारी आपण सांगलीत जाऊ. तुला काही तरी वेगळा अनुभव येईल.” शशांक

“ठीक मी मोकळा आहे, तू माझ्याकडे ये वा फोन कर. मी माझी गाडी सोबत घेतो. प्रथम दुपारी एक चित्रपट पाहू आणि मग जेवण करूनच घरी परतु चालेल ना.” जयंत

“हो, का नाही, तुला मी एक गंमत दाखवणार आहे.” शशांक

“काय?” जयंत

“ते आता नाही सांगणार.” शशांक

“बर बाबा” जयंत तरीपण

मी म्हणतो काय एवढे सिक्रेट आहे जे मला सांगण्यासारखे नाही.

तो विभाग चांदणी बाजार म्हणून फेमस होता. जयंत तिकडे कधी फिरकला नव्हता. त्या रात्री खरे तर जयंतला जराही झोप लागली नाही.

शिवाय शशांकच्या या छंदाविषयी त्याला काहीच कल्पना नव्हती. हा छंद शशांकला जडला तो दुबईत. आणि मग तो सांगलीला आल्यावर अनेक चंगीफंगींच्या सहवासात आला आणि बिघडलाच. पण तरीही तो येई तो सायलीसाठी. ती सुंदर होती. बांधेसुद शरीरयष्टी, गोरापान रंग आणि खूप शिकलेली. तिचे पहिले लग्न झाले होते पण डायव्होर्स झाला आणि पोटासाठी हे काम तिने स्विकारले. ना माहेरचे ना सासरचे लोक तिच्या बाजूने उभे राहिले. हे भोग तिच्या वाट्याला आले. पण शशांकशी तिचे मेतकूट जमले आणि प्रेमाच्या आणाभाका झाल्या. तिच्या शरीरापासून दूर होता तिच्याशी लग्न करावे असे त्याला वाटत होते. पण विचार पक्का होत नव्हता, शंकासुराने त्याला ग्रासले होते.

रश्मी शनिवारी त्या कोठीवर आली. दुसरा दिवस रविवार. सायली आणि रश्मी त्याच ठिकाणी होत्या. शनिवारच्या रात्री सायलीने आपली कर्मकहाणी तिला सांगितली आणि मजबूरी म्हणून हा व्यवसाय स्विकारला दोन महिन्यापूर्वी. रश्मीनेही आपण कोणत्या परिस्थितीत येथे आलो. तिला त्या गृहस्थाने विकले आहे, हे सायलीकडूनच समजले होते. प्रचंड नैराश्य आणि टेंशन रश्मीला आले होते.

या रविवारी संध्याकाळी जयंत, शशांक यांच्या गाड्या येऊन त्या कोठीसमोर थांबल्या. घर चांगले एक मजली होते. खाली लहान लहान सुसज्ज खोल्या होत्या आणि मालकीण पहिल्या मजल्यावर राहत होत्या.

शशांक येणार याची खबर सायलीला होती. ते दोघे आले तेव्हा 6॥ वाजले होते. प्रथम शशांक आत गेला. कारण शशांकचे स्वागत एका मुलीने

a

केले ती सायली आणि तिने शशांकचा हात धरून त्याला आत ओढत नेणार एवढ्यात जयंत आत आला. शशांकची नजर रश्मीकडे नव्हती. पण जयंत आत येताच तेथे ठेवलेल्या बाकड्यावर बसण्यासाठी तो वळणार एवढ्यात त्याची नजर रश्मीकडे गेली. चक्रावला तो. ही येथे कशी रश्मीनेही जयंतला पाहिले आणि त्याला मिठीच मारली. रश्मी काकुळत्या स्वरात जयंतला सांगत होती.

"मी फसवले गेले आहे रे, माझा कोणत्याही पुरूषाशी संबंध आला नाही मी पवित्र आहे. मला येथून घेऊन चला." रश्मी

ही सगळी बोलाचाली ऐकून शशांक, सायली आणि कोठावाली बाई जमा झाले. रश्मीने जयंताचे पाय धरले.

"अरे! मी पवित्र आहे. विचार या बाईला." रश्मी

जयंतही गोंधळला होता या अचानक झालेल्या गोंगाटाने...

जयंतने रश्मीला वर उठवले. तिचे डोळे पुसले. तिला सावरले. रश्मी बोलतच होती, ती येथे कशी पोहोचली. ही कर्मकहाणी. रश्मीला आश्वस्थ करीत जयंत म्हणाला...

"ठीक आहे आपण निघू येथून आणि जाऊ माझ्या फ्लॅटवर." जयंत

एवढ्यात शशांक जयंत जवळ आला आणि म्हणाला,

"रश्मी तू काळजी करू नको आपण आजच येथून निघू." शशांक

त्यावेळी सायली शशांकला चिकटली होती...

"मी ही येते, शशांक मलाही येथून सोडव या नरकातून" सायली

a

रश्मीला सगळ्या गोष्टींचा उलगडा होत गेला.

एवढ्यात ती कोठेवाली बाई समोर आली....

“तुम्ही न्या यांना पण माझी रक्कम टाका.” बाई

“दोघींचे किती झाले ?”

“पंधरा हजार” ती बाई

ठीक म्हणत शशांकने तिची रक्कम जीपे ने पेड केली आणि ती चौघेही त्या घरातून बाहेर आले.

जयंत रश्मीला घेऊन त्याच्या फ्लॅटवर आला. घरात येताच रश्मीला रडू कोसळले. तिने देवाचे आभार मानले.

पण आता पुढे काय. जयंत काय निर्णय घेतोय तिने पुढे होऊन जयंतला घट्ट मिठी मारली आणि बराच वेळ ओक्साबोक्शी रडू लागली.

जयंत तू माझा स्विकार करशील ना ? की पुन्हा सोडशील वाऱ्यावर या गंदगीच्या दलदलीत.

जयंत काहीच बोलला नाही.

खानावळीतून डबा आला होता. दोघांनी थोडे थोडे खाल्ले. अबोल होती दोघही.

“जयंत, तू खरोखरच मला स्विकारशील ना?” रश्मी

आतापर्यंत गोंधळलेला शशांक स्थिर झाला होता.

"स्विकारीन! जरूर! आपण लग्न करू 2/3 दिवसात. मी बँकेतून रजा घेतो." जयंत

जयंतने शशांकला म्हटले 'उद्या भेट' आपणास काही महत्वाचे निर्णय घ्यायचे आहेत !

रात्र झाली होती. 11 वाजून गेले होते. काही काळ रश्मी-जयंत बोलत बसले. सकाळी सोमवार होता. जयंतला ऑफीसला जायचे होते. एक आठवडाभराची रजा घ्यायला. तशी ब्रँच लहान होती जयंत असिस्टंट मॅनेजर होता. मुख्य ब्रँच सांगलीत, आंबेडकर रोडवर होती. त्याला मुख्य ब्रँचला मेल करून कोणातरी सबस्टीट्यूटची मागणीही करायची होती.

"रश्मी! आता खूप उशीर झालाय. आता मी म्हणतो आपण झोपुया!" जयंत

"मी कोठे झोपू?" रश्मी

"अर्थात आतल्या बेडरूममध्ये. लग्न होईपर्यंत आपण दूरच राहिलेले बरं. मी येथे सोफ्यावर झोपेन!" जयंत

एक चूक झाली आता पुन्हा नाही. मी माझ्या आईला बोलावले आहे. ती उद्या येईल.

रश्मीला रात्री जाग आली तेव्हा खूप थंडी होती. तिने आपल्या अंगावरची उबदार चादर त्याच्या अंगावर घातली. आत फारशी थंडी नव्हती. खिडक्या दारे बंद होती म्हणून.

a

सकाळी जेव्हा जयंतला जाग आली त्याने त्याच्या अंगावर घातलेली रग बघितली. तो पाच वाजता उठायचा. जयंतने तो रग बेडरूममध्ये रश्मीच्या अंगावर घातला. क्षणभर बसला तो पलंगावर. त्याने रश्मीच्या चेहऱ्यावरून हात फिरवला. तिला जाग आली. तिने क्षणभर जयंतला कवटाळले. जयंतने सुटका करून घेतली आणि तो योगा करायला हॉलमध्ये आला मग मात्र रश्मीला झोप लागली नाही. म्हणून ती ही उठली. आपली सगळी कामे तिने आटोपली. जयंतचे योगा संपल्यावर त्याने सकाळचे सगळे विधी आटोपले.

रश्मीने दोन कॉफी आणली आणि सोबत मारी बिस्कीट.

“तू घरीच थांब कोठेही जायचे नाही, आपण वैदिक पध्दतीने विवाह करणार आहोत, तारीख ठरवायची आहे, आई 10.30 पर्यंत येईल!” जयंत

“चल मी निघतो !” म्हणत जयंत निघून गेला.

रश्मीने चपाती भाजी केली आणि जयंत आपल्या ऑफीसमध्ये गेला. त्याला आज खूप कामे होती. उद्यापासून तो रजेवर होता.

जयंतने लग्नासाठीचे बुकींग पवित्र विवाह.com या साईटवर केली व विवाह वैदीक पध्दतीने व्हावा असे सुचविला.

त्याच दिवशी शशांक आणि जयंत यांची भेट झाली. त्याने लग्नासाठी बुकींग केल्याचे तो म्हणाला, आणि शशांकच्या डोक्यात ‘आपणही विवाह करावा सायलीशी’ असे मनात पक्के करावे आणि आताच हे काम बुकींगचे करावे... तो ही बातमी जयंतलाही सांगून मोकळा झाला. त्यालाही तीच तारीख मिळाली. त्याच वेळी जयंतची बदली एचडीएफसी च्या नव्या चिपळूण शाखेत

झाल्याचा मेल आला. त्याला खूप आनंद झाला. लग्नाचा सोहळा संपन्न करून चिपळूणला जावे हे त्याने ठरवून कामाला लागला.

जयंतची आईही आली. या घटनेनंतर जयंतच्या मनातली चक्रे मात्र वेगळ्याच विषयाने फिरायला लागली होती. त्याची ट्रान्सफर आली, तो खूष होता. रश्मीची सुटका तर झाली पण सायलीचे काय झाले. बरे झाले आज या नरकातुन तिची सुटका झाली. एक नवे जीवन शशांकमुळे लाभले होते.

तिच्याकडून बऱ्याच गोष्टी त्या कुंटणखाण्यामध्ये आणि त्या परिसरात अडकलेल्या शेकड्याने मुलींच्या नरकयातना कशा होत असतील, कोण स्विकारेल उद्या त्यांना...?

जयंत रश्मी निघणार होते त्याचदिवशी जयंतने सांगलीच्या पोलीस कमिशनरची भेट घेतली. चिपळूणला जाणारी जयंतची गाडी 10.30 ची होती.

जयंतने आपली कर्मकहाणी बरोबर तिथली माहिती त्यांना दिली. कमीशनर महाजन मोठे सज्जन गृहस्थ होते.

चक्रे भरभरून फिरली आणि एका तासात त्या भागात पोलीस कारवाई झाली शेकडो मुलींची सुटका झाली.

ही बातमी जयंतला त्याच्या मित्राने शशांकने मोबाईलवर कळवली. खूप आनंद झाला जयंतला. हे एक ‘पूण्यकर्म’ आपल्या हातून झाले याचाही अभिमान वाटला.

दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये जयंतच्या या पुण्यकर्माची बातमी टीव्हीवरही झळकली.

सांगलीच्या मार्केटमध्ये त्याने विवाहासाठी रश्मीला छान साडी व स्वतःला सलवार त्याच दिवशी खरेदी केली.

दोन्ही जयंत आणि रश्मी तसेच शशांक-सायली यांचे विवाह पार पडले. हेच मोठे पूण्यकर्म रश्मीला जयंतात दिसले.

रश्मीला खूप आनंद झाला. जयंत याने आपल्याला स्विकारले हेच त्याचे मोठेपण. तिने आपली शाळा चालू केली. जयंत दररोज चिपळूण-रामपूर करीत आहे.

शशांकने मात्र आपला संसार सांगलीतच थाटला. तिलाही छान नोकरी लागली. ती संगणक एक्स्पर्ट होती. आता तिच्या कंपनीने एक नवी ब्रँच चिपळूणात उघडली. शशांकने नवा व्यवसाय घरबांधणीचा आणि तोही चिपळूणात स्थाईक झाला.

खरंतर शशांकने जयंतला त्या कुंठनखाण्यात घेऊन गेला आणि चमत्कार झाले दोन्ही रश्मी आणि सायली सारख्या संकटात सापडलेले त्यांची सुटका झाली. अन्यथा रश्मीचे काय झाले असते? हा सगळा योगा-योग म्हणायला हवा. हे एक पुण्यकर्मच शशांकच्या हस्ते घडले. एवढे मात्र खरे ....!! कमीशनरने जयंतला सांगलीत बालावून त्याचा खास सत्कार केला. यावेळी सोबत शशांक होताच तोही पूण्यकर्माचा वाटेकरी होताच ना !!

|||||

# दैवगती

गुहागर तसे राहिले नाही पूर्वीसारखे. तीन-चार कॉलेजेस, शाळा, उत्तम हॉटेल. त्यामुळे गोवाही मार खाईल असे निसर्ग सौंदर्य. पर्यटकांची रेलचेल, पण तेव्हा म्हणजे 25 वर्षापूर्वी तशी परिस्थिती नव्हती.

तेव्हा सावरकर हायस्कूलही एकच शाळा 11 वी पर्यंत. शाळेत मुले-मुली एकत्र शिकत. पण नंतर नंदादीप कॉलेज, डीजेबी ची शाखा झाली, लोकवस्ती वाढली आणि शहराचे स्वरूप यायला लागले.

शशी हा तिथला सरपंचांचा मुलगा. अतिशय हुशार. शाळेत 11 वी ला पहिला आला आणि दापोलीच्या डीजेबी मध्ये सायन्सला शिकू लागला. त्यांचे गाव ताम्हणमळा. येणे-जाणे एसटी वा वडापने व्हायचे. वडापवाले कोंबून मुले भरायचे. मुली पहिल्या आणि मुले. प्रवास तसा लांबचा नसायचा 25 मिनिटाचा असायचा.

मुले मुली ओळखीच्या एका गावातल्या म्हणून. शिवाय नाती-गोतींची जोड त्याला असायची. आज गावाचे शहरीकरण होत गेले, वस्ती वाढली आणि गावाचे समाजकारण बदलले.

शशीच्या घराजवळ त्याच्या मामांचे घर. शेती करीत ते. पण मुली हुशार. त्यांच्या मोठ्या मुलीचे लग्न झाले. सीमा हे त्यांचे शेंडेफळ. हुशार, अत्यंत सुंदर, गुणी मुलगी. शशी आणि ती बरोबरीने वाढली. ती आठवीला

हायस्कूलला गेली आणि त्याचवेळी शशी अकरावी होऊन गुहागरला कॉलेजला गेला.

लहानपणापासून बरोबरीने वाढल्यामुळे शशी आणि सीमा हे दोस्त तर होतेच पण वयमानाने प्रेमाचा उगम दोघांच्याही हृदयात झाला होता.

बारावी नंतर शशी पुण्याला  गेला आणि दोघात दरी निर्माण झाली. तो गावाला येई तेव्हाच तिची भेट होई. पण लाजाळू सीमा आताशा दूरच असायची पण शशीच्या हृदयात तिच्या बद्दलचे प्रेम आता अगदी प्रखर होते. चैन पडत नव्हते तिला भेटण्याशिवाय. रजेवर आल्यावर तो तिच्या आजूबाजूलाच फिरत राहायचा. तिला कॉम्प्युटर शिकवायचा, पण सीमा कोस भर दूर राहणेच पसंत करायची. पण शशी मात्र शंभर टक्के सीमात गुंतला होता. हे मात्र खरे.

सीमा दिसायला सुंदर तेव्हा गावातली अनेक मुले मरायची तिच्यावर. तिच्याशी जवळीक करण्यासाठी प्रयत्न करायची. पण सीमा मात्र भिक घालीत नव्हती कोणालाच. बारावी झाल्यावर सीमाने डी.एड कॉलेजातून दोन वर्षाचा कोर्स पूर्ण केला आणि तिने शिक्षिका म्हणून गावातल्याच शाळेत नोकरी धरली.

अनेक मुलांनी प्रयत्न केले तिला पटवण्याचे पण ती दूरच राहिली. त्यात शशिचा मित्र राजेश आघाडीवर होता. त्याने वडिलांमार्फत लग्नाचा प्रस्तावच पाठवला व पत्रिकाही. पण पत्रिका जमत नाही असे सांगून हे स्थळ नाकारले. सीमालाही तो पसंत नव्हताच. चिपळूणच्या रेव्हेन्यू खात्यात तो नोकरीला होता पण म्हणून काही राजेश तिचा पिच्छा सोडीत नव्हता.

इकडे बीई झाल्यावर शशीने आयएएस होण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या प्रयत्नात तो आयएएसची परीक्षा पास झाला आणि त्याची पोस्टींग मुंबईला झाली. असिस्टंट कमिशनर म्हणून. पण त्याला दिड वर्षाच्या ट्रेनिंगसाठी मसुरीला जावे लागले होते. आणि गावाला येणे थांबले होते. फक्त एकवेळा तो गावाला आला होता. शशीचे वडीलही रेव्हेन्यू खात्यात नायब तहसिलदार होते. तेव्हा त्यांची पोस्टींग नांदेडला होती. शशीला वेळ कमी होता. तेव्हा त्याने मामाकडेच राहण्याचा विचार केला. अर्थात सीमाचा सहवास यात महत्वाचा होता, रोज संध्याकाळी ती दोघे गावातल्या मंदिरात जात. जवळच्याच धोकट्यावर ही त्यांनी एकत्र जाण्याचा विचार केला. खूप मजा आली.

आता तो एक सरकारी अंमलदार म्हणजे कलेक्टर होता. मानाची नोकरी, सरकारी गाडी मग तो कोठेही असेल तरी. त्याचा सार्थ अभिमान सीमाला होता आणि हळूहळू पूर्वीचे सुप्त प्रेम जागे होत गेले, पण ना शशीने ना सीमाने याचा उच्चार केला. शशी मोठ्या संभ्रमात होता. त्याला पुन्हा मुंबईला जाण्यासाठी आठच दिवस बाकी होते. त्याच्या मनाची चलबीचल चालू होती. सिमाच्या मनात काय आहे याचा अंदाज शशीला येत नव्हता. ती कोणा इतर मुलात तर अडकली नसेल ना ? या विवंचनेत शशीचे चार दिवस गेले. एक दिवसच आता शिल्लक होता.

त्या दिवशी शनिवारी शशी संध्याकाळी घरातून एकटाच बाहेर पडला.

“शशी कोठे जाणार आहेस की काय?” सीमा

“जवळच तासाभरात परत येईन ! काय खास काम आहे का?” शशी

“हो, खूप बोलायचे आहे, तुझ्याजवळ खास” सीमा

या तिच्या बोलण्याने शशी पार बुडाला विचारचक्रात. काय बोलायचे असेल हिला, गेली सात दिवस मी येथे आहे, पण सटरफटर बोलण्यापलीकडे काहीच बोलणे झाले नाही. मग खास ते काय ?

याच विचारचक्रात शशीने मंदिर गाठले. त्याचवेळी राजेशही तिथे आला.

“अरे शशी आज इकडे कोठे? आणि एकटाच? सीमा नाही आली !” राजेश

“अरे हो तुझ्या लग्नाचे काय झाले? जमले का?” शशी

“आमचे नशीब एवढे कोठे आहे? शोधतोय! ज्यांच्यावर जीव टाकला ती तर माझ्याकडे बघायला तयार नाही !” राजेश

“कोण एवढी नशीबवान ती ?” शशी

“आपली सीमा!” राजेश

“आपली? नाव नको काढू तिचे, आम्ही कारकून ! तिच्या अपेक्षा मोठ्या असणार ! तुझ्यासारखा कलेक्टर, नाहीतर बँक ऑफीसर !” राजेश

“ते जाऊ दे! तुझे काय चाललेय ? की एखादी साऊथ इंडियन पटवलीस ?” राजेश

“नाही तसे काही नाही !” शशी

a

“तू सीमाचा विचार केलास काय? अरे ती तुझ्या मामाची मुलगी ! गटवायची नाय !” राजेश

“अरे समोरून विचारणा व्हायला हवी ना?” शशी

“मी काय मदत करू शकतो? तिची एक मैत्रीण आहे. तिच्या तर्फे प्रयत्न करतो हे भांडे फोडण्याचा!” राजेश

“माझी आणि सीमाची पत्रिका जमत नाही! तुझी बघ प्रयत्न करून !

“चल! निघूया उद्या निघायचे आहे. कलेक्टरने गाडी पाठवली आहे.” शशी

“बेस्ट ऑफ लक!” राजेश

शशी काहीच बोलला नाही. आणि ते घरी निघाले. शशी घरी आला तेव्हा सात वाजून गेले होते.

“मला का नाही नेलेस मंदिरात? मी मोकळीच होते ना!” सीमा

काही न बोलता शशी आपल्या रूममध्ये गेला.

“का रे कसले टेंशन आहे तुला? गेले 4 दिवस पहातेय मी !” सीमा

“तुला काय त्याचे?” शशी

“काय?” सीमा

शशी काहीच बोलला नाही आणि पुस्तक वाचनात बुडून गेला. पण सिमाने त्याचे पुस्तक ओढून घेतले.

“मला तुझ्याशी बोलायचे खास! आणि उद्या तर तू निघणार!” सीमा

"मग?"

आणि पुढे होऊन तिने शशीचा हात धरला.

"शशी.... आय लव्ह यू !" सीमा.... "मला तुझ्याशी लग्न करायचे आहे. तू कोणा मॅडमच्या प्रेमात नाही ना अडकलास?" सीमा

"अडकलोय! पण आमचा विचार कोण करणार?" शशी

"का? नाही बालपणी केलेले प्रेम मला या गोष्टीला नेहमीच विरोध करीत आले. मी माझ्या प्रेमाशी एकनिष्ठ रहायला भाग जो पाडीत आहे. आम्ही मसुरीला आयएएसच्या ट्रेनींगला असताना अनेक सुंदर स्त्रियांशी कामाच्या निमित्ताने संबंध आले. अनेकजणी मरत होत्या पण मी तसुभरही माझे मन चलबिचल केले नाही !" शशी

"कमाल आहे बुवा तुझी, आणि तुझ्या प्रेमाची आणि एकनिष्ठतेची! आणि माझीही तिच अवस्था आहे. भिती वाटत होती. तू एवढा मोठा कलेक्टर, माझ्यासारख्या... !" सीमा

"असे म्हणू नकोस तू! आपण आजच हा विषय मामांना सांगू आणि हे प्रकरण मार्गी लावू !" शशी

अजूनही सीमाने शशीचा हात सोडला नव्हता. पहिल्या उबदार स्पर्शाची अनुभूती दोघेही घेत होते. मामीने जेवणासाठी बोलावले...

"अरे! जेवायला या रे !

"हो, आई!" सीमा

a

रात्री हा विषय शशीनेच मामाकडे काढला. मामीसोबत होत्या पण सीमा मात्र हॉलमध्ये आली नाही.

“सीमा!” आईने हाक मारली.

सीमा लाजेने चूर झाली होती.

“शशी काय म्हणतोय...!” आई

“मी तयार आहे !” सीमा... आणि घरात निघून गेली... जाता जाता म्हणाली, मी तयार आहे !

सीमाच्या आईने साखर वाटली, घर आनंदाने ओसंडून वहात होते. लग्नाचा बार नोव्हेंबर मध्ये उडाला.

शशीला मुंबईला मोठी कॉर्टर मिळाली होती आणि शशी-सीमा मुंबईला निघून गेले. आता त्याची पोस्टींग मुंबई शहराचा डीवाय. कलेक्टर म्हणून झाली होती. सरकारी गाडी, जेवण करायला खानसामा, सारी सुखे हात जोडून उभी होती.

आणि राजा-राणीचा संसार सुरू झाला. नजर लागेल असा.

त्यानंतर शशीची बदली महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात होत असे. त्याला प्रमोशनही भराभर मिळत होती. हा हा म्हणता वीस वर्षाचा काळ केव्हा गेला समजलेच नाही.

a

पुन्हा शशीची बदली डी.वाय. सेक्रेटरी म्हणून झाली. यात 5/6 वर्षे कधी गेली काहीच समजले नाही. सतत कामाचा ताण, विविध जबाबदाऱ्या शशीला पार पाडाव्या लागत होत्या.

याच काळात शशी-सीमाच्या संसारात दोन मुल झाली. कुटुंबाचा सगळा भार सीमा पार पाडीत होती, मुलांचे शिक्षण, घरची जबाबदारी, शशीच्या व्यस्त कामात त्याच्या प्रकृतीची जबाबदारी तीच पार पाडीत होती.

आणि एकाकी त्यांच्या सोन्यासारख्या संसाराला नजर लागली. कामाच्या ताणामुळे शशीची तब्बेत बिघडली. मुंबई हॉस्पीटल मध्ये डॉ. नरियानी आणि डॉ. बोर्जेस यांनी त्यांची तपासणी केली, सोनोग्राफी केली निदान झाले आणि सीमाच्या प्रपंचाला नजर लागली म्हणायची. प्रचंड नैराश्याने सीमाला ग्रासले पण शशी मात्र एवढे संकट येऊनही स्थिर होता. याला दैवगती नाहीतर काय म्हणायचे?

शशीला नुकतीच कॅन्सरची लागण झाली होती. पण फार सिरीयस मॅटर नव्हता. शशीच्या पोटाच्या डाव्या बाजूच्या आतड्यालाही लागण झाली होती. पण ऑपरेशन करावे लागणार होते. डॉ. नरीयानी ही सर्जरी करणार होते.

मुंबई हॉस्पीटलमध्ये ही शस्त्रक्रीया झाली आणि डॉक्टर सीमाला म्हणाले, “मॅडम तशी सिरीयस गोष्ट नाही, पण तुम्ही सरांची काळजी घ्या. दर महिन्याला हॉस्पिटल मध्ये येऊन सोनोग्राफी करावी लागेल. पुढची 14/15 वर्षे तरी घाबरण्यासारखे नाही. फक्त सतत या आजारावर लक्ष ठेवायला हवे. तो कॅन्सर वाढतोय काय ? तीच एक भिती असते शिवाय कामाचा ताण कमी असावा बस !” डॉ. नरीयानी

या सगळ्या संकटाने सीमा मात्र खचून गेली होती पण शशी स्थिर होता. त्याने आपली पोस्टींग जनसंपर्क विभागात करून घेतली.

नेहमी शशी सीमाला समजावयाचा, धीर द्यायचा, या प्रेमी जीवांच्या जीवनात या संकटाने शिरकाव केला आणि घरातले सगळे वातावरण बदलून गेले. शशीच्या आजारावर तिची नजर होतीच.

वेळच्यावेळी सोनोग्राफी होई, शिवाय महिन्यातून एकदा केमोचा डोस टाटा हॉस्पीटलमध्ये दिला जाई. औषधे वेळच्या वेळी देण्याची काळजी सीमा घेत होती.

या सगळ्या आजारात 8/9 वर्षे निघून गेली. शशी आता वयाची पन्नासी ओलांडून केव्हाच गेला होता. खूप थकवा येऊ लागला होता. अनेक महिने तो मेडीकल रजा मधे मधे घ्यायचा. आताशा त्याला कामाचा ताण सहन होत नव्हता.

त्यामुळे सीमाला खूपच टेंशन आले होते. आपल्या सुखाच्या संसाराला कोणाची नजर लागली माहिती नव्हती. नव्हे हा दैवगतीचा खेळच म्हणायचा. नाहीतर काय ?

आता शशीचा आजार बळावला. औषधे साथ देईनात. अन्न जाईना. तब्बेत दिवसेंदिवस खालावत चालली होती. शेवटी हॉस्पीटलमध्ये डॉ. नरीयानी त्या दोघांना धोक्याची सुचना दिली.

“साहेब आता तुम्हाला, खूप जपायला हवे. यातून आता बरे होण्याच्या आशा कमी आहेत. पुढचे सहा महिने कठीण आहेत !” डॉ. नरियानी

हे ऐकून सीमाला प्रचंड टेंशन आले. त्याच अवस्थेत ती आपल्या घरी आली, पण गाडीत मात्र ती रडतच होती.

हा खरोखरच दैवगतीचा खेळ होता एवढे खरे. अर्ध्या ताटावरून शशीचे काही बरे-वाईट झाले तर ?

खूप खचून गेली होती ती. दिवसभर जपजाप्य, देवांचा धावा ती करीत होती.

शशीने मात्र अंथरूण धरले होते. डॉ. नरियानी म्हणाले होते साहेबांनी जर अंथरूण धरले तर त्यांची मुदत 7 ते 10 दिवसाची. मग हॉस्पिटलला आणू नका.

आणि सीमा पार तुटून गेली होती. सगळा भविष्यकाळ तिला अंधाऱ्या कोठडीसारखा भासत होता.

शशी तीला खूप समजवायचा

“हे पहा सीमा हे जीवन परमेश्वराने दिले... सारे त्याच्याच कृपेने, आज्ञेने घडत असते. जे येईल ते आपणास स्विकारायला हवे. तुला भविष्यात खंबीर रहायला हवे. तुझ्यासमोर खूप जबाबदारी आहे. मुले अजून तशी समंजस नाहीत. त्यांचे शिक्षण अजून चालू आहे. मला खात्री आहे. तू हे सारे चांगल्या प्रकारे निभावशील !” शशी

दिवसभर सीमा त्याच्या बेडजवळ बसून असायची. क्षणभरही शशीला नजरेआड करीत नव्हती. आणि शशीची प्राणज्योत मालवली.

सीमावर आभाळ कोसळले होते. आधाराला दोन मुले होती.

a

हा सगळा दैवगतीचा खेळ आहे हे तिने आता स्विकारले होते. आता आपल्याला खंबीरपणे या सगळ्या परिस्थितीला सामोरे जावे लागणार हे ही ती जाणून होती एवढे मात्र खरे !!

सीमाने या परिस्थितीला सामोरे जाण्याचे ठरवले. महाराष्ट्र सरकारने तिला नोकरीची ऑफर दिली. तिने ती स्विकारली. रहायला सरकारी घर मिळाले. मुलांची शिक्षणाची सोय झाली होती.

शशि गेला तेव्हा 45 वर्षांची होती. तिने आपली सर्व्हिस पूर्ण केली व निवृत्त झाली. मुलींची लग्न केली. पण आता एकटीचे जीवन तिची पाठ सोडत नव्हते. त्यात तिच्या दोन्ही किडण्या काम करीनाशा झाल्या. यावेळी तिला कोणाची साथ नव्हती. मुली परदेशी. पण प्राप्त परिस्थितीला सामोरे जात या दैवाच्या फेऱ्याला तिने पायाखाली चिरडले. आजारपणाला तोंड देत राहिली.

आता तिने सत्तरी पार केली होती नी दैवाने पाठ फिरविली. एका मुलीने तिला आपली एक किडणी दिली आणि आता सीमाचे जीवन सुरळीत चालू होते. त्यात दैवाच्या फेऱ्यानेही तिच्या हिंमतीपुढे हार खाल्ली होती !!

|||||

# स्वप्नातला गाव

समाजाची बिघडलेली घडी बघून आज भविष्यात परिस्थिति काय असेल याचा अंदाज बांधताना अत्यंत भयानक चित्र समोर येते आणि डोके भिरभिरते.

आज नैतिकता, भ्रष्टाचार, चोरी, चपाटी, बलात्कार, फसवणूक याच्याच बातम्या दूरदर्शनवर दिसतात.

राजकारण्यानी तर पार कहर केलाय. तळागाळापासून बोकाळलेला भ्रष्टाचार पराकोटीला गेला. शैक्षणिकक्षेत्र, उद्योगक्षेंत्र, कशा कशाचा म्हणून उल्लेख करावा.

कुटुंब व्यवस्था पार दुंभगलेय. पूर्वीची एकत्र कुटुंब नावालाही सापडत नाही. नैतिकतेने तर तळ गाठलाय. आशेचा किरण नाही दिसत कोणत्याही क्षेत्रात. याला जबाबदार कोण? आपणच ना?

त्यात कुटुंबव्यवस्थेला किड लागलेय. भावाभावातले, वडील-मुलातले संबंध तर इतके ताणले गेले आहेत याचे वैशम्य वाटते आहे. कोणत्याही क्षेत्रात नजर फिरवली तरी आशेचा किरण नाही दिसत. मग समाजाचे भवितव्य ते काय?

a

नवी पिढी पहा. त्यांचे बोलणे, वागणे, कपडे, अनैतिकतेकडे झुकलेली मानसिकता पाहून आपण कोणत्या दिशेला जाणार आहोत याचा अंदाज येतो. कुटुंब कलहातून दिसणारी उद्याची अवस्था कुठे झुकतेय ?

राजकारण्यांनी तर कहर केलाय, समाजाच्या फायद्यासाठी, कोणीही विचार करीत नाही. बस स्वार्थ, पार भ्रष्टतेच्या वेढ्यात समाज अडकलाय आरपार.

या सगळ्याचा परिणाम म्हणून आमच्या गावातल्या शंकर याच्या मनावर खोलवर परिणाम झाला. आणि आपण गावासाठी काही तरी करून निदान आपल्या गावाची परिस्थिती तरी बदलू शकतो काय ? या विचाराने त्याच्या मनात उचल खाल्ली आणि भविष्यातील आपल्या गावासंबंधी दिशा त्याने ठरविली. त्यातून त्याची नजर शोधक बनली. जेव्हा आपली नजर शोधक बनते तेव्हा या आशेच्या किरणाचा बळी समाजाची मानसिकता घेते. कमालीचे दुःख होते, विषण्ण होते मन. प्रश्न पडतो याला कोणी वाली आहे काय? याला कारणीभूत आजची सुबत्ता तर नाही ना असा प्रश्न पडतो.

आमच्या समाजाच्या नैतिकतेची घडी पार चुरगळलेय. पाश्चिमात्य संस्कारतून पण ते सावरत आहेत. असेही चित्र काही अंशी दिसते. हे आमच्याकडे होईल का ? धर्म, संस्कृती यांची नव्याने तिथे होणारा आजचा बदल येथे येईल काय?

आर्थिक उत्क्रांतीने नितीमत्तेचा झालेला पार चुराडा योग्य मार्गावर येईल का ? असे अनेक प्रश्न पडतात.

आपली संस्कृती किती श्रीमंत होती, जग मोठ्या आशेने आपल्याकडे पहात होते. ती स्थिती आज येईल का? देव देवतांचा बाजार त्यातून पुढे येणारा भ्रष्टाचार यात काही बदल संभवतो काय ?

हे शक्य आहे आमच्या शंकरसारख्या, संस्कारी, सुशिक्षित तरूणांमुळे अशी अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत.

शंकर आमच्या टेरव गावचा शेतकऱ्याचा मुलगा. हुशार, उज्वल भवितव्य असलेला गरीबीचे टक्के टोणपे खात आपल्या जीवनाचा मार्ग चोखाळत होता. शिक्षण अत्यंत गरीबीत. वेळेला अन्नाचीही ददाद. जीवनात काहीतरी चांगले करावे या आशावादाने पेटलेला. शिक्षण स्कॉलरशिपवर, गावात मोलमजुरी करून आईने वडीलांच्या पश्चात्य त्याला वाढवला. याची जाणीव त्याला होती. या बदलत्या समाजाची जाणीव त्याला होती. आपल्याला खूप काही करायचे आहे जीवनात, ही जाणीव.

हे सगळे पाहून अगदी विषण्ण होऊन गेला होता शंकर. शंकरच्या मनात शाळेतल्या पुस्तकातला “स्वप्नांचा गाव” तसा तो अजून लहान होता. वाढत वय अधिकाधिक समृध्द होत गेले, आणि त्याने मनोमन ठरविले. एक दिवस या गावाचे नंदनवन करायचे आपण, प्रेम, एकोपा, बंधुभाव, यांनी युक्त समाज असावा असे त्याला सतत वाटायचे. वाढत्या वयाच्या मानाने अधिक शहाणपण शंकरच्या मध्ये दिसू लागले होते.

आपण लहान आहोत, काय करू शकतो... पण वाढत्या वयाबरोबर हा विचारही पक्का होत गेला.

a

त्याचा गाव तसा लहान. दोन अडीच हजार वस्तीचा. अठरा पगड जातीचा त्यात 96 कुळी उच्चभ्रु जातींपासून, कुणबी, सोनार, सुतार आणि बौध्द समाजाचाही.

त्याच्या लहानपणापर्यंत त्याच्या नजरेने जे पाहिले त्यात झालेला बदल, गावातील शाळा, कॉलेज यातून शिकून बाहेर पडलेली नवी पिढी व गावात, घराघरात आलेली सुबत्ता. यामुळे झालेला नैतीकतेचा ऱ्हास. सारे त्याच्या चाणाक्ष नजरेतून कधी सुटले नव्हते. सरकारी योजनांतून गावातील

ग्रामपंचायतीला आलेला पैसा. त्यात लुटारु लोकांच्या मनात भ्रष्टाचाराची बोकाळलेली भावना. रस्ते, रस्त्यावरच्या लाईट पाहून वाटे बा आपला गाव किती बदलला.

पण नैतिकतेचे काय? राजकारण, टगे यांनी गाव पार बिघडवला. अगदी वेश्या व्यवसायापर्यंत मजल गेली. बाहेरख्याली लोकांनी गावाची नैतिकता पार धुळीला मिळवली, नात्यानात्यात दुभंगाने वावर केला. प्रत्येकाच्या नजरेत विखार, राजकारण्यानी तर कहर केला. अगदी देवळात येणाऱ्या पैशांचा धूरही याला कारणीभूत होईल असे वाटले नव्हते पण घडले.

प्रत्येकाच्या मनात संशयाचे भूत, पूरेपूर अहंकार, आणि अविश्वासाची भावना समाजातली लग्न संबंधांची घडी पार विस्कटली. समाज पार दुभंगला होता. जाती जातीतली तेढ पराकोटीला गेलेली. गावात 50% लग्ने ही चाकोरी मोडून होत होती. त्यांनी गाव सोडले कारण समाजाला हे पसंत नव्हते. त्यात खालच्या जातीतील धुरीणांची मानसिकता. जात पंचायतीची दादागिरी इतकी मस्तावली की चांगल्या चांगल्या मुलांनी गाव कायमचा सोडला. पण खंबीरपणे

a

समाजाच्या किडलेल्या प्रकाराला विरोध करण्याचे धैर्य कोणी दाखवण्यास तयार नव्हता. मुली पळून लग्न करीत. ते विवाह समाज स्विकारत नव्हते. पण नवी पिढी या सगळ्या विरोधात उभी रहायला तयार नव्हती. घटस्फोट तर पावला-पावलावर होत. अशी शेकडो कुटुंबे उध्वस्त झालेली दिसत होती.

त्यात शंकरच बाप निघाला धिराचा, हिम्मत बाज.

त्याचे असे झाले, शंकरने चिपळूणच्या डीबीजे महाविद्यालयातून बीए केली. त्यानंतर स्पेशल सायन्सचा कोर्स त्याने नोकरी करून टाटाच्या सामाजिक संस्थेतून पूर्ण केला आणि त्याच संस्थेत तो अधिकारी म्हणून नोकरीला लागला.

भारत सरकारच्या समाज शाखेने देशातील विविध सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी या संस्थेचा उपयोग करण्याचे ठरविले. त्यासाठी एक कमिटी नियुक्त केली.

समाजातील विविध घटकांची सुची करून त्याचा एक रिपोर्ट सरकारला हवा होता. अगदी कामगारांपासून-वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांपर्यंत सगळे विषय त्यांनी या सुचित अंतरभूत केले.

या संस्थेत शंकर वेलफेअर ऑफिसर म्हणून काम करीत होता. त्याच्या हाताखाली मुंबई विभाग देण्यात आला व दोनशे लोकांची टीम यासाठी निवडली गेली व विभागवार त्यांना काम देऊन त्यांचा रिपोर्ट आठवड्याच्या आठवड्याला येई. त्या सगळ्या माहितीचे संगणकीय मार्गाने माहिती भारत सरकारच्या समाज वेलफेअर विभागाला जात असे.

यापूर्वीही असे प्रयत्न सरकारी स्थरावर झाले नव्हते असे नाही. पण बदलत्या सामाजिक परिस्थितीचे विघटन, राजकारणाचा परिणाम, शिक्षण इ. सर्व विषयांचा अभ्यास केला जात होता.

गेली दोन वर्ष शंकरला आपल्या गावालाही जाता आले नाही. पण यासगळया अभ्यासातून खूप मोठा अनुभव त्याने अनुभवला.

आई वयस्कर झाली होती तिचे निरोपावर निरोप येत. शेवटी कामाचा बोजा असतानाही तो गावाला आला. आई आता थकली होती. शंकरने लग्न करावे आणि कुटुंबवत्सल व्हावे यासाठी ती त्याच्या मागे लागली होती.

ईतकी काय घाई आहे ! अगं माझ्यावर फार मोठी जबाबदारी आहे असे वारंवार सांगूनही त्याने तो विषय टाळला होता.” शंकर

शंकरला दिलेल्या कामाचा एक भाग म्हणून मुंबईच्या ‘फॉस्स रोड’ येथील विभागात काहीही काम झाले नव्हते, नव्हे त्याच्या स्टाफपैकी कोणीही ते काम घ्यायला तयार नव्हते. स्त्रिया तर या विभागाचा तिरस्कार करीत. शंकरला याचे काय करावे याचीच चिंता लागली होती.

शेवटी ही जबाबदारी त्याने स्वतःच हाताळण्याचा विचार केला. हे अवघड जागेचे दुखणे आहे हे शंकर जाणत होता. त्याने आपल्या टिममधील निवडक लोकांची निवड या कामासाठी केली. सर्वांशी चर्चा केली व नियोजनबध्द पध्दतीने हे काम पूर्ण करावे असे शंकरने ठरविले.

a

प्रथम त्याने त्या सगळ्या परिसराचा सर्व्हे केला. त्यात असे जाणवले की बाहेर रस्त्यालगतच्या माड्यांच्या मागे खूप आत प्रचंड वस्ती असून तेथे हा व्यवसाय राजरोसपणे चालला होता.

त्या एरीयात प्रवेश करायचा राजरोसपणे तसे अशक्य होते. एक दिवस तेथे थांबून त्याने आतून बाहेर येणारी गिऱ्हाईके, तिथले काही एजंट यांना हाताशी धरायचे ठरविले. पण प्रश्न होता तो आपल्या या कामाची खबर प्रत्येक कोठीवालीला समजायला हवी आणि ती अगोदर. त्यांच्या कानावर वा पत्राद्वारे ही माहिती पोहोचवण्यासाठी त्याने प्रत्येकीला एक पत्र पाठविले. काम सोपे झाले त्याने प्रत्येक कोठीवालीला ग्रँटरोडच्या एका मोठ्या हॉलमध्ये येण्याची विनंती केली व तारीख ठरविली.

ठरल्या दिवशी सगळ्या कोठीवालींची हॉलमध्ये ही गर्दी. शंकरने त्याच्या योजनेची सगळी माहिती सगळ्यांना दिली. सरकारी योजनेच्या अंतर्गत या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी योजना, मुलांसाठी मोफत शिक्षण त्यांना मोफत रेशन, दर आठवड्याला प्रत्येक स्त्रीचे मेडिकल चेक-अप करून देण्याची योजना सांगितली. आजवर निग्लेक्ट केलेला हा समाज समाजाच्या दृष्टीने कसा सुरक्षित राहिला म्हणून तेथे येणाऱ्या पुरूषाचीही मेडिकल करणे सुरू झाले. जे आजवर घडले नव्हते ते शंकरच्या प्रयत्नाने यशस्वी झाले. शिवाय वयस्कर स्त्रियांचे पुर्नवसन, त्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन रोजगारही उपलब्ध केले गेले या परिसराची विशेष स्वच्छता ठेवण्याचे हुकुम बीएमसी कमिशनर नी काढले.

a

दुसरी गोष्ट हा व्यवसाय थांबवणे कठीण, समाजातील काही लोकांची भूक भागवणे थांबवता येणार नव्हते. पण इतर गैर प्रकार मात्र थांबवता येणार नाही. स्त्रियांना विकणे, पळून आलेल्या मुलींना आधार बंद होणे जरूरीचे होते.

शंकरने या सगळ्या स्त्रियांची कोठावाईज जंत्री केली व सरकारला सादर झाली. जेणेकरून त्यांच्या वेलफेअरची काही भव्यदिव्य योजना सरकार घोषीत करील.

तिथल्या मुलांची होणारी हेलपाट थांबविण्यासाठी अनेक सामाजिक संस्थांनी दत्तक घेतली. त्यामुळे त्यांचा सर्वांगिण विकासही होऊ लागला, त्यांना शिक्षण व्यावसायिक ट्रेनिंग मिळू लागली.

सरकारने शंकरला आयएएस चा दर्जा देऊन सरकारच्या वेलफेअर चा त्याला मुख्य बनवले. आता या सगळ्या गडबडीत पाच वर्षे होऊन गेली.

त्याची आईही गेली व तिच्या अंत्यसंस्कारासाठी शंकर गावाला आला. आता चांगली 2 महिन्यांची रजा घेतली शंकरने. तो खूप मोठा सरकारी अधिकारी आहे ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. गावात लाल दिव्याच्या गाड्या यायला सुरूवात झाली. लोक चक्रावले. शंकरच्या घरी थोरा-मोठ्यांचे येणे-जाणे सुरू झाले. शिकलेली मुलेही आली. शंकरला गावची परिस्थिती जैसे थे आहे हे समजले.

त्याने गावातल्या 10/15 चांगल्या लोकांना हाताशी धरून आपल्या कामाची दिशा ठरवली. गावात दोन शाळा. एक प्राथमिक आणि सेकंडरी म्हणजे एसएससी पर्यंत शिक्षण देणारी. त्याने प्रथम दोन्ही शाळांतील शिक्षकांना

a

बोलावले. चर्चा केली व मुलांसमोर शंकरने खूप चांगले विचार मांडले. कारण त्या मुलांद्वारे ते विचार घराघरात पोहोचले. त्यानंतर निवडक लोकांना घेऊन त्याने वाडीवाडीवर सभा घेतल्या. वाडीवाडीत तंटे, घराघरात तंटे, भांडणे. कारण होते घरातील प्रॉपर्टी. शंकरने आपल्या गावात तहसिलदारालाच पाचारण केले आणि ग्रामसेवक तलाठी यांच्या मार्फत पेंडींग प्रकरणे मार्गी लावली.

त्यानंतर शंकरने ग्रामपंचायतीत ग्रामस्थांची सभा लावली. बौध्दवाडीपासून सगळे लोक हजर होते. शंकरच्या सरकारी खबऱ्याचा खूप चांगला उपयोग झाला. गावातले एकीकरण झाले मंदिरातला अनागोंदी कारभाराला कात्री लागली. सारे कसे अगदी मोरपीस फिरवावे तसे गाव बदलत गेले आदर्श ठरले जिल्ह्यात आणि सरकारने अनेक योजना या गावासाठी जाहीर केल्या. एक कोटीचा फंड आला, गावातील सर्व त्रुटीचा अभ्यास करून पाणी योजना, एक समाज मंदीर, रस्ते, लाईट, सारे काही आले. आज दोन-अडीच महिन्यात गावाने कात टाकली. मुसलमानांचे ताबुतला सर्व गाव जमू लागला, बौध्द जयंती पासून सगळे सण, राजकीय सण यांना गर्दी होऊ लागली. गाव आता पूर्वीचा राहिला नव्हता.

शिवाय स्त्रियांच्या दृष्टीने अगदी बचत गटापासून सारे व्यवसाय सुरू झाले. त्यांना गावातच विक्री होऊ लागली. बालवाडीचे नुतनीकरण झाले खूप खेळणी मुलांना खेळण्यास आणली.

झाले शंकरची रजा संपत आली होती. आता निघावे लागणार होते. तत्पूर्वी त्याने तहसिलदार कार्यालयातील कर्मचारी, ग्रामपंचायतीतील कर्मचारी

यांची एक कार्यशाळा घेतली. यात काही महिलाही होत्या. त्या सगळ्यांनी आपले विचार मांडले त्यास तहसिलदार कार्यालयातील राधा, या महिलेने खूप चांगले विचार मांडले. शंकरचे लक्ष तिच्याकडे होते ती धनगर जातीची होती. पण शिक्षीत आणि संस्कारीत शिवाय अविवाहीत शंकरने स्वखर्चाने सगळ्यांना दुपारचे भोजन दिले. त्याचे लक्ष राधेवर होते.

भोजनानंतर शंकरने तिला बोलावले व

“आपले नांव मुली”

“राधा!”

“छान!”

“गांव?”

“आपलाच!” ती

“लग्न? “

“नाही कोणी करायला तयार नाही!” राधा

“का?”

“माझी जात!” राधा

“तू अविवाहीत आहेस. मी ही!” शंकर

“मग?”

“तू माझ्याशी विवाह करशील?” शंकर

“लोक काय म्हणतील?” राधा

“लोकांचे सोड, तू मला आवडली आहेस. मी तुझ्याशी विवाहास तयार आहे!” शंकर

राधा लाजली, या घडणाऱ्या अनपेक्षित प्रसंगाने... गावातच साध्या पध्दतीने विवाह संपन्न झाला. प्रचंड गर्दी, सर्व समाजातील लोकांनी त्यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी

आता गांव तो नव्हता राहिला. शंकरचे योजलेले काम संपले होते. शंकरच्या मनातला स्वप्नातला गाव साकार झाला होता. आणि गावाने शंकर-राधेला निरोप दिला ते दिल्लीला रवाना झाले.

एक स्वप्न साकार झाले होते !!

|||||

# मसिहां

सुनिता दिल्लीहून तिच्या लेकीला घेऊन चिपळूणला आली. पंधरा वर्षाचा नर्सिंगचा अनुभव. तिने बी.एसस्सी (नर्सिंग) केले होते. मोठ्या कष्टाने नोकरी सांभाळून दिल्लीच्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये ती मिडवाईफ होती. खूप अनुभव गाठीशी तिने बांधला होता. मुलगी 10 वी झाली होती तिने सावर्ड्याच्या इंजिनिअर कॉलेजमध्ये डिप्लोमा सिव्हील साठी प्रवेश घेतला.

तिला छान नोकरी मिळाली. ती स्थिरावली होती. दिल्लीत पण. मुलीचे वाढते वय, परके ठिकाण कोणा नातेवाईकांचा सहवास नाही. शेवटी चिपळूण गाठले. तिथल्या सावर्ड्याच्या ग्लोबल हॉस्पिटल मध्ये तिला छान नोकरी मिळाली पगारही चांगला. रहायला क्वार्टर्स. मुलींचे कॉलेज जवळ. ती खूष होती. त्या हॉस्पिटलमध्ये 100 बेड होते. तिला एका शिफ्ट ची जबाबदारी दिली. तिच्या कामाचा झपाटा, अचूक निदान यामुळे डॉक्टर्स, शिवाय मॅनेजमेंट खूष होते.

गेली 12 वर्षे ती एकाकी जीवन जगत होती कारण नवऱ्याने सोडले. तो निघाला बाहेरख्याली. त्याने सोडचिठ्ठी दिली. सासरच्यानीही लाथाडले. बिचारी रस्त्यावर आली म्हणून दिल्ली गाठले. दूर सर्वांपासून, पण आज पुन्हा चिपळूणला परतावे वाटले म्हणून ती येथे आली.

a

ती तशी वयस्कर नव्हती इनमीन पस्तीशीची. दिसायला सुंदर, बांदेसुद शरीर. हॉस्पिटलमध्ये बरेचशे डॉक्टर फिदा पण ती कोणालाही जवळ करू इच्छित नव्हती. कारण तिची मुलगी.

पण आता हे एकाकी वय तिला नकोसे वाटत होते. कोणाची तरी साथ हवी होती. उभे आयुष्य या अवस्थेत काढणे, आणि समाजातल्या वखवखलेपणाला सामोरे जाणे आता तिला कठीण जात होते. ती हवी पण मुलगी नको. असे सांगणारे महाभाग खूप भेटले. शेवटी तिने हा विषय तिच्या डोक्यातून काढून टाकला.

यात दोन वर्षे निघून गेली. पण यात एक घटना घडली. त्या हॉस्पिटलमध्ये डॉ. माधव हार्ट सर्जन यांची व्हिजीटींग डॉक्टर म्हणून नेमणूक झाली. सुनिताची नेमणूक ओटी इन्चार्ज म्हणून झाली. तिच्या सफाईदार कामाने तेही खूष झाले आणि पुढच्या 6 महिन्यात त्यांचे मेतकूट जमले. तेही 40 शीत होते. बिजवर होते. अत्यंत निष्णात. सहा महिन्यातच त्यांची किर्ती रत्नागिरी जिल्हा, सिंधुदूर्ग, रायगड मध्ये पसरली. कधी कधी 2/3 दिवस त्यांना थांबावे लागे अनेक हार्ट ऑपरेशन्स यशस्वी झाली. ते जेव्हा बेंगलोरला येण्यापूर्वी लंडनमध्ये प्रॅक्टीस करीत होते. पण त्यांचे एक मित्र डॉ. सदावर्ते यांनी त्यांना येथे आणले आणि हळूहळू ते इथलेच होऊन बसले. पण त्यांना अचानक लंडनला जावे लागले, रॉयल फॅमिलीच्या कोणा सदस्याच्या ऑपरेशनसाठी. यात एक महिना निघून गेला.

सुनिताचे डिपार्टमेंट तात्पुरते बंद झाले. सुनिता बद्दल आकस असलेल्या डॉक्टरनी तिची रवानगी अशा वॉर्डमध्ये केली की तेथे खूप आजारी रिकव्हरी

होण्याच्या पलीकडच्या पेशंटच्या वॉर्डमध्ये केली. ती प्रथमच येथे आली होती. वीस पेशंटपैकी 15 जण ऑक्सिजनवर होते. तर उरलेल्या पेशटंना त्यांच्या घरच्या लोकांनी घरी नको म्हणून हॉस्पिटलातच डांबून ठेवले होते. तेथे ऑक्सिजन लावून ठेवलेले पेशंट तर डेडच होते पण पैशासाठी हॉस्पिटल काही करायला तयार नव्हते. सुनिताने डीनना तक्रारी केल्या कारण एकतरी पेशंट इहलोकी जात होता. तिच्यासारख्या निष्णात नर्सला मुडद्याच्या वॉर्डात आणून तिची जिरवावी हाच त्यांचा विचार होता. पण हे ही अग्नीदिव्य तिने महिनाभर सहन केले.

एवढ्यात डॉ. माधव आले आणि तिची सुटका झाली. सारा प्रकार सुनिताने डॉ. माधवाना सांगितला. त्यानी ताबडतोब तिची सुटका करून आपले युनिट चालू केले. आता ती आनंदी होती. डॉ. माधव तिच्या जीवनात मसीहां बनुनच आले हे तिने जाणले. आज तिच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वहात होता.

हॉस्पिटलच्या डॉ. नी दिलेल्या त्रासाबद्दल ऐकून डॉ. माधव चक्रावून गेले आणि वेगळेच विचार करू लागले. गेल्या वर्ष-दिड वर्षात आपण येथे केलेल्या कामाने तिन्ही जिल्ह्यातली एक मोठी समस्या सुटली होती. आपण एखादे वेगळे सर्जरीचे हॉस्पिटल काढले तर ? पण याबाबत त्यांनी सुनिताजवळ हा विचार मांडला नाही. पण एक दिवस

“सुनिता आपण खूप काम केले आज सकाळपासून. तीन ऑपरेशन झाली ! आपण आज चिपळूणला जाऊन अभिषेकमध्ये जेवूया !” डॉ.

“छान! माझीही तीच इच्छा होती बऱ्याच काळापासून !” सुनिता

a

“वा! म्हणत डॉ. नी गाडी काढली आणि प्रथम टेरवच्या भवानीचे दर्शन घेऊन ते खेर्डीमार्गे चिपळूणला आले. खरेतर हे आजचे जेवण हे त्यांनी बरोबर घेतलेले. नाहीतर हॉस्पिटलच्या मेसशिवाय चारा नव्हता. डॉ. नी नव्या अपॉईंटमेंट बघत तिला सांगितले.

“पण हे खूपच खर्चिक असेल?” डॉ.

“पण यातूनही मार्ग निघेल!” सुनिता

“कसे?” डॉ.

“आज आपण आमदाराना भेटूया. त्यांच्या संस्थेच्या बऱ्याच बिल्डींग खाली आहेत. आपल्याला योग्य ती निवड आपण करू. शिवाय त्यांची दोन नर्सिंग कॉलेजेस आहेत, तेव्हा खूप स्टूडंट आपणाला भेटतील !” सुनिता

“उद्या रविवार आहे आपण भेटू त्यांना, पण ओळख?” डॉ.

“मी त्यांना ओळखते!” सुनिता

“वा! मग काम होईल !” डॉ.

दुसऱ्या दिवशी ती दोघे आमदार निकम यांना भेटले. डॉ. माधव यांना ते ओळखत होते.

“या डॉ.! आज इकडे कसे ?”

“आपल्या कडेच !

“काय काम काढले !

डॉ. माधव यांनी सगळी माहिती दिली. ते ग्लोबल हॉस्पिटल लोकांना लुटत होते. डॉ. ना प्रत्येक ऑपरेशनचे 30,000/- फक्त मिळत. म्हणून गरीबांना फायदा कसा होईल हा आमचा विचार आहे.

“आम्ही नर्सिंगच्या मुला-मुलींसाठी दोन ओटी केली आहेत. ती अपडेट करू. सगळ्या सुविधा देऊ. शिवाय तुमच्या जरूरीप्रमाणे ती इमारत छान हार्ट स्पेशालिटी सेंटर म्हणून सुरू करू. सध्या तेथे ओपीडी चालू करा!” निकम

डॉ. माधव, सुनिता आणि आमदारांनी संपूर्ण इमारत पाहिली. त्यात आय.सी.यू. रिकव्हरी रूम, नर्सेस क्वार्टर्स यांची योजना पूर्ण करून झाली.

आणि 1 मे ला हे ‘स्पेशालिटी सेंटर’ सुरू झाले. डॉ. माधवांनी बेंगलोरवरून त्यांच्या दोन डॉक्टर मित्रांना बोलावून घेतले.

चांगला जम बसला आणि डॉ. नी संपूर्ण वेळ या सेंटरसाठी दिला. सुनितानेही नोकरी सोडली आणि पूर्णपणे डॉ. बरोबर होती. डॉ. नी त्या ग्लोबल चे क्वार्टर्स सोडले आणि त्या परिसरात एक बंगला भाड्याने घेतला. एक दिवस....

“सुनिता! आपण आता लग्न करावे असा माझा मानस आहे!” डॉ. माधव

“होय ! तोच विचार मीही करीत होते!” सुनिता

“छान!” डॉ.

आणि आठवडाभरात वैदीक पध्दतीने विवाह पार पडला. सुनिता डॉ. च्या बंगल्यात रहायला आली. सुखाचा संसार सुरू झाला. गेल्या 12/13 वर्षात

a

ज्या सुखाला ती पारखी झाली होती ते सुख आता तिला लाभले होते डॉ. माधव यांच्यामुळे.

ते मसीहां बनून तिच्या जीवनात आले. त्यांनी तिच्या मुलीलाही स्विकारले आणि छान लग्न करून तिही तिच्या संसारात स्थिर झाली. हे सारे घडले डॉ. माधव यांच्या तिच्या जीवनात येण्याने.

सुनिताचे सगळे नष्टचर्य संपले होते आणि नव्याने सुगंध फुलला होता तिच्या संसारात, या मसिहांमुळे !!

|||||

# त्याग

पेढांबे गावातले पवार यांचे घराणे तसे सैनिकी परंपरेला वाहिलेले. तिचे आजेसासरे मिलीट्रीत, सगळे चुलत दिरही मिलीट्रीत. आपला विश्वास बसणार नाही पण घरातले आजवर नऊजण त्यावेळी सैनिकी सेवेत.

अंजलीचे एकूण तीन दिर, लग्न झाल्यानंतर तिचा नवरा मिलीट्रीत गेला. तीन दिर अजूनही लहान होते. अंजलीचे सासरे चायनाच्या वॉरमध्ये जखमी होऊन घरी आले. अंजली तशी जाणती होती. सासु शेवटच्या दिराच्यावेळी बाळंतपणात गेली. लहान बाळ दत्ता तेव्हा पंधरा दिवसाचा होता. त्याचवेळी अंजली गरोदर होती. अंजली बाळंत झाली. मुलगी झाली. या दोन लहान बाळांचे करता करता अंजलीचा जीव कामाच्या ओझ्याने वाकून गेला होता. त्या दोन मुलांना म्हणजे दिराला आणि लेकीला तिने आपल्या मुलांसारखे वाढवले. दोन्ही मुले अंगावर प्यायची तिच्या. नवल वाटायचे लोकांना, पण त्या माऊलीचा त्याग मोठा.

हेमंत वर्षातून दोन महिन्याच्या रजेवर यायचा तोही भात लावणीच्या वेळी. पण भात कापणीला तो इथे नसायचा. तिचे दोन छोटे दिर रघू-राजू आता वयात आले होते. त्याकाळी या घराण्याचा दबदबा अगदी कलेक्टर, मामलेदार कचेरीत मोठा. कलेक्टरही आपली खुर्ची सोडून उठायचा असे म्हणतात. मग काय रघु - राजू यांना मिलीट्रीत नोकरी मिळाली शेती खूप मोठी. शिवाय या

घराण्याला दहा एकर भात शेतीची जागा सरकारने दिली होती. एवढी मोठी शेती अंजलीला झेपेना, मग मक्त्याने देऊन टाकली.

अंजलीला मुलीच्या पाठोपाठ दोन मुले झाली. एक मुलगा व एक मुलगी तिही जुळी. मग काय? एवढा मोठा प्रपंच सांभाळत राहिली पण हेमंतबरोबर रहाण्याचा योग येईना. दोन दिरांची लग्ने झाली. त्यांच्या बायका बरोबर गेल्या. पण अंजली गावात एके गावात. ना तिने दिल्ली पाहिली ना पंजाब. पण बाकीच्या जावा कायम तिच्या दिरांसोबत. पण तिने आपल्या नवऱ्याजवळ याबाबत चकार शब्द उच्चारला नाही. ना हौस ना मौज. हेमंत यायचा तेव्हा पुऱ्या वर्षाची बेगमी करून ठेवायचा. तिची फॅमिलीची रक्कम यायची घरी. पोस्टमन आणून द्यायचा कायम महिन्याच्या महिन्याला.

त्यांच्या घरी गौरी-गणपती यायचे सारे काही हौसेमौजेने ती करायची आपल्या दोन चिमुकल्यांसोबत.

दत्ता तिचा दिर आता मोठा झाला होता. गावातल्या शाळेतून सातवी झाला. तसे तिची दोन्ही मुलेही सातवी झाली. शिक्षणाचे पुढचे काय ? काळ बदलला होता. गावतली मुले तालुक्याला जात पण तिच्या मुलांचे काय ?

तिचा दिर (चुलत) कॅ. संतोष हा नेव्हीला होता. तो रजेवर आला होता. अंजलीने तिची अडचण सांगितली. लगेच त्याने दुसऱ्या दिवशी त्या तीन्ही मुलांना चिपळूणच्या मिलीट्री हॉस्टेलमध्ये टाकले व त्या मुलांना इंग्रजी मिडीयमच्या माटे हायस्कूलमध्ये घातले. आता घरात ती एकटी होती. जेव्हा कधी हेमंत रजेवर येई तेव्हाच तिच्या आनंदाला पारावर रहात नाही. पण त्याची सुट्टी संपल्यावर तो परत निघाला की ती धाय मोकलून रडायची. सोबत होती

ती तिच्या वृध्द सासऱ्याची. ऐंशीच्या वर त्यांचे वय होते. सध्या ते जाग्यावरच होते. ती त्यांची सेवा प्रेमाने करी. हेमंत तिला नेऊ शकत नव्हता सोबत. वृध्द वडीलांमुळे आणि त्याची पोस्टींग हिमाचल प्रदेशात लडाख, लेह, काश्मीर येथे गेली अनेक वर्षे होती. तो एक अडचणीचा मुद्दा होताच. पण तिची काही तक्रार नव्हती.

मोदी सरकार आल्यावर त्यानी अशा कुटुंबांची माहिती ग्रामपंचायतीकडून मागून घेतली. अर्थात त्यात अंजलीच्या कुटुंबाचा म्हणजे सासऱ्यांचा उल्लेख होता. आजच्या घडीलाही तिच्या कुटुंबातील 8 जण सैन्यात होते.

एक दिवस जिल्ह्याच्या कलेक्टर ऑफीसमध्ये एक खलीता आला. तिच्या सासऱ्यांचा सन्मान करण्यासाठी स्वतः कलेक्टर येणार आहेत. खूप आनंद झाला तिला आणि आपला नवरा देश संरक्षणासाठी सैन्यात सेवा करतोय याचा अभिमान वाटला आणि आशा आकांक्षांची जळमटे तिने झटकून टाकली.

15 ऑगस्ट रोजी गावातील सगळे आबालवृध्द, माजी सैनिक तिच्या घरी जमले. घराचा मंडप ओसंडून वहात होता. सरकारी आदेशानुसार. तिच्या सासऱ्यांना खुर्चित बसविले. त्यांचे अभिष्टचिंतन केले. त्यांना स्त्रियांनी ओवाळले व सर्वांनी त्यांना दिर्घायुष्य चिंतन केले. यावेळी जिल्ह्याच्या कलेक्टरनी त्यांना शाल-श्रीफळ देऊन सन्मान केला व भारत सरकारतर्फे देण्यात येणारे सन्मानचिन्ह त्यांना अर्पण केले.

आज अंजलीने सर्व गावाला गोड-धोड म्हणजे लाडवाचे जेवण दिले. समारंभ संपताच सर्वांनी तिच्या सासऱ्यांचे अभिष्टचिंतन केले. आज अंजलीच्या आनंदाला पारावर राहिला नव्हता. तिच्या आई-वडिलांनी या सैनिकी घराण्यात लग्न करून मोठे उपकार केले असे तिला वाट्ले. धन्यता वाटली. आपले जीवन सफल झाले असे वाटले.

तिचा मुलगा आणि दिर दत्ता सैन्यात गेले त्यांना चांगले कमिशन मिळाले. किती आनंद झाला असेल अंजलीला याची आपण कल्पना करू शकत नाही.

तिला तिच्या या त्यागाचे खरचं चिज झाले असे आज वाटले.

धन्य ती माऊली !!

|||||

# स्विकार !

एक दिवस अचानक गंगाराम घरातून गायब झाला आणि उगवला तो दोन दिवसांनी. सोबत एक गोरी गोमटी 12/13 वर्षाची मुलगी, दिसायला त्याचाच तोंडावळा घेऊन आलेली. अंगाने धष्टपुष्ट, हसतमुख, छान कुरळे लांब केसाची परकरातली.

आनंदरावांचे मात्तबर घराणे, दसपटीतल्या पेढांबे गावचे. चार चौकड्याचे घर. आनंदरावांची चार मुले. गंगाराम, आनंद, सदाशिव आणि राजाराम. तसा राजाराम मोठा सध्या या घराचा सगळा कारभार तोच पाहत होता.

दिवस गणपणतीचे होते. घरात गौरी-गणपतीची आरास चालू होती. घरातल्या मंडपीला कौडल, छान जंगली फुलांची आरास, त्या खालचा ‘कुड’ छान रंगवण्याचे काम चालू होते. घरातली सगळी माणसे आपआपली कामे करीत होते.

अंजू आली, घरचे सगळे वातावरण बदलले. ती आली ती पडवीत उभीच होती. गंगारामने तिला बसायला सांगितले. तरी ती बिच्चारी पडवीत उभीच होती. पुन्हा पुन्हा सांगूनही ती जराही हलली नाही. कसल्यातरी विचारचक्रात ती अडकली होती. पण जेव्हा तिची नजर माजघरातल्या कुडाकडे गेली, आणि ती हलली. आपल्या परकराचा झगा वर करून ती ओठीच्या पायऱ्या चढून कुडाजवळ आली. तिने एक नजर माजघरात, कुडासमोरच्या व त्यातील रंगाकडे गेली. सगळा कुड तिने पाहिला तर चारी बाजूची चौकट कावेच्या रंगाने रंगावली होती, पण मधला भाग अजून रिकामाच होता.

a

तिने तिथला ब्रश हातात घेतला आणि सपासप फराटे मारून त्या कुडावर शंकर पार्वतीचे चित्र रेखाटले ती ते करत असताना घरातील 10/12 माणसे म्हणजे तीन स्त्रिया, सगळे भाऊ, मुले, नोकर-चाकर टक लावून पाहत होते. ती आपल्या कामात इतकी गुंग होती की तिची नजर मागे वळलीच नाही. तिने अर्ध्यातासात  काढलेले चित्र आता रंगवण्यास सुरूवात केली. शंकर पार्वतीचे चेहरे आता तर स्पष्ट दिसत होते. शंकराच्या डोक्यावरची गंगा, चंद्रकोर आता स्पष्ट दिसत होती. शंकरांच्या गळयातला नाग हुबेहुब जीवंत आहे असे जाणवत होते. त्या चित्रांचे डोळे तिने रंगविले आणि मागे उभ्या असलेल्या सगळयांनी टाळयांचा कडकडाट केला ती चपापली. मागे वळून पाहिले आणि हातातले ब्रश वाटीत ठेऊन ती उठली.

“छान! फारच छान! हुबेहुब जीवंत आहेत असे वाटत आहे ! पोरी हे कोठे शिकलीस तू?” राजाराम

“शाळेत!” अंजू

“तुझे नाव काय?” राजाराम

“अंजू!” अंजू

“कोणत्या गावातली?” राजाराम

“खडपोलीतली!” अंजू

बस, संभाषण संपले. गंगाराम अजून ओठीवरच बसला होता. राजाराम माजघरातून बाहेर आला. आणि त्याच्या वाटचालीने गंगाराम उठला.

आता रात्र व्हायला आली होती.

“ए भाऊ ही पोर कोणाची?” राजाराम

गंगाराम काहीच बोलला नाही. तो मान खाली घालून उभाच होता.

“बोलना! अरे रात्र होत आली. हिला तिच्या घरी पोहोचवायला हवी ना? का येथेच राहणार आहे ती?”

तरीही गंगाराम गप्पच.

“बोल!” राजाराम

“ती आता येथेच राहणार आहे. तिचे आता कोणी नाही. आजी गेली! आई दोन वर्षापूर्वी गेली!” गंगाराम

“अरे पण ही मुलगी कोणाची? तिला कोण आईबाप आहेत की नाही!” राजाराम

“आहेत!” गंगाराम

“कोण सांग! आणि ती तुझ्याबरोबर कशी आली?” राजाराम

“ती आता येथेच कायम राहिल!” गंगाराम

“बोल! थांबलास का?” राजाराम

“ती माझी मुलगी आहे!” गंगा

“कशी?” राजाराम

“सांगतो! माझी बायको रमा गेल्यावर मी एकाकी पडलो ! सैरभैर झालो ! तिची आई माझ्या वर्गात होती. ओळखत होतो मी तिला. ओळख वाढली. प्रेमात अडकलो तिच्या आणि आम्ही शंकराच्या मंदिरात लग्न केले. तिची ही

मुलगी. तिही कॅन्सरने गेली. तिची आजीही पंधरा दिवसापूर्वी गेली. ती पोरकी झाली. तिचा मी बाप. ती माझी मुलगी आहे. तिला वाऱ्यावर सोडणे शक्य नव्हते. म्हणून घेऊन आलो. आता ती दहावी झाली आहे. म्हटलं आपल्या एवढ्या मोठ्या घरात ती सुरक्षित राहील आपल्या सगळयांबरोबर. म्हणून आणली. माझ्या जीवाचा तुकडा आहे ती!" गंगाराम.

गंगाराम सांगत होता आणि सगळे कुटुंब कान देऊन ऐकत होते आणि अंजू बिचारी भिंतीला पाठ टेकून, खाली मान घालून उभी होती.

एवढ्यात राजारामची बायको 'माया' पुढे आली आणि तिने अंजूला जवळ घेतले आणि घरात घेऊन जाणार एवढ्यात अंजूला रडू कोसळले. मायाने तिचे डोळे पुसले. आणि बराच वेळ अंजू तिच्या मिठीत होती. तिला त्या कुटुंबाने स्विकारली होती एवढे मात्र खरे.

पण अजून राजारामच्या मनात शंकांचे काहुर काही संपायला तयार नव्हते. ती कोण? कोणत्या जातीची? वगैरे वगैरे.

"हे ठीक! पण तिची आई कोण? ती कोणत्या जातीपातीची? वंशांची?" ... राजाराम

थोडावेळ गंगाराम गप्पच होता.

"अंजू माझ्या प्रेमाची फलश्रृती आहे. ती माझी मुलगी आहे. माझ्या रक्ता मासाची ! म्हणजे माझीच ना ! मी रितसर लग्न केले आहे ती औरस आहे. या घराण्यातलीच आहे. एवढे ठामपणे सांगतो... तुम्हाला शक्य आहे का? मी सांगतो ती ठेवलेलीच्या पोटची नाही... लग्न केलय आम्ही!" गंगाराम

a

एवढा वेळ राजाराम गप्पच होता.

“बाय अंजू! हे घर तुझे आहे. तू आमचीच आहेस तेव्हा परकेपणा सोड. या घरातली मुले तुझीच भावंडे आहेत असे समज आणि आनंदात रहा!” राजाराम

एवढा वेळ तोंड पाडून बसलेला गंगाराम उठला. त्याने राजारामला मिठी मारली...!!

|||||

# सतर्कता !!

गेल्याच महिन्यात माझी बदली प्रमोशनवर पुण्याला झाली. गेली दोन वर्षे मी प्रमोशन घेतले नाही पण सिनियर असल्याने आणि मी माझ्या कामातील तज्ञ असल्याने बँकेने मला पुण्याला पाठविले. जावेच लागले. पण आठवड्याच्या शेवटी दोन दिवसाची रजा असल्याने शुक्रवारी मी मुंबईला माझ्या घरी हिंदू कॉलनीत येत असे. आता पुण्याला दोन वर्षे काढावीच लागणार होती. मुले शिकत असल्याने पुण्याला कुटुंबाला आणू शकत नव्हतो. म्हणून शुक्रवारी थोडा लवकर निघत असे. म्हणजे गाडीत जागा मिळायची. डेक्कनक्वीनची चांगली व्यवस्था असल्याने प्रवासाचा ताप फारसा नव्हता.

त्या दिवशी शुक्रवार होता माझा पहिला वर्ग असल्याने छान प्रवास होई. एखादी डुलकी कल्याणपर्यंत लागे कल्याण स्टेशनवर एक 14/15 वर्षाची एक छान गोरी गोमटी मुलगी आमच्या डब्यात आली. ती येऊन माझ्या समोरच्या सिटवर बसली. कपडे निटनिटके होते. परकर, पोलके. मी सावरून बसलो. जाग आली ती तिने काहीतरी विचारले म्हणून

“दादा ! हा पत्ता कुठचा हो?” ती

“का? दादरचा! तुला लिहिता वाचता येते ना!” मी

“हो! ती मी सातवीपर्यंत शिकली आहे, पण इंग्रजी येत नाही! म्हणून तुम्हाला विचारले!” ती

“बाळ! तुझे नांव काय?”

“सुनंदा!” ती

“ तुझा गाव कुठला?” मी

“सातारा!” ती

“तू एकटीच कुठे जात आहेस, आली कशासाठी?” मी

“नोकरीसाठी.... घरकामाला!” ती

“तुझ्या हे गृहस्थ ओळखीचे आहेत का?” मी

“नाही!” ती

“तुला इतक्या लांब कोणी पाठविले?” मी

“ आमच्या गावातला एक मुलगा मुंबईहून आला त्याने!” ती

“त्याचे नांव काय?” मी

“माहिती नाही!” ती

“आणि तू निघून आलीस?” मी

“हो! काय करणार? मी आणि आई गावाला असतो! गरीबीमुळे मला निघावे लागले! आता आई एकटीच गावाला असते!” सुनंदा

“ठीक! मी पण दादरलाच राहतो. तू माझ्याबरोबर चल! माझ्या इमारतीच्या बाजूच्या इमारतीचा हा पत्ता आहे!”

दादरला उतरून मी चालतच घरी निघालो. सुनंदा माझ्याबरोबर होती. आम्ही दोघे माझ्या घरी आलो

“ही कोण?” माझी पत्नी पुष्पा

“तिला बाजूच्या इमारतीत सोडायची आहे!” मी

“तेथे कोण रहाते तिचे?” पुष्पा

“माहिती नाही!” मी

“तिला तरी माहिती आहे काय?” पुष्पा

“मला माहिती नाही! तिलाही माहित नाही!” मी

“आजकाल खूप अशा केसेस होतात. बलात्काराच्या! मुलींना विकण्याच्या! असे अनेक एजंट लोक गावोगावी फिरतात! हेरतात चांगल्या मुली आणि पुढे त्यांचे काय होते? देव जाणे! एकतर त्यांचे खून होतात वा विकतात परदेशात! दुबई, सारख्या शहरात!” पुष्पा-माझी वकील बायको

तिच्या बोलण्याने मी ही घाबरलो. नसती बॅद आपण घरी आणली. आता मलाच हे प्रकरण निस्तरावे लागणार होते.

“तू माझ्याबरोबर चल!” मी

“हो!” ती

मग मी, माझी पत्नी व सुनंदा त्या बाजूच्या इमारतीत गेलो. आम्ही दरवाज्यावी कडी वालविली. एका उघड्या बोडक्या तरूणाने दरवाजा उघडला.

“आपण कोण?” मी

“रमाकांत! तुम्ही कोण?” तो

“या मुलीचे नातेवाईक!” पुष्पा  जरा जबरी आवाजात

“आपण येथे कोण कोण राहता?” मी

“मी आणि माझा मित्र शंकर! तो सातारला गेला आहे!” तो म्हणाला

“ही मुलगी एकटीच येणार आहे म्हणून!” रमाकांत

“काय काम देणार हिला?” मी

“घरकाम!” रमाकांत

“तू काय करतोस?” मी

“नोकरीच्या शोधात आहे!” रमाकांत

“काय शिकलास?”

“अकरावी!” रमाकांत

“तूमचा खर्च कसा भागवता?”

“शंकर! तो एजंट आहे. गावोगाव भटकत असतो.

“त्याला कमिशन मिळते!” रमाकांत

“काय काम करतो शंकर?” मी

“माहीत नाही!”

संशयाला खूप जागा होती. माझी वकील पत्नी त्या घरात घूसली. पाठोपाठ आम्ही दोघे. घरात दुर्गंधी येत होती. 1आरकेचे ते घर होते. ना गॅस किचनमध्ये, ना झोपायला कॉट. पाणी प्यायला एक मडके व एक ग्लास. दोन वळकटी आतल्या रूममध्ये दिसल्या. कपडे अस्ताव्यस्त. सगळे वातावरणच संशयीत.

“शंकर कधी येणार?” मी

“उद्या सकाळी!” रमाकांत

a

आम्हाला तिथले वातावरण, संशयास्पद वाटले आणि या मुलीला येथे सोडणे ठीक नाही म्हणून आम्ही आमच्या घरी तिघेही आलो.

सुनंदा आमच्या मुलींबरोबर जेऊन झोपली. तिला माझ्या मुलीने तिचे कपडे दिले.

रात्री आम्ही दोघे याबाबत खूप चर्चा केली. त्या घरात या मुलीला सोडणे धोक्याचे आहे असा पक्का संशय आमच्या मनाने करून ठेवला आणि पुढे काय करायचे याचा आराखडाही ठरला.

दुसरा दिवस शनिवार. शनिवार असल्याने कोर्टाला रजा. मी व पत्नी तसेच सुनंदा दादर पोलीस चौकीत आलो. तेथील सिनिअर इन्स्पेक्टर देशमुख माझ्या आणि माझ्या पत्नीच्या परिचयाचे होते. आम्ही त्यांना या मुलीबद्दल संपूर्ण माहिती दिली. एफआयआर फाईल केला. हे प्रकरण साधे नाही शंकर हा हाच धंदा करतो. मुली हेरतो, नोकरीचे आमिष दाखवितो. त्या मुलीवर अत्याचार करीत नसावेत या गोष्टीची खात्री नव्हती. आणि मुली विकतात. सुनंदा सारख्या सुंदर मुली गरिबीमुळे तयार होतात. फसतात. त्यातून खूनही होतात. तसे हे ही प्रकरण असावे अशी आमची खात्री झाली.

पोलिसांनी माझे स्टेटमेंट रेकॉर्ड केले. सुनंदाचेही स्टेटमेंट घेतले. आता या प्रकरणाचा शोध स्वतः देशमुख करतो म्हणाले आम्ही निश्चिंत झालो. पण प्रश्न होता तो या 15 वर्षाच्या मुलीला तोवर ठेवायची कोठे. आम्ही दोघेही बाहेर असतो. मुली शाळा-कॉलेजात. तेव्हा पोलीस स्टेशनला आल्यामुळे ती थोडी घाबरली होती. आमच्या घरात ठेवणे कठीण. ती पळूनही जाईल मग शोधायची कोठे?

“देशमुख साहेब हिची काय व्यवस्था करावी!” मी

“रिमांड होम!” देशमुख

“ठीक!” मी

आम्ही सुनंदाला समजाविले. हे लोक तुला विकणार होते कुंठणखान्यात. असे सांगतात. ती रिमांड होममध्ये जायला तयार झाली. एक लेडी इन्स्पेक्टर, स्वतः देशमुखसाहेब आम्ही दोघे रिमांड होममध्ये गेलो. तिथल्या इंचार्ज बाईला सगळी कल्पना दिली आणि सुनंदाला जराही त्रास होणार नाही. याची काळजी घेण्याचे बजावले.

आम्ही पुन्हा पोलीस स्टेशनला आलो. दुपार होऊन गेली होती. असा हा सुनंदा प्रकरणाचा पहिला अध्याय संपला.

देशमुख साहेबांनी त्या रूममधल्या रमाकांत शंकर यांना पोलीस स्टेशनला आणायला कॉन्स्टेबल पाठविले. तो फ्लॅट ज्या मालकाचा त्यालाही आणला. सगळयांच्या जबान्या घेण्यात आल्या. कोर्टात या दोघांना चार दिवसाचा रिमांड घेतला. चौकशीची चक्रे भराभर फिरायला लागली.

त्या दोघांना पोलीसांनी आपला खाक्या दाखवताच ते बोलते झाले. दोन रूममध्ये दोघांना ठेवले व मग समोरा-समोर चौकशी केली. हे प्रकरण साधे नाही. हेच समोर आले पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची वाच्छता मिडीयासमोर न करता चौकशी चालू ठेवली. आतापर्यंत दहा लोकांना गजाआड केले गेले. देशमुख साहेब हे प्रकरण स्वतःच हाताळीत होते. पार दुबई पर्यंत या प्रकरणाचे धागे पोहोचले होते. आमदार, खासदारानाही, मुली पुरवल्या जात होत्या.

a

दिवसेंदिवस केस किचकट होत गेल्याचे जाणवले. माझी पत्नी दररोज सगळी माहिती घेत होती.

माझी पत्नी पुष्पा ही सातारला गेली व सुनंदाच्या आईला घेऊन आली ती आता आमच्याकडेच राहत होती. आपल्या मुलीची होणारी फसवणूक होण्यापासून मी व माझ्या पत्नीच्या प्रयत्नामुळे वाचली. यामुळे तिला आनंद झाला. आमच्या मुलांनाही 'आजी' मिळाली.

यापूर्वी या चौकडीने सहा मुली दुबईला पाठविल्या. चार फोरस रोडमध्ये धंद्यासाठी विकल्या. असे यातून निष्पन्न झाले. यातून दोन मुली अल्पवयीन होत्या. त्यांना रिमांड होममध्ये ठेवण्यात आले. खरोखर पुरावे गोळा होत होते. त्या खोलीचा मालक 'मगनलाल' हाच या टोळीचा सुत्रधार आहे हे ही चौकशीअंती सिध्द झाले. तो गजाआड गेला होता. गुंडांच्या टोळीशी त्याचे संबंध होते हे ही सिध्द झाले. हे प्रकरण येथेच न थांबता, अंडरवर्ल्डशी आहे हे ही प्रकरण बाहेर आले.

या प्रकरणात देशमुखांवर राजकीय दबाव येत होता.

या प्रकरणाचा त्रास नको. आमच्याही दोन मुली आहेत. म्हणून आम्ही कुटुंबियांनी सध्यातरी पुण्याला स्थलांतर करण्याचा विचार केला. मुलींना पाचगणीला शाळेत टाकले. सुनंदाची आई आमच्यासोबत पुण्याला आली.

पण तरीही माझ्या पत्नीला वकील म्हणून मध्ये-मध्ये मुंबईला जावे लागे. देशमुखसाहेब निवृत्त होणार होते. तत्पूर्वी त्यांनी या प्रकरणाची चार्जशीट

a

कोर्टात फाईल केली. माझी पत्नी सरकारी वकील असल्यामुळे तिलाच या प्रकरणाची केस सरकारने दिली.

सुनंदा अजून रिमांडहोममध्येच होती. ती आता 16 वर्षाची, म्हणजे अल्पवयीनच होती. शिवाय या प्रकरणाची गंभीरता ओळखून सुरक्षेसाठी तिला रिमांड होममध्येच ठेवणे योग्य होते. तिच्या जीवाला दगाफटका होऊ शकतो. हे जाणून सध्या तिला रिमांडहोममध्ये ठेवा ही देशमुख साहेबांची विनंती रेक्टरने मान्य केली.

आमच्यामुळे सुनंदा सुरक्षित आहे याचा आम्हा कुटुंबियांना आनंद आहे. आता आमच्या तीन मुली आहेत. सुनंदा रिमांड होममध्ये राहून एस.एस.सी. झाली. पुढेही शिकत आहे. पुढे तिचे कन्यादानही आम्ही आमची मुलगी म्हणून करू. एक पूणण्याचे काम हातून घडण्यास परमेश्वराने आम्हाला शक्ती दिली. धन्य झालो आम्ही.

समाजाने अशा प्रकरणात डोळसपणे जागृत राहायला हवे. तर सुनंदासारख्या निष्पाप जीवांचे रक्षण होऊ शकते. ही सतर्कता प्रत्येकाने पाळावी बस!!

सामाजाकडे बघण्याची आपली दृष्टीच सकारात्मक व्हायला हवी. अशी अपेक्षा वाटते!!

|||||

# आठवणींचा पेटारा !

एकदा का आठवणींचा पेटारा खोलला ना, की बालपणापासून आतापर्यंतच्या असंख्य खट्याळपणाच्या गोष्टी फेर धरून नाचायला सुरूवात करतात आणि एक गहीरे चित्र साकार होते. अंतःचक्षुंच्या पुढे सप्तरंगी, बहुरंगी, विसरायला लावते आजचे वय. असेच एकदा झाले.

सकाळची वेळ होती. सिमेवरच गाडीतून उतरलो आणि पायी चालत निघालो. माझ्या आजोळच्या गावी पेढांब्याला. माझे वर्गमित्र आयडी, केडी सारखे फोन करीत.

“तू गावाला ये ! आपण 1962 च्या बॅचचे सगळे गावात गणपतीला येणार आहोत. भेटूया, खूप गप्पा मारायच्या आहेत. अरे आता थोडेच आपण उरले आहोत. तेव्हा तू गणपतीला येणार ना, मग येच.

आणि माझे पाय गावाकडे वळले. सारा परिसर बदलला होता पण मी मासे मारायचा ती नदी तशीच होती, पात्रात फरक झाला होता, आणि मी हरवलो माझ्या बालपणाच्या आठवणींच्या हिरवळीत.

आता गाव सुधारला. सुरेश बच्चाजीच्या घरामागून नवा रस्ता केला. चढलो सगळी डाग दमछाक झाली पण आपण चढू शकलो हाच आनंद. पूर्वी हा रस्ता नव्हता. शन्यादादा आणि रविच्या घराखालून जी डाग आहे ती चढून गेले की रवीच्या घराकडे पोहोचलो.

त्याच्या बाजूला घर आहे. शन्यादादा मला खूप आवडायचा तो. उंचपूरा प्रापंचिक, रवीच्या घराच्या बाजूला भिकाजी-वामनराव, बाजीराव म्हणजे आमचा वर्गमित्र वसंत, त्यापुढे बच्चाजीरावांचे म्हणजे गुण्याचे-विष्णूचे, त्यावर शंकर वामन आणि त्यासमोर दौलतराव आबांचे, माधवराव दादांचे. माझे आवडते व्यक्तिमत्व ते, नव्वदीत गेले, गावात मी कार्याला पोहोचू शकलो नाही याची खंत वाटते. आबानी राजकारण करीत दसपटीत माधवरावांना नांगराला कायम बांधले आयुष्यभर. खरेतर खूप हुशार माधवराव पण आबांच्या उजेडात काळवंडला माधवरावांचा चेहरा कायमचा. खूप वाईट वाटते आजही.

बरे तुम्ही म्हणाल एवढा फेरफटका कां ? माझ्या वर्गातली 7/8 मुले या वाडीत म्हणून अधिक वावर. अगदी आजही. आम्ही सगळे परमेश्वर कृपेने ठीकठाक आहोत. एकमेकांच्या संपर्कात आहोत, आठवणींचा खजाना अजून जपून ठेवला आहे आम्ही. प्रेमाचे संबंध.

आता तुम्ही म्हणाल एकाच वाडीत एवढे रमलात असे ! कारण तसेच, ऋणानुबंध, बस अगदी दाजी देवऱ्याच्या घरापर्यंत, भिम म्हणायचे आम्ही त्याला, आम्ही शेळपेटे, तो तगडा, जिथे ताकदीचे काम तेथे दाजी देवरे, आम्ही बघे, लुडबुडायला.

त्यात अधिक रमलो तो शाळेत. मला अडीच वर्षाचा असताना आईने पेढांब्यात माझ्या आजोळी आणून सोडला कारण येथले दुधदूपते; शाळेची चांगली व्यवस्था. घराचे गोकूळ होते. गाई-म्हशी, दुध-दही यांची रेलचेल. माझ्या गावात मी राहिलो फार थोडावेळ, नाही आठवत काही. अधेमधे मी चैत्रपौर्णिमेला यायचा तेवढाच. बाकी काही आठवत नाही. ना ईथल्या चुलत

भावंडांशी संबंध ना दोस्ती. अगदी नगण्य न आठवणारी, शंभर पैकी नव्याण्णव मार्क पेढांब्याला. एक टक्का टेरवसाठी. पण पेढांब्याच्या आठवणींचा पेटारा ओसंडून वहातोय आजही, किती सवंगडी, मित्र, बारीक-सारीक खंडीभर आठवणी, म्हणून हा पेटारा खोलावासा वाटला. रसभरीत आठवांचा. इथल्या मातीत वाढलो, खेळलो, रमलो, खूप काही शिकलो. प्रेमात भिजलो. आजोबा आजीच्या, मावश्यांच्या, मामांच्या. त्यात ठळकपणे आठवतात ते नानामामा, गंगाराम मामा आणि अधिक महादेव मामा. प्रेम ओतू जाईपर्यंत. त्यात माझ्या चूलत मावश्या बेबी, वासंती, शिवाय माझ्या मावश्या धोंडी, सखू त्यांची लग्ने होईपर्यंत. माझ्या आजोळच्या आज्या दोन. थोरली आणि धाकटी. धाकटी बिचारी कामाच्या ओझाखाली दबलेली. थोरली तिच्यापेक्षा वयाने वयस्कर पण तीच घराची सुभेदार.

एक आठवण सांगतो, सकाळची वेळ थंडीचे दिवस, त्यावेळी मी चहा पीत नव्हतो, पण काय हुक्की आली माहीत नाही माझी धोंडी मावशी चहापीत होता, ती आशाची आई. मी तिच्या पुढ्यात घुसलो.... झाले गरम गरम चहा पडला माझ्या अंगावर. माझी आरडाओरड. मावशीचा दोष काही नव्हता... पण आजी तिच्यावर रागावली. शिव्यांची लाखोली... तिने माझे अंग पूसले.. बिच्चारी... !

आमच्या आजोळी घरात 3/4 गाई, दोन म्हशी, रेड्याचा नांगर, बैलाचा नांगर आणि 3/4 खंडीची शेती. भाताची, नाचणी, वरी, कांग, जीरगे भात हे तर आताच्या इंद्रायणी व बासमतीचा बाप, काय सुंगध असायचा शिवाय भडस, वरगळ, शिवाय इतर भाताच्या जाती लावल्या जायच्या, बियाणे घरचेच.

a

हरीकाचीही लागवड केली जायची, फार नाही, पण त्याची गोष्टच न्यारी असायची, मळणीत मला हुंदडायला मिळायचे. बैल हाकलायचे काम माझे. मग काय खाज सुटायची अंगाला. त्यात हा खेळ 3/4 तास चालायचा.

मी लाडूला घरातला. मला दूध, मला तांदळाच्या भाकऱ्या, बाकिच्यांना दाण्याच्या भाकऱ्या. आजोबांचे घर तसे फार मोठे नव्हते. अर्धे कौलारू उरलेले पेंढ्यानी शाकारलेले होते.

त्यांचा सगळा व्यवहार भात देऊन चालायचा म्हणजे मासळी भात देऊन, मजूरी भात देऊन, चपला (पायताण) भात देऊन पैसा नसायचाच. पण मी तिकडे गेलो नी, बाबा म्हणजे दादा रू. 10/- पाठवायचे त्यातून मीठ-मसाले, कांदे बटाटे विकत आणायचे.

मला एक सवय होती, आजोबा चिपळूणला गेले की येताना काचल्याच्या खिशातून चणे (भाजके) आणायचे. पण एकदा माझा अंदाज चूकला. दुसऱ्या खिशातला तंबाखू मी तोवर भरून खाल्ला. झाले तोंडाचा आगडोंब. पोटभर मार खाल्ला. पुन्हा असे घडले नाही.

घरच्या गाई-म्हशींच्या दुधाचे उकाडे मुंबईकर आल्यावर लागायचे. पैसा यायचा पण नगण्यच. पण दर दोन दिवसानी ताक व्हायचे आजी विकायची तूप, दही तेवढीच. सगळा व्यवहार तिच्या हातात. शिव्या खायची माझी खरी आजी. हाल बघवत नसायचे तिचे.

मी बऱ्याच उचापती केल्या, विठ्ठलाच्या मंदिरात सप्ता असला की शिवाय ललीताच्या वेळी चुरमुऱ्याचे, शेंगदाण्याचे लाडू करून विकायचा. पैसे

a

खूप मिळायचे. दोन्ही आज्या मदत करायच्या. मी एकमेव दुकानदार, पथारी टाकून देवळासमोर बसायचा. तीन वर्षे हा धंदा केला.

दुसरा एक छंद जडला होता. मुळात माझी चित्रकला चांगली. रंग-संगतीची थोडी फार जाण होती. मी गणपती काढायचे ठरवले. माती आमच्या भोकरीतल्या कवालट्यात मिळायची. पाऊस पडायला लागला की एका मोठ्या दगडाखालून वहायला लागायची. मग माझी चंगळ. तत्पूर्वी मी बैल, गाय यांची चित्रे काढायचो. सिंह, वाघही करायचो. घोडा माझा आवडता प्राणी पण माथेरान, महाबळेश्वरलाच त्यावर बसण्याचा योग आलाय. आणि पुन्हा 'वैष्णोदेवी' दर्शनाच्या वेळी व मगच 'चारधाम' च्या यात्रेच्या वेळी असो.

तर हा छंद मग गणपती काढण्यात गुंतवला. 30/35 गणपती पहिल्या वर्षी काढले तत्पूर्वी मी गोसावी साचातून गणपती काढीत त्यांच्याकडे जाऊन (अंबू जंगमाकडे) पहात असे कलर काम त्यांचे एकाच रंगाचे. पण मी सगळे रंग वापरले त्यात आमच्या घरचा गणपती मोठा.

एकदा काय झाले आमच्या गणपतीच्या वेळी माती ओली सापडली. मी ती मूर्ती भिंतीला टेकून ठेवायला विसरलो. सकाळी पहातो तर वजनाने व ओली असल्याने मागे कलली. पुन्हा ती सरळ होईना मग खूप मेहनत करून दुसरी करावी लागली. अनुभवातून शिकत गेलो. माझ्या कडच्या गणपतीच्या किमतीचा टॅग नसायचा. देतील ते पैसे. पण पहिल्या वेळी सगळ्या मूर्ती संपल्या.

मग दुसऱ्या तिसऱ्या वर्षी थोडा शहाणा झालो. खूप पैसे आले. मूर्त्या चांगल्या रंगसंगती छान, लोक खूष अजून माझ्या या वेडातून काय हवे होते?

a

पण 7 वी झालो, मुंबईला आलो आणि थांबले सारे ते कायमचे. असे प्रत्येक छंदाचे झाले. त्यात मुऱ्या मुरवणे, गळाने मासे मारणे, खेकडी पकडणे, त्यातला ‘मुऱ्या मुरवणे’ हा अनोखा प्रकार. थोडा समजवायला अवघड आहे, पण प्रयत्न करतो. ‘मुऱ्या’ म्हणजे छोटे मासे, अगदी करंगळी एवढे चवीला लाजबाब. मला बारकूने हा छंद लावला आणि मी माझ्या वाडीतल्या सगळ्या मुलांना.

त्याचे काय आहे. भेंडीच्या जोकीला आम्ही पुढे शेणकईतले काडू पकडून दोरात वा केसात मुलींच्या ओवून बांधायचे एका टोकाला. एक रोवळी घ्यायची आणि आमची मुलांची गँग पऱ्यावर जायची. पऱ्या म्हणजे छोटी नदी. हा सगळा उद्योग श्रावणात पाऊस कमी होतो तेव्हा. नदीलाही पाणी कमी होते, डोहाची डबकी होतात. आमचा धंदा सुरू. सुगीचे दिवस.

मुऱ्या पकडण्यापूर्वी अजून एक छोटीसी गंमत सांगतो. त्या पाण्यात पाय टाकून बसलो ना की ते मासे पायाचा मळ खायला येतात. मग येतो अंदाज आणि मग दगडावर बसून ती जोकीची काठी पाण्यात टाकायची दुसऱ्या हाताने दुसरे टोक पकडायचे एका हातात रोवळी. थोडी जोकी जडसर लागली की उचलायची नी रोवळीत घालायची 4/5 मासे झटकन रोवळीत येतात.

खायचे काय तो श्रावण महिना, आमचे घर उपासकरी अस्मादिक सोडून. आजी वैतागायची, शिव्या द्यायची पण प्रेमाने ते मासे व मुऱ्या तवीत शिजवून द्यायची. हा प्रकार दुपारचा कडाडून भूक लागलेली असायची. दोन-अडीच भाकऱ्या खाल्या की जठराग्नी शांत. 15 दिवस महिनाभर हा छंद चालायचा. मग नदीतले पाणी आटू लागायचे. मुऱ्यांना फाटा असून

नसल्यासारखा. आजी कुड्याच्या पानाच्या मोटल्या करून त्यात मुऱ्या ठेवायची. थोडे तीखट मीठ टाकायची आणि निंबरावर ठेवायची. तासाभरात रसायन तयार. काय राव चव असायची त्याला, लाजबाब 2 भाकऱ्या मिनिटात रीचवायचो मी. मग सिझन 'गळाने' मासे पकडण्याचा. काठीला तंगूस बांधून शेवटी गळ बांधायचा. मोठे काडू पकडायचे, द्रोणात ठेवायचे नी लावायचे गळाला. नी पाण्यात सोडायचे डोहाच्या.

त्यात ढोकरू, पितलांड्यर, सुतेऱ्या शिवाय खेकडीही पकडता यायची. पण राव तो छंद बऱ्याच वेळा महागात पडायचा. खेकडे गळ कापायचे म्हणून 3/4 गळ तरी सोबत ठेवावे लागायचे मला. हा छंद माझा एकट्याचा. कधी कधी 'धाकू' असायचा. या मासे पकडण्याला वेळकाळ नसायचा. पण पाऊस नको असायचा. आबूट असेल तर चालायचे पण उन्ह हवे असायचे. पाणी नदीतले थोडे तापायला हवे. मग मजाच मजा.

मी कधीही मासे पकडायला आजीला घरी सांगून जायचा नाही, मनाला येईल तेव्हा. फक्त जीभेला पाणी सुटायला हवे बस. बहुतेक रविवारी. एरव्ही शाळा. खूप मासे पकडले. पाचवी ते सातवीत असताना. सातवीत गेलो तेव्हा मी तसा तरबेज. थोडा मोठा होतो. सगळे छोटे मोठे डोह पालथे घालायचा. वेगवेगळे अनुभव यायचे. छोट्या खापरात डोहात एकदा माझे दोन्ही गळ खेकड्यानी कापले. मी टरकलो. असा अनुभव पूर्वी आला नव्हता आणि...

माझ्या आजीने सांगितलेली गोष्ट आठवली. तिने सांगितले त्या खापराच्या डोहात कधी जाऊ नकोस. पण न जाईल तर तो मी कसा ? ती म्हणाली होती, तो डोह सुनसान असतो. शक्यतो कोणीही तिकडे फिरकत नाही.

आणि यापूर्वी मी अनेकवेळा तेथे मासे मारले होते. पण माझी जागा मी बदलली आणि असे घडले, राव त्याची आठवण झाली त्या डोहात साती आसरा आहेत. माझी पार फाटली. मी माझे गळ, पिशवी घेऊन धूम ठोकली ती घरी येऊन थांबलो. रात्री ताप भरला. मग आजीला बोललो. तिने ताबडतोब अंगावरून काढले. सकाळी ताप उतरला. मग 4/5 दिवस मासे बंद. कोमात गेल्यासारखी मनाची अवस्था झाली होती. शिवाय आजोबांनी झापला ते वेगळे. माझी नजर सारखी काठीच्या तुटलेल्या तंगूसावर जायची. पडवीतून त्याला माळ्यावर टाकून ठेवला.

पण मासे खाल्लेला जीव कसला थांबणार, पुन्हा पाय वळले ते नदीकडे. फक्त ठिकाण बदलले.

एकदा एक भली मोठी सुतेरी गळाला लागली. ओढता ओढता दमलो पार. थोडे अंग शहारले. हा थोरला खापर. पण सावरलो. ते धूड घेऊन घरी आलो. घरी गणपती आले होते. तरी अठ दिवस मी एकट्याने मटकवली एकट्याने. मन धाई पर्यंत.

मग सातवीची बोर्डाची परीक्षा आणि मग रवानगी मुंबईला.

काल परवा मी माझ्या बंधूना म्हणालो,

“अरे गळ कोठे मिळतात?” मी

“मिळतात!” तो

“आपण जाऊया का गळाने मासे मारायला वाशिष्ठीवर!” मी

आता हे डोहाळे कसे पुरे होणार? पण मी जागा हेरलेय कामथ्याच्या तलावातली.

"तुला काय वेड लागलेय?" अरे तुला 75 वर्षे झाली! अजून नाही गेले हे वेड!" तो

मला गप्प बसण्यावाचून उपाय नव्हता. पण, अजूनही मन ओढ घेत आहे डोहाकडे !

खरे सांगू अजून खूप सांगण्यासारखे आहे. जगावे असे जगावे जगावेगळे, मस्तीत, धमाल, खरे तर या सगळयाचा माझा गुरू धाकू. आता तो नाही. तो नंतर पुण्याला गेला. त्याचे सगळे जगणे माशावर, मासे विकून एकदा तो मला म्हणाला आता गळाने मासे मारत एकी एक दुरकी दोन करण्यापेक्षा आपण दुसरा काही तरी फंडा शोधू तो त्याच्या आजोळी ओवळीला गेला होता पवारवाडीत. तिकडून सारे शिकून आला आणि आम्ही गुरवाच्या वाड्याजवळ एक बांधणे बांधले. खूप मासे मिळावे यासाठी त्याला त्याची गरज होती. माझे काय 4/6 मासे मिळाले की काम व्हायचे. तो विकायचा सकाळी मुंबईहून येणाऱ्या चाकरमान्यांना.

आता सांगतो हे काय गौडबंगाल आहे ते. नदितले पाणी आटत गेले की धाकू कामाला लागे. तो माझ्यापेक्षा दहा वर्षानी मोठा असेल. आई गेल्यावर तो एकटाच होता. त्याची गरज या पैशात भागे.

8/10 दिवस खपून बांधण बांधून झाले.

त्याचे असे की नदीचा उरला सुरला पाण्याचा स्रोत एका बाजूला वळवायचा. दोन गडगे घालायचे. वेलीनी बांधून त्यात दगड रचायचे बांबूनी वर माचण करायचे. त्याखाली मोकळी जागा. त्या माचणाला 4 ते 5 होल मारायचे नि पाण्याचा प्रवाह त्यात सोडायचा. त्या खाली टोके लावायचे. पाणी कमी होत

गेले की मासा उतरायला लागायचा. त्या होलमधून टोक्यात पडायचा. दोन दिवसानी टोके काढायचे. चिक्कार मासे मी तेव्हा सातवीला होतो. मला नेहमी जाता येत नसे पण धाकू घरी मासे पोहोचवायचा.

माझी सातवी झाली नि मी मुंबईला गेलो नी धाकू त्याच्या भावाकडे पुण्याला .

त्या टोक्यात अनेकवेळा दिवड सापडायचे. खूप सांभाळायला लागायचे. कसे ती धाकूच जाणे.

आता येथे हे माशांचे पुराण संपलेले नसे हं. माशाची खरी पर्वणी जेव्हा पाऊस पडे तेव्हा, मासा मोठ्या नदीतून वर चढायचा उलटा प्रवास करीत. याला चढणीचा मासा म्हणायचे. मासा चढला की शेतात उतरायचा अंडी सोडायला गाभोळलेला. जबरदस्त चवदार. मग काय लोक चोंड्याच्या मुशीवर कोयना लावायचे. झेली लावायचे. बायका साडीच्या सोग्यात मासे पकडायच्या. मोठी चंगळ व्हायची सगळयांची. हा खेळ 4/6 दिवसाचाच. पाणी वसरले की चोंड्यात अडकलेले मासे संपत. मी, आजोबा टोपली टोपली मासे आणायचे.

आमची आजी हे मासे हळद, मिठ लावून सुकवायची व पेंढ्यात बांधून ठेवायची. पावसाळयासाठी पेंढ्याच्या उष्णतेने खडखडीत व्हायचे मासे. राव काय चव असायची. खाणाराच जाणे काय !

एकदिवस पेढांब्यात राहून मी माझ्या गावाला टेरवला आलो. आठवणीतल्या पेटाऱ्याचे पहिले पर्व शब्दांत बांधून. आपल्यासाठी. तात्पुरता पेटारा अर्धा उघडा ठेवून .

|||||

# धूमशान

ग्रामपंचायतीच्या निवडणूकीच्या धामधूमीत एकमेकांचे कपडे उतरण्याचा कार्यक्रम प्रचार बंद होईपर्यंत चालू होता. उमेदवाराने किती पैसे खाल्ले, विरोधकांना पोलीस स्टेशन दाखविले. इतकेच नाहीतर गावाची वाट लावली ती वाड्या-वाड्यात भांडणे लावून शिवाय किती पैसा खाल्ला, गावातल्या योजनेतून, रस्त्याच्या काँट्रॅक्टरकडून, खाजण जमिनी खडी कामासाठी पैसे घेऊन ग्रामपंचायतीने कसे पैसे उकळले येथपर्यंत दोन्ही सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात चढाओढ लागली होती. आमदार, खासदारांच्या निवडणुकीत पैशाचा धुर निघत नाही एवढा धूर निघाला प्रचारादरम्यान की काही विचारू नका.

पाच वर्षांनी येणारी ही निवडणूक शिरगावमध्ये पूर्वी कधी रंगली नव्हती असे बुजूर्ग सांगतात. पैशाचे वाटप राजरोसपणे चालू होते. दोन आमदारांचे दोन गट, पक्ष वेगळे, ओत-ओत ओतला पैसा आपल्या प्रतिष्ठेसाठी. एक आजी आणि एक माजी. गेले पंधरा दिवस निवडणूक जाहीर झाली आणि मतदारांची करमणूक झाली हे काही सांगायला नको.

दोन पॅनल मधली ही निवडणूक. पूर्वी गाव पॅनलमध्ये बिनविरोध निवडणूक व्हायच्या. ही या गावाची परंपरा. पण गेल्या निवडणूकीत जे घडले त्याची पुनःरावृत्ती झाली यावर्षी. पूर्वी लोक विसरून जायचे निवडून आलेल्यांना पुढच्या पाच वर्षात हजाराचे लाख कसे कमावता येतील याच

बिमारीने गावात रंग आला होता. हे धूमशान रंगणार पूर्वीपेक्षा यापुढच्या पाच वर्षात असा रंग दिसत होता.

यावर्षी दोन पॅनलमध्ये धूमशान रंगले. त्यात सरपंचाच्या जागेसाठी प्रत्येकी एक उमेदवार ठरला. आपण नक्की निवडून येणार, आणि वर्षभरात गाडी, बंगला या स्वप्नात रंगलेल्या दोन्ही उमेदवार मातब्बर. या निवडणुकीत ओपन क्लासमध्ये निवडणूक होणार होती. म्हणजे जाती-पातीला फाटा पण दोन जातीत गाव विभागला गेला. मराठे आणि इतर जाती.

सत्ताधारी पक्षाचा उमेदवार तगडा. त्याला रतीब होता आजी आमदाराचा. दोन्ही उमेदवारांनी लाखांनी पैसा ओतला हे गावाच्या आजच्या वातावरणावरून वाटत होते. एका मताला पाचशे रू. हा रेट. मतदारांची चंगळ, दोघांकडून पैसे घ्यायचे आणि मत तिसऱ्याला द्यायचे. या चर्चेला अगदी उधाण आले होते पण निवडणूकीच्या दिवशी चिडीचूप. रात्री-अपरात्री थैल्या वाड्या वाटून वाडी-वाडीवर तेथील कार्यकर्त्यांच्या मार्फत पोहोचत होत्या.

गाव तसे बदनामच. गेल्या दहा वर्षाचा इतिहास म्हणून रात्रंदिवस पोलीसांची गस्त फक्त गस्तच हा. दहानंतर गस्त बंद. ते आज या उमेदवाराकडे पार्ट्या झाडत तर उद्या त्या उमेदवाराच्या घरी. सगळाच देखावा हो. भ्रष्टाचाराचा कळस गाठला होता गेल्या पंधरा दिवसात. मात्र उत्तररात्री सगळे सामसुम. श्रीमंत उमेदवारांचे ठीक, पण गरीब उमेदवारही काही गप्प नव्हते. “पैसे त्यांच्याकडून खा, पण मते आम्हाला द्या!” असे सांगत. इतर उमेदवार दिवस-रात्र वाडी-वाडीतील वार्डात गस्त घालीत होते. सगळ्यानाच वाटे मीच येणार निवडून पण

मतदार बिलंदर. हासत स्वागत करायचे उमेदवारांचे “तुम्हांलाच मत देणार!” हे प्रत्येकाला सांगत, खरे तर हा चुना लावण्याचा प्रकार होता.

आता हे पहा, दोन उमेदवार दोन पार्टीचे एक पुरूष- रामभाऊ आणि दुसऱ्या पार्टीची रत्नाबाई आणि प्रत्येक पार्टीचे एक एक उमेदवार, बीन बुडाचे अनेक लोक या निवडणूकीत उभे राहिले होते. क्रॉस व्होटींगसाठी ते वेगळेच.

रत्नाबाई तशी कोण त्याही पार्टीशी संबंध नसलेली पण नंतर पुरस्कृत केलेली. मात्र रामभाऊ मात्र घड्याळ वाल्यांचे दहा जागांसाठी पन्नास लोक उभे होते. आपले नशीब आजमावायला.

सुरूवातीला आमदार, माजी आमदार या चक्रात नव्हते म्हणजे त्यांचा काहीच मागमुस नव्हता पण माजी आमदार गटाच्या रामभाऊंने आजी आमदाराच्या कळपात उडी घेतली आणि या टग्याने सारे वातावरणच बिघडवले. हा माजी आमदाराच्या प्रतिष्ठेचा प्रश्न झाला, कारण तो गावचा सुपुत्र होता. राव मग धुमशान सुरू झाले.

निवडणूकीचा दिवस पार पडला. प्रत्येक उमेदवाराने रिक्षा, गाड्यातून मतदार आणले. मतदान 80% झाले. हे पहिल्यांदाच होत होते. सगळेच संभ्रमात कोण येणार. या वाढीव 20% मतामुळे काहीही होऊ शकते, असा होरा दोन्ही पार्टीचा. संध्याकाळी 5॥ नंतर गावात शांतता आणि चर्चेला उधाण. प्रत्येक जण आपण येणार निवडून याच गुर्मीत होते. पण या वाढीव मतानीच सारा बाज बिघडवला सत्ताधारी पक्षाचा. पैसे खाल्ले पण मतदान विरोधकांना. असे काही मतदार बेईमान होतील याचा कयास कोणालाच नव्हता.

त्याचे कारणही तसेच होते. मागच्या पाच वर्षात ग्रामपंचायतीतील टग्याचा वावर फारच होता. खरेतर तो ग्रामपंचायत सदस्य नव्हता. पण सरपंचाच्या रूबाबात वावरायचा. सगळी टेंडर यालाच किंवा एखादे दुसऱ्याला लागले तर त्याच्या विरोधात रान उठवायचे. हा त्याचा धंदा शिवाय पोलीस स्टेशन, मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रारी होत हे काही शहाण्या माणसाचे काम नाही, हा लोकाना आलेला गेल्या पाच वर्षाचा अनुभव.

रत्नाबाई ही घरकाम करून पोट भरणारी महिला सरपंचाच्या निवडणुकीत डमी म्हणून विरोधी गटाने उतरवली. एकदाच ती माजी आमदाराबरोबर वाडी-वाडीवर फिरली. नव्हते ओळखत तिला कोण, नऊवारीत वावरणारी मध्यम वयस्क महिला कसली येते निवडून. डिपॉझीट जाणार याच विचाराने ती उभी होती. तिला खरेतर जबरदस्तीने उभे केले होते. हे प्रत्येकजण जाणत होते. खरेतर माजी आमदार दुखावला होता. त्याचा टग्या बेईमान झाल्याने. आजवर माजी आमदाराच्या दावणीला बांधलेला हा बैल बेईमान व्हायला कारण तसेच झाले.

गावात मतदानापूर्वी दोन दिवस अगोदर आजी आमदाराची सभा झाली. खूप स्तुती केली रामभाऊंची आणि दुसऱ्या दिवशी दुपारी माजी आमदाराची सभा. त्यांनी टग्याचा सगळा भ्रष्टाचार बाहेर काढला. खरेतर त्यात खूप माया माजी आमदाराने कमावली होती. पण इगो शिगेला पेटला होता. हा रामभाऊ निवडून येऊन भ्रष्टाचारच करणार हा संदेश गावात व्हायरल झाला होता. पण पैशाने त्यावर मात करता येते हे आजी आमदाराला माहिती होते. ही निवडणूक त्याची प्रतिष्ठेची झाली होती. पुढे चार महिन्याने आमदार किती निवडणूक

लोकसभेच्या निवडणूकीनंतर वा कदाचीत बरोबर घेतली जाईल असा अंदाज त्यांना होता.

मत मोजणीच्या दिवशी गावातले वातावरण तापले होते. प्रत्येक गटाने आपले कार्यकर्ते जमा करून बेंजो वाजवून निवडणूक जिंकल्यावर मिरवणूक काढायची अशी जंगी तयारी केली होती. सत्ताधारी पक्षाकडे कार्यकर्ते खूप. त्या मानाने विरोधी पक्षाचे हाताच्या बोटावर मोजता येणार एवढे.

मत मोजणी रंगात आली होती. चढ उताराच्या बातम्या बाहेर येत आणि झिंदाबादच्या नाऱ्यानी सारा परिसर दणाणून गेला होता. संध्याकाळच्या श्रमविहारासाठी बराच मोठा कोठा आला होता. खरी रंगत संध्याकाळीच येणार होती. विरोधी उमेदवार ‘कडकाराम’ त्यांच्याकडे कोण शौकीन फिरणार. रामभाऊंनी मोठे स्टेजच उभारले होते त्यावर ते, आजी आमदार आणि त्यांचे चमचे बसले होते. रत्नाबाई तर घरीच होती तिच्या घरासमोर एक बॅनर लावून तिच्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी बसली होती.

आणि दुपारी 12॥ वाजता निकाल आल, रत्नाबाई 200 मतांनी सरपंच पदी व तिचे सहा सदस्य निवडून आले. रामभाऊंच्या गोठात चलबिचल झाली. चिपळूणला रहाणारा रामभाऊने केव्हाच पलायन केले आणि जाताना सगळा माल तो घेऊन गेला. आशाळभूत नजरेने वाट पहाणारे सगळे रत्नाबाईच्या गोटात जाऊन मिसळले बेमालूमपणे.

दोन दिवस रत्नाबाईच्या मिरवणुका चालू होत्या. माजी आमदार रूबाबात वावरताना दिसत होता. लाजेस्तव थोडा माल त्याने मागवला.

मतदारांची नाराजी घालवाया. सगळे पारडे फिरले होते. आता पुढे काय होणार ? असा प्रश्न गावातल्या सर्व लोकांना पडला होता.

त्याचवेळी केंद्रीय सरकारने बजेट जाहीर केले आणि योजनांची खैरात ग्रामपंचायतींना मिळाली. नेहमीच्या पाच पट पैसा गावात येणार होता. अनेक योजना कार्यान्वित होणार होत्या. गावात सोन्याचा धूर निघणार होता. रत्नाबाईच्या गोटात सामसुम सगळे अशिक्षित उमेदवार. एकालाही ना योजनांची माहिती ना सरकारी खात्याचा अनुभव. रत्नाबाईला मोठा प्रश्न पडला आणि तिच्या बरोबर दररोज माजी आमदाराचा ग्रामपंचायतीत वावर सुरू झाला. तो बिलंदर सगळ्या खाचा खोचा त्याला माहिती. अगदी टेंडर पासून निधी वाटपापर्यंत.

माजी आमदाराची पूर्वी एक सोसायटी होती तिच्यात 90% लोक बोगस. अर्धेअधिक स्वर्गात गेलेले पण त्यांची बँक अकाऊंट चालू. त्यांचा शेअर त्यांच्या अकाऊंटमध्ये जाई व अंगठे लावून माजी आमदार खाई.

अगोदरच मागच्या सरपंच व सदस्यांबद्दल अनेक तक्रारी मा. आमदारानेच केल्या होत्या. त्याचे शुक्लकाष्ठ त्यांच्या मागे लावण्यात तो यशस्वी झाला. रामभाऊ विरूध्दच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींची चौकशी सुरू झाली. गावातले सगळे वातावरणच बिनसले होते. पण रामभाऊ खमक्या. निवडणूका हरल्यावर त्याने आजी आमदाराला सोडले आणि माजी आमदाराची शेपटी पकडली. पण तो काही कान हालवायला तयार नव्हता. रामभाऊने त्याचे पाय धरले.

"भाऊ! अहो माझ्या पोटापाण्याचा प्रश्न आहे आणि गावातल्या योजनांशिवाय मला तरणोपाय नाही. मला तुम्ही आधार द्या ! मी मरेन नाहीतर!" रामभाऊ.

"पण माझ्या सोसायटीचे काम पहायचे. हाय कबूल? मी सांगेन तसे करायचे! तुझा हिस्सा तुला मिळेल! आणि माझ्या पोटपाण्याचा प्रश्न सुटेल. खर्च वाढलाय. माझे पेंशनमध्ये भागत नाही. वर्षाकाठी दहा लाखाची कमाई होईल असे करायला हवे. तू आमच्या सरपंच बाईला पटवायचे. चेकवर तिचीच सही चालते हे ध्यानात ठेव!" माजी आमदार

"तुम्ही म्हणाल तसे!" रामभाऊ

"अगोदर दोन करोडाची पाणी योजना राबवायची. गावातील लोकांना मागचा अनुभव आहे, शिवाय आमचे विरोधक काही गप्प बसणार नाहीत. ते सत्ताधारी पक्षाचे आहेत. सगळेच बिलंदर. सगळे व्यवहार जपून व्हायला हवेत. बघ जमतय काय? आणि पुन्हा पलटी मारायची नाही. मला यावेळी ही विधानसभेची निवडणूक लढवायची आहे. आमची पार्टी फुटलेय. मी मोठ्या साहेबांबरोबर आहे. हे ध्यानात आहे ना. मला तिकीट मिळेल. मी आमदार झालो तर तुझी व्यवस्था करीन. पण पुनः बेईमानी करायची नाही! काय !" माजी आमदार.

"तुम्ही म्हणाल तसे, नाहीतरी पूर्वी वीस वर्षे मी तुमच्याबरोबर होतो ना. तुमच्याच मार्गदर्शनाखाली गाव फोडला. वाड्यावाड्यात भांडणे लावली. देऊळ हे कारण होतेच. मी पटवतो विरोधकांना साले कंगाल झालेयत या

a

निवडणूकीत. आता माजी सैनिकांची लॉबी मान वर काढतेय, त्यांना आवरा; नाहीतर आपल्यालाच गाशा गुंडाळावयास लावतील हं!" रामभाऊ.

"रामभाऊ, तुमचा अनुभव चांगला, तुमच्या खांद्यावर बंदुक मी आजवर ठेवीत आलो पण आता ते जमणे कठीण दिसतेय... तुम्ही त्या सरपंच बाईला पटवा! काय?" माजी आमदार

आणि रामभाऊचा राजरोस वावर ग्रामपंचायतीत होऊ लागला. त्याला सगळ्या खाचा खोचा माहिती होत्या. त्याने रत्नाबाईला पटवण्याचा प्रयत्न केला तशी ती विधवा. आगापिछा काही नव्हता. तीला रामभाऊने पटवली. एक सीट को ऑफ करून घेण्याची सोय होती. तिने राभाऊला आपल्या कळपात घेतले. रामभाऊ पक्का हरामी. त्याने ग्रामपंचायतीतील सगळ्या स्टाफला हाताशी धरले. आणि त्यानाही पंखाखाली ओढले. पैशाचे तुकडे पाहून तेही चळले. रामभाऊ सगळा पत्रव्यवहार झाल का पंचायत जिल्हा परिषद, यांची पत्रे लिही आणि सरपंच रत्नाबाई सही करी. आता सगळी कामे अगदी सुरळीत चालली होती. पैशाचा धूर निघत होता. वर्षभर लोकांना ग्रामपंचायतीत काय चाललेय कळत नव्हते.

आणि अचानक मागच्या पाच वर्षाचे ऑडिट करण्यास पार्टी आली आणि रामभाऊ ग्रामपंचायतीत येणे बंद झाले. त्याने मुंबई गाठली. हे चौकशी आणि ऑडिटचे प्रकरण आता गळयाला लागेल याची भीती त्याला होती. रामभाऊच्या खेपा आता सचिवालयात चालू झाल्या. मंत्री ओळखीचे होते पण त्यांनी या प्रकरणात काहीही करण्याची तयारी दाखवली नाही. चौकशी कमिटीने ऑडिटचे रिमार्क हाताशी धरून माजी सरपंच शैलजाबाई आणि

सदस्य यांनाच यात गोवले. त्यांनी बोटे दाखवली रामभाऊ यांच्याकडे आणि रामभाऊ ने माजी आमदार कडे हे सारे प्रकरण आजी आमदारच हँडल करीत होता. तो सत्ताधारी पक्षात. त्याची करडी नजर ग्रामपंचायत ऑडिट होताना होती ऑडिट पार्टीला पटवण्याचा प्रयत्न रामभाऊ ने केला पण उपयोग नाही झाला. चार कोटीचा टेंडर मागवीत पण काम कोणाला देत नसत. सोसायटीत सोन्याचा धूर निघत होता. पण म्हैस पाण्यात बसते तशी रुतली चिखलात. सोसायटीची ही गेल्या दहा वर्षाची चौकशी सुरू झाली. गेल्या पंधरा वर्षात सोसायटीचे ऑडिट झाले नव्हते. चॅरिटीला रिपोर्ट गेले नव्हते. त्याची नोटीस आली आणि पाठोपाठ सीबीआयची टीम रामभाऊ, माजी सरपंच आणि माजी आमदार यांच्याकडे दाखल झाली. घाम फुटला होता सगळ्यांना. यातून सुटली ती रत्नाबाई. पण ग्रामपंचायतच निलंबित करण्यात आली आणि सरकारी अधिकारी येऊन त्याने ग्रामपंचायतीचा ताबा घेतला. सीबीआयच्या रेडमध्ये बराच माल माजी आमदार, रामभाऊ व माजी सरपंच यांच्याकडे मिळाला. त्यातून ग्रामसेवक ही सुटला नाही. तोही या घोटाळयात होताच. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याची दर दिवसाआड येणे होई. पण सगळया योजना बंद होत्या.

आता नवीन आघाडी स्थापन झाली होती. त्यात मिलिट्रीवाले, निवृत्त सरकारी अधिकारी यांचा दबाव गट गावात या बंद योजना चालू व्हाव्या म्हणून मंत्र्यांपासून सगळ्यांना पत्र व्यवहार करीत होते. आजी आमदाराचा पाठिंबा होता. पण या धुमशानात खरे तर गावाचे नुकसान झाले. कलेक्टरकडून फंड येणे बंद झाले. पैसे येत त्यातून फक्त कर्मचाऱ्यांचा पगार दिला जाईल पण एक गोष्ट

a

चांगली झाली गावातील घरपट्टी 100% वसूल झाली व सगळा खर्च भागवला जाऊ लागला. सरकारी लेव्हलवर गाव बदनाम झाला. त्याचे पडसाद तालुका जिल्हा सगळ्या स्तरावर जाणवू लागले सगळ्या चोरांविरुद्ध एफ आय आर फाईल झाले आणि केस चालू झाली जिल्हा न्यायालयात. पण तातडीची ऑर्डर कोर्टाने दिली माजी आमदाराला पुढील दहा वर्षे निवडणूक लढवण्यास बंदी आणि रामभाऊ, माजी सरपंच यांना तीन-तीन वर्षाची सजा झाली.

आता या धुमशानीच्या चिखलात बुडालेली गावाची पत कधी पुन्हा येणार माहित नाही पण आता गावात शांतता होती एवढे खरे !!

|||||

# पडताळा...!!

आप्पासाहेब मुंबईच्या कस्टम खात्यातून निवृत्त झाले आणि आपल्या पत्नीसह बोरिवलीत एका टू-रुम किचन हॉल फ्लॅटमध्ये राहत होते. ते निवृत्त झाले पण त्यांची पत्नी जी एम.टी.एन.एल. मध्ये सर्विसला होती तिच्या निवृत्तीची वाट पाहत होते. या दोघांच्या वयात दहा वर्षाचे अंतर. आप्पासाहेब निवृत्त झाले तेव्हा त्यांचे वय होते साठ त्यावेळी पत्नी वनिता यांचे पन्नास वर्षे. त्या ऑफिसला निघून जात आणि आप्पा एकटेच घरी राहत होते. त्यांना कोणतेही व्यसन नव्हते. पत्नी जेवण करून जायच्या आणि दुपारी जेवून आप्पा ताणून द्यायचे ते पाच वाजता पत्नी दाराची बेल वाजवत नाही तोवर. ते निर्व्यसनी होते ना दारू ना तंबाखू ना गुटका त्यामुळे तब्येत छान राखली होती त्यांनी.

आप्पासाहेबांना एक मुलगा, जो मास्टर्स करून अमेरिकेतच नोकरी लग्न करून सेटल झाला. केव्हातरी दोन-तीन वर्षांनी यायचा चार-सहा दिवसांसाठी. पुन्हा परत गेल्यावर विसरायचा आई-वडिलांना. केव्हातरी फोन येई. हाय हॅलो झाले की फोन बंद. मुलांच्या सहवासाचे, नातवंडांच्या सहवासाचे सुख म्हणाल तर शून्य. मुलाची पत्नी अमेरिकन. तिला त्यांनी कधी बघितली ही नव्हते. फक्त फोटोत.

शिवाय पत्नीची नोकरी शिफ्टची तिन्ही शिफ्ट तिला कराव्या लागत. ती फार कमी वेळ घरी असे. आणि असे तेव्हा झोपेत. आता हा प्रकार निवृत्ती

नंतर त्यांना अधिक त्रासदायक एकाकीपणाचा जाणवू लागला होता. त्यांनी तिला निवृत्ती घे असे सांगूनही ती काही नोकरी सोडायला तयार नव्हती.

दोन महिन्यांपूर्वीची गोष्ट, तिने आप्पांच्या सांगण्यावरून एक महिन्याची रजा घेतली पण तिच्या घरी असण्यालाच आप्पा कंटाळले होते. ना बोलणे, ना काही. कारण त्या कधीच रजा घेत नसत. तिलाही आप्पांचा धसुसळेपणाचा दिवसभराचा सहवास नकोसा झाला. काहीतरी बिनसले होते खरे .

त्यात आप्पांनी अष्टविनायक यात्रेला जायचे ठरवले पत्नीला घेऊन. ती देवभोळी. रेंगाळत रहायची गणपतीच्या मूर्तीजवळ. अबोला धरून. हेच आप्पांना कंटाळवाणे झाले होते. गाडीत ती सतत हातात माळ घेऊन गणपतीचा कसली तरी मंत्र म्हणत बसायची. पुऱ्या प्रवासात अबोल. तो तीन दिवसाचा प्रवास ना बोलणे, ना हसणे, काही नाही. आप्पांना तिचा राग येई. पण कसे बोलावे? ती डोळे झाकून गाडीतून फिरे परत मंदीर आले की तोच प्रकार, मिळून त्या तीन दिवसात ना गप्पा, ना प्रपंचाबाबत बोलणे, ना मुलांबद्दल. ते तीन दिवस आप्पांना शुष्क कोरडे गेले असे वाटले. तिने महिन्याची रजा 15 दिवस कमी करून नोकरीवर जाऊ लागली. आप्पांच्या नोकरीत, ऑफिसमध्ये सगळ्या स्टाफ बरोबर गप्पा होत. काही फंक्शन होत. वाढदिवस साजरे होत त्यामुळे आप्पांना तेच वातावरण अंगवळणी पडले होते. पण निवृत्ती शुष्क, वेळ जात नव्हता. दिमतीला होता तो फक्त टी.व्ही, मॅड बॉक्स.

आप्पा स्वतः स्पोर्टसमन होते. अॅथलॅटिक, क्रिकेट, ब्रिज खेळणारा त्यांचा पिंड. राव शुन्यातून वावरताना, कसा झाला असेल याची तुम्ही कल्पना करा. त्यांना नाटक, सिनेमा पहायला आवडत असे. पण आता सर्वच बंद झाले

a

होते. पैसा खूप कमविला त्यांनी. पण त्याचा काडीचाही उपयोग नव्हता. अशा रांगड्यावृत्तीच्या माणसाला आताशा दिवस खायला उठे. खूप विचार केला त्यांनी पण मार्ग सापडत नव्हता. ऑफिसमधले लोकही दुरावले. इतर मित्रमंडळी कोणी नव्हतेच. टी.व्ही एके टीव्ही डोके भणाणून गेले होते त्यांचे. त्यापेक्षा मरण बरे असे त्यांना वाटत होते. पण ते तरी एका हट्टाकट्टा, आजार नसलेल्या माणसाला कसे येणार ? काहीतरी लिहावे आपण, तर मन स्थिर होत नव्हते. भरकटत जायचे दूर स्वप्नांच्या दुनियेत. पण तिही तकलाऊ होती. घराच्या चार भिंती त्यांना आता खायला निघाल्या होत्या. घरात पत्नी असली तरी ती आपल्या कामात. या सगळयाने आप्पा पार काऊन गेले होते. जीवनाला कंटाळले होते.

त्यांचा देवावर विश्वास नव्हता. आपणच देवानाच तयार केले. मग आपले मन त्यात कसे रमावे ? या समजूतीपाई चक्रव्युहात सापडल्यासारखी त्यांची अवस्था झाली होती. बीपी वाढत होता. मन बेचैन अशावेळी मरण कधी येईल याची वाट पहात होते. एक दिवस त्यांचे मित्र जयंत घरी आले. प्रत्येक जण आप-आपल्या कैफीयती सांगत होते.

पण त्यांनी एक मार्ग सुचवला. आपण कोणातरी गुरूच्या मठात जाऊन त्यांचा अनुग्रह घ्यावा. दोघांचे एकमत झाले आणि एकदा तशी संधी चालून आली. लोणावळयाला जाऊन आपण कचरनाथ महाराजांचे दर्शन घेऊ. त्यांना आपली व्यथा सांगू आणि ते सांगतील त्या मार्गाने जाऊ. त्यांचा मठ साठ एकरात होता. खूप इमारती, बरेच लोक म्हणजे हजारोनी, देशी परदेशी होते. त्यांचे आगमन होई. रहायला-खाण्याला उत्तम सोय असल्याने कोठेच अडचण

नव्हती. आठवडाभराच्या विरंगुळयाने आप्पांना खूप बरे वाटले होते. ते अनुग्रहांसाठी गुरूपौर्णिमा केव्हा येतेय याची वाट पहात होते. एप्रिल महिन्यात गुरूपौर्णिमेला जयंत व अप्पा दोघेही पुनः लोणावळयाला आले. मागे ते येथे येऊन गेल्यानंतर गुरूपौर्णिमेपर्यंत ते खरेतर रहायला हवे होते. विसरले होते पत्नी, प्रपंच. सन्यस्थासारखे रहायचे. त्यांच्यातला हा बदल बघून पत्नीही चक्रावली. बहुतेक हे कामातना गेले असेच तिला वाटत होते. पण त्यांची प्रपंचातली ढवळाढवळ बंद झाल्याने ती तर सुखावली होती.

एकदाचा एप्रिल महिना उगवला. आप्पा आणि जयंत दोघेही लोणावळयाला गेले. गुरूपौर्णिमा अजून आठ दिवसावर होती. त्या आठ दिवसात त्या दोघांनी अख्खा लोणावळा पालथा घातला. त्या आश्रमात त्यांना एक रूम दिला गेला होता. खाण्या-पिण्याची सगळी व्यवस्था आश्रमातल्या मेसमध्ये होती. ती दोघे दुपारी जेवणानंतर आश्रमातील वाचनालयात जात. तत्पूर्वी महाराजांचे दर्शन होई. आरत्या होत. त्या वाचनालयात खूप पुस्तके होती. पण सगळी धार्मिक. त्यातील गहन विषयात आप्पा रमून जात. ते संध्याकाळी आरत्यानाच परत येत. त्या पुस्तकात काही पुस्तके स्वतः कचरनाथ महाराज यांनी लिहिली होती. त्यात ज्ञानेश्वरीतील आध्यात्माची पूर्ण फोड त्यांनी केली होती. सारी गुपीते उघड केली होती. पण आप्पांच्या सगळे डोक्यावरून जात होते.

गुरूपौर्णिमेपूर्वी ते सद्गुरूंना भेटायला गेले. सकाळच्या प्रार्थना, भजन आटोपले. आज खरेतर गर्दी खूप होती. पूरा आश्रम भरलेला होता. पण तरीही आप्पांच्या मनातली मृत्यूसंबंधाची गोष्ट काही जात नव्हती. संधी मिळताच

आप्पांनी तो प्रश्न महाराजांना विचारला. तेही चक्रावले. यांना काय वेड तर लागले नाहीना. ते म्हणाले “बाळानो माझे वय आता 93 वर्षे आहे. मी ही तेच शोधतोय. पण मलाही अजून त्याचा शोध लागला नाही. पण ते आपल्या पाठीवर लिहिले आहे ते शोधा. जीवनातल्या बावन पत्याच्या खेळातला ‘एक्का’ च नेहमी जिंकवतो, आपल्याला पण तोच, जर हुकुमाने मारला तर!” गुरूमहाराज

तेव्हा तुम्ही हे खुळ डोक्यातून काढून टाका, भगवंताची भक्ती करा. जीवन क्षणभंगुर आहे. जातोय तो क्षण मजेत घालवा. भगवंताचे नांव घ्या तोच तुम्हाला शेवटपर्यंत उपयोगी पडेल. मृत्यूचे खुळ हा तुमचा भ्रम आहे. तो तर येणारच. येईल तेव्हा येईल. तुम्हाला कशाला त्याची काळजी करायला हवी. उद्या गुरूपौर्णिमेला मी तुम्हाला मंत्र देतो. त्याने उपासना करा. बाकी सगळे झूट आहे असे समजा. जीवनातला असा प्रत्येक क्षण भगवंताच्या नामस्मरणात घालवाल तर तुम्ही सुखी व्हाल. प्रपंचातून निवृत्त व्हा आनंदाचा एका एक क्षण उपभोगा. त्यातच तुमचे कल्याण आहे आणि हे ध्यानात घ्या मृत्यूची तारीख वेळ तुमच्या पाठीवर त्या भगवंताने लिहिली आहे हे ध्यानात ठेवा. त्याचा पडताळा तुम्हालाच उर्वरित आयुष्य शोधायचा आहे. पण त्यासाठी ध्यान करा. बस! गुरु महाराज.

दोघेही गुरूच्या रूममधून बाहेर आले पण त्यांच्या डोक्यातले खुळ काही जाईना त्या वेडाने त्यांना पछाडले होते. पण पाठ आरशात कशी दिसणार? घरात समोर पाहायला एक आरसा होता पण मागे कुठून आणणार?

गुरु पौर्णिमेला आप्पांना सद्गुरूंनी अनुग्रह दिला, पण पूर्ण नाही. ते म्हणाले, तुमच्या मनातले किल्मीश शंका सूर काढून टाका मग पुढच्या या महिन्याच्या पौर्णिमेला मी तुम्हाला नाम देतो त्याचे आयुष्यभर स्मरण करा तुमचा मार्ग तुम्हाला सापडेल म्हणजे त्याच्यामध्ये तुम्हाला त्याचा पडताळा घ्यायचा आहे हे ध्यानात ठेवा !

घरी आल्यावर त्यांनी मौनच धरले होते बायकोशी ना बोलणे हसणे सदानकदा आपल्या विचारात ते होते. त्यांच्या ह्या वागण्याने बिचारी बायको ही पार गोंधळून गेली होती. काय करावे काहीच तिला समजत नव्हते.

आप्पांचे जेवणावरचे लक्ष उडाले होते. दोन घास खात आणि उठत. तिने परत परत त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला तरी ते गप्पच.

दुसऱ्या दिवशी ते सलून मध्ये त्यांचे वाढलेले केस दाढी करायला गेले. अचानक त्यांना दिसला तो मागचा आरसा. त्या आरशात आप्पांचे अर्धे टक्कल दिसत होते त्यांना खरे तर पाठीवर काय लिहिलेले आहे याचा शोध घ्यायचा होता. पण शर्ट काढल्याशिवाय ते शक्य नव्हते. त्यांनी काखेतले केस काढण्याच्या बहाण्याने शर्ट काढले. मागच्या आरशात त्यांची गोरी पाट त्यांना दिसली. पण त्यावर काहीच दिसले नाही. अगदी कोरी. न्हाव्याला पैसे देऊन शर्ट घालून ते घरी आले. आंघोळ केली आणि न जेवताच आपल्या बेडरूम मध्ये गेले आणि कडी लावून घेतली. त्यांना प्रश्न पडला....

महाराजांनी सांगितले होते प्रत्येकाच्या पाठीवर लिहिलेले असते मृत्यूची तारीख वेळ पण माझी पाठ तर कोरीच आहे हे काय गौडबंगाल आहे ह्या विचाराने ते अगदी काऊन गेले म्हणजे गुरुजींना मी चिरंजीव आहे म्हणायचे

a

होते का? त्या महिन्यातील पौर्णिमा जवळ आली होती. त्यात आता सांगूनही जयंत आला नाही म्हणून आप्पा एकटेच लोणावळ्याला गेले. गुरुपौर्णिमेची गर्दी ओसरली होती. थोडेच लोक त्या मठात होते. दोन दिवस अगोदर आप्पा मठात आले. त्यांना माहिती पडले गुरुजींना बरे वाटत नाही. म्हणून त्यांनी त्यांना भेटण्याचा बेत रद्द केला. पण मठातच त्यांच्या रूममध्ये राहिले. मठात ध्यान कसे करावे याचा क्लास सकाळी सात ते नऊ असे दोन दिवस त्यांनी तो क्लास अटेंड केला. खूप काही नवे त्यांच्या हाती लागले असे त्यांना वाटत होते. सद्गुरु आजारी असल्याने पौर्णिमेचा नाम देण्याचा कार्यक्रम पुढच्या पौर्णिमेपर्यंत पुढे गेला. आता त्यांना त्यासाठी एक महिना तेथेच राहावे लागणार होते. गुरुजींची तब्येत काही ठीक होईना. डॉक्टर त्यांना मठातच येऊन औषधे देत होते.

तरीही एक दिवस सकाळी ध्यानाचा क्लास संपल्यावर आप्पा गुरुजींच्या रूममध्ये गेले त्यांना लांबूनच नमस्कार केला. गुरुजींनी त्यांना जवळ बोलावले त्यांच्या डोक्यावर, पाठीवर त्यांनी हात फिरवला...

"तुम्हाला पाठीवरची तारीख, वेळ वाचायला मिळाली का?" गुरूजी

हे गुरुजींचे वाक्य ऐकून आप्पा चक्रावले. म्हणजे सलून मध्ये मी माझी पाठ पाहिले हे गुरुजींना कसे माहिती पडले? आप्पांनी पुढे वाकून सद्गुरूंच्या चरणी मस्तक ठेवून नमस्कार केला. त्यांच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. आपले सद्गुरु त्रिकाळ जाणणारे आहेत, हे ते ऐकून होते पण आता त्यांना सद्गुरुंबद्दलचे बरेच काही माहिती झाले त्यांच्यावर विश्वास अधिक दृढ झाला.

आप्पा समोरच्या खुर्चीत बसले. त्यांनी डोळे बंद केले. गुरुजींच्या स्पर्शाने त्यांना समाधी लागली. ते आपले अस्तित्व विसरले. मग त्या खुर्चीत ते एक तास बसून होते. त्यातच त्यांना परमात्म्याचे दर्शन घडले. डोळयातून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. त्यांना समाधी लागली होती.

एक तासानंतर गुरुजींनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला "उठा!" आणि आप्पांना जाग आली.

"तुम्ही काय पाहिलेत?" सद्गुरु

आप्पा अबोल झाले होते. पुन्हा त्यांनी सद्गुरूंच्या पायावर डोके ठेवले व अश्रूंनी त्यांच्या चरणावर अभिषेकच केला त्यांची चर्या आता आनंदी झाली होती....

"तुम्ही चिरंजीव झाला आहात. आता दिलेल्या नामाचा सतत जप करीत जा. मृत्यू हा शरीराचा आत्मा अमर आहे. आणि तुम्हाला तर ते गूढच आता माहिती झाले आहे!" सद्गुरू

"म्हणजे?" आप्पा

"अहो तुम्ही अमर झाला आहात. आता शरीर फक्त स्मरणासाठी वापरा. मनावर ताबा ठेवा. मला तरी कुठे माहित आहे, माझा मृत्यू कधी येणार ते? असे मी म्हणालो ना मागे, ते तुमची परीक्षा घेण्यासाठी बाकी काही नाही. तो कधी येईल तेव्हा येईल त्याची चिंता करायची नाही. मात्र एवढे ध्यानात ठेवा जेव्हा दररोज समाधीला बसाल, आणि जे पहाल तोच परमात्मा आहे. समजा तुमची

पाठ कोरी होती ना मग तुम्ही अमर आहात. हे ध्यानात ठेवा पण आपली साधना चालू ठेवा!" सद्गुरु

आप्पा जे शोधत होते तो भ्रम होता. आता सगळ्या शंकांचे निरसन झाले होते. आप्पा शांत झाले होते. निश्चिंत सगळ्या शंकांचा 'पडताळा' आप्पांनी स्वतःच स्वतःच्या साधनेतून शोधला होता.

जेव्हा आप्पा घरी आले. त्यांच्या चर्येवर आता कमालीचे तेज, शांतता, मन स्थिर अशी अवस्था झाली होती. त्यांच्यात पडलेल्या फरकाने त्यांची पत्नी ही चक्रावून गेली होती. त्यांच्यात झालेला बदल, बोलण्यातले मृदूपण ईश्वर चिंतनात त्यांचा जाणारा पुरा दिवस पाहून तिलाही आनंद झाला होता. हा बदल कसा झाला, कोणी केला याचा थांगपत्ता तिला नव्हता. पण आप्पा हल्ली लोणावळ्याला जातात एवढेच तिला माहित होते.

तिच्या मनात आप्पांबद्दल कमालीचे प्रेम वाटू लागले होते. घरातलं वातावरण भक्तीमय झाले होते. हा बदल कसा झाला याचा ती शोध घेत होती. आप्पा दिवसभर नामस्मरणात असतात हे तिने जाणले. मृत्यूच्या खुळाचा पूर्ण 'पडताळा' आता झाला होता.

त्याच दिवशी तिने नोकरीचा राजीनामा दिला आणि आपले घर मंदिर झाल्याचा भास तिला होत होता. आता पुढे जगायचे ते आप्पांसाठी असा निर्धार तिने केला होता. आता आप्पा आनंदी, उत्साही दिसत होते. घराला घरपण आले होते. प्रपंच भक्तीमय झाला होता.

a

काही दिवसांनी जेव्हा आप्पा लोणावळयाला निघाले सद्गुरु ना भेटायला...

"अहो! मलाही तुमच्याबरोबर यायचे आहे!" पत्नी

"हो, का नाही!" आप्पा ...

आणि ते म्हणाले, 'सद्गुरू कृपा'!! 'सद्गुरू कृपा'!!

|||||

# परीक्षा जीवनदानाची

श्रीपतराव पेढांब्यातील जुने जाणते शेतकरी. 75 होऊन गेली तरी शेतीची कामे करीत होते. त्यांना मुलगा नव्हता भरपूर वडिलोपार्जित शेती. पण आता बरीचशी ओस ठेवावी लागत होती. सगळा प्रपंचाचा गाडा शेतात पिकणाऱ्या भात शेतीवरच अवलंबून होता. भाजीपाला घराच्या परसातच व्हायचा. दूध दुभते भरपूर त्याच्या उकड्यातून येणारा पैसा, तूप विकण्यातून येणारा पैसा हाच त्यांना आधार होता. या वयातही नांगर धरण्यापासून कौल तोडणे, भाजवण करणे, सारी कामे ते करीत असत.

विशेष म्हणजे अख्खा गाव, पंचक्रोशीतले लोक त्यांना गाई बैलांचे वैद्य म्हणून ओळखायचे. त्या काळात गुरांचे दवाखाने नव्हते. झाडपाल्याचे औषध देऊन गुरांचे आजार ते बरे करीत. अडलेल्या गाई म्हशी यांची बाळंतपणे तेच करीत. रात्री अपरात्री बोलावण्यात आल्यावर क्षणाचाही विलंब न लावता निरोपीयाबरोबर ते गावात पंचक्रोशीच्या दूर गावात जायचे. त्यामुळे ते वैद्य म्हणून सर्वांना परिचित होते. पण कोणाच्या पैशाला शिवत नसत. मुक्या जनावरांना बरे करणे, त्यांच्या आजारातून मरणप्राय दुःखातून चांगले करणे हेच त्यांच्या 'पांढरी'चे काम, म्हणजे त्यांच्या ग्रामदेवतेचे काम ते करीत होते.

अशा सेवाभावी श्रीपतरावांचे एकदा परीक्षा झाली. उन्हाळ्याचे दिवस होते. मरणाची उष्णता सूर्यदेव जमिनीवर फेकीत होता. आणि गावात पायलाग गुरांच्या आजाराची साथ भयानक पसरली. रानावनात फिरून श्रीपतराव

झाडपाल्याची औषधे वनस्पती घेऊन येत. त्यांच्या तोंडाला, पायाला औषध लावीत आणि गुरे बरी होत. रात्री रात्री त्यांना झोप नव्हती. हे सेवाभावी कामच श्रीपतरावांना कमालीचा आनंद देत होते. त्यांचे वडील राघोजीराव यांच्याकडून ते शिकले होते. पण एकदा त्यांच्या या कौशल्याची परीक्षा झाली.

काशीराम राव सरपंच यांच्या मुंबई पोलीस मध्ये काम करणाऱ्या भावाने काशीरामरावांचे सगळे लाड पुरवले. ते गावात राहून शेती करीत. त्यांच्या भावाने एक खिल्लारी घाटी बैलांची जोडी त्यांना दिली. काशीराम रावांची बैलगाडी होती. ते त्या काळात चिपळूणला गावातल्या वाण्याचा मालं आणायला जात. शिवाय सराय नंतर भात दळायला गिरणीवर भात घेऊन जात. हाच त्यांचा व्यवसाय होता. तेव्हाच पायलागची लागण गावातल्या गुरांना झाली होती. बैल चिपळूणला जात, गावातल्या बैलगाडीच्या रस्त्याने जात आणि त्याच रस्त्याने रोगाची लागण झालेली गुरेही जात. त्याचा परिणाम असा झाला की त्या दोन्ही बैलांना पाय लागाची लागण झाली. एवढेच नाही त्यांच्या तोंडालाही त्या रोगाची लागण झाली. श्रीपतरावांना बोलावून औषधे चालू केली. पायाला लावले त्याचा औषधाने फरक पडला. बसून राहिलेले दोन्ही बैल उठून उभे राहू लागले. पण तोंडातून पडणाऱ्या फेस काही कमी होत नव्हता. त्या बैलांनी खाणे पिणे सोडले. धष्टपुष्ट बैलांची रया उतरली होती. श्रीपतराव त्या दोन्ही जनावरांसाठी कसले कसले काढे करून बाटलीने पाजीत होते. दिवसभर ते वाड्यात थांबत रात्री उशिरा घरी येत, पण झोप येत नव्हती. गावात जनावरे पटापट मरत होती. दुभत्या गाई म्हशीचे दूध काढणे बंद केले, कोणीतरी म्हणाले दूध पिणाऱ्याला हा रोग होईल. गावाची पुरी रयाच बदलली होती. पाय

a

लागाची माहिती ग्रामपंचायतने पंचायत समितीत दिली आणि डॉक्टरांची टीमच गावात येऊन दाखल झाली. ते काशीराम रावांच्या बैलांना पाहून गेले, तेव्हा त्यांना माहिती पडलेली अनेक जनावरे श्रीपतरावांच्या औषधाने बरी झाली. ते त्यांना भेटून गेले. अनेक गुरांचे दुखणे श्रीपतरावांच्या काढ्याने बरे झाले होते. त्या डॉक्टरांनी त्यांच्या औषधाची माहिती घेतली आणि ते निघून गेले. श्रीपतराव काशीराम रावांच्या दोन्ही बैलांवर उपचार न थांबता चालू ठेवले. ते आता उभे राहायला लागले होते. पण खाण्यात फारशी प्रगती नव्हती. पंधरा दिवस औषधे चालू होती. उतारा पडत नव्हता. शेवटी त्यांनी जंगलात जाऊन कसली तरी पत्री आणली. काढा केला आणि दोन दिवस बैलांना पाजला आणि बैल खाण्याला तोंड लावू लागले. श्रीपतरावांना आनंद झाला. मग चार-पाच दिवस तेच औषध चालू ठेवले आणि बैल हिंडू फिरू लागले. काशीराम रावांना तर हा मनातला आनंद रोकता आला नाही. त्यांनी श्रीपतरावांना मिठीत मारली. आणि नोटांचे पुडके त्यांच्या हातात ठेवले, पण श्रीपतरावांनी त्याला हात लावला नाही. आपल्या कष्टाचे चीज झाले याचा त्यांना अभिमान होता. त्यांनी गावात पंचक्रोशीत जाऊन अशी जनावरे शोधून काढली आणि उपाय करून त्यांना जीवनदान दिले. ग्रामपंचायतीने त्यांचा सत्कार केला. ह्या बातम्या तालुक्याला पोहोचल्या. त्यांनी श्रीपतरावांना तालुक्याला बोलावून त्यांचा सत्कार केला. हा माझ्या सेवाभावाचा सत्कार आहे माझा नाही असे ते म्हणाले. त्या सत्काराचे फोटो पेपर मध्ये आले. पुन्हा त्या गावात पायलाग आला नाही. समूळ नष्ट झाला. त्यांनी या यशाचे श्रेय त्यांच्या गावच्या पांढरीला दिले. तिच्या कृपेचा हा प्रताप होता. ती गावाची राखणदार होती म्हणून.

श्रीपतरावांनी आपल्या या आयुर्वेदिक औषधाची माहिती नव्या पिढीच्या अनेक तरुणांना दिली. पुढे कधी हे पाहायला, कधी संकट आले तर ही नव्या दमाची फलटण तयार होती. आणि त्या तरुणांना ते म्हणाले पैसा नाही घ्यायचा कोणाकडून नाहीतर उपाय पडणार नाही ध्यानात ठेवा, ही सेवा जीवनदान आहे हे ध्यानात ठेवा. आजही 70 वर्षानंतर गाव श्रीपतरावांना विसरला नाही. त्यांच्या जीवनदानाला आणि ती मुकी जनावरे. त्यांना आशिर्वाद देत होती. त्यांच्या मुक्या जनावरांना जिवनदानाच्या या सेवाभावी कार्यात. म्हणूनच गरीबीतही त्यांचा संसार सुखात होता. ही त्या पांढरीची कृपा खरे की नाही !! |||||

# स्वप्नपूर्तीची यशोगाथा

नमिता 10 वी ची परीक्षा पहिल्या वर्गात पास झाली. जवळपास कॉलेजमध्ये जाण्याची व्यवस्था नव्हती. 30-40 किलोमीटरवर आठले कॉलेजमध्ये दररोज जायचे म्हणजे खर्च. तो तिच्या शेतकरी वडिलांना परवडणारा नव्हता. त्या साधना हायस्कूलचे हेडमास्तर सुर्वे सर यांनी मुलांना शिक्षणाची रोजगाराची दिशा ठरवणारे एक सेमिनार त्यांचे मित्र डॉक्टर नानिवडेकर यांचे व्याख्यान नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच जे विद्यार्थी यावर्षी दहावी झाले त्यांच्यासाठी ठेवले होते. व दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार डॉक्टर नानिवडेकर यांच्या हस्ते करण्याचे योजले होते.

नमू म्हणजे आमची नमिता. त्या शाळेतून 80 टक्के मार्क मिळवून पास झाली होती, ग्रामीण भागातल्या या हुशार विद्यार्थ्यांसाठी वेगळे दुपारचे सत्र ठेवले होते. एवढे मार्क मिळूनही पुढे शिक्षण घेणे तिला शक्य नव्हते ही तिची व्यथा होती.

डॉ. नानिवडेकर यांनी सकाळच्या सत्रातील व्याख्यान संपवून दुपारच्या सत्रासाठी ते हजर होते. नमुने सकाळचे सत्र अटेंड केले. व दुपारच्या सत्रात ती आली होती. सुर्वे सरांचे प्रास्ताविक झाल्यावर डॉक्टर नानिवडेकर यांनी दुपारच्या सत्रात मुलांना भविष्यात आपले जीवन, जीवनमान वाढावे यासाठी व्यवसाय कोणकोणते करावे, त्यांची व्यवस्था कोठे कोठे आहे याची पूर्ण माहिती मुलांना दिली. अगदी कारपेंटरी, घराचे बांधकाम, याशिवाय इतर छोटे

a

मोठे व्यवसाय गावातल्या गावात कोणकोणते करण्यासारखे आहेत याची पूर्ण माहिती मुलांना दिली शिवाय आयटीआय मध्ये कोणकोणते व्यवसाय शिकता येतात याची माहिती दिली. त्यांनी खास करून मुलींना कोणकोणते व्यवसाय करून गावातल्या गावात रोजगार निर्मिती होऊ शकते. आपली आर्थिक लाभाची दिशा देणारे विशेष सत्रात  मुलींना शिवणकाम भरत काम सहज छोटे-मोठे व्यवसाय कोणकोणते करता येऊ शकतात याचीही माहिती दिली.

या कार्यक्रमाला गावातील अनेक प्रतिष्ठित सदस्य ही हजर होते. त्यांनी तर गावात जुनियर कॉलेज काढता येईल एवढी मुले असताना मुलांची होणारी ससेहोलपट थांबवण्यासाठी एक योजना बनवण्याची सूचना सुर्वे सरांना केली. निदान आर्ट्स कॉमर्स चे अकरावी व बारावीचे वर्ग सध्या चालू करावे यासाठी सरकारकडे पत्रव्यवहार करावा व त्यासाठी साठे कॉलेजचे प्रिन्सिपल डॉक्टर नानिवडेकर यांनाच गळ घातली. ते म्हणाले आम्ही आमच्या कॉलेजच्या परवान्यात येथेच एक वेगळी शाखा उघडण्याचे ठरवून तशी पत्रे साधना हायस्कूलला दिले व त्यांनी रमाकांत मोरे यांच्या नावाने दुसरा ट्रस्ट स्थापन करण्याचे ठरविले पण सायन्सचे वर्ग सध्या चालू करता येणार नव्हते. कारण त्यासाठी शिक्षित स्टाफ, लॅब नसल्याने पुढील दोन वर्षात ही व्यवस्था करण्याचे आश्वासन डॉक्टर नानिवडेकर यांनी दिले. या योजनेसाठी अनेक सधन व्यक्तींनी देणग्या जाहीर केल्या.

पण नमुला सायन्सला जायचे होते. तिच्या डोक्यात अनंत कल्पना होत्या. तिला खूप खूप शिकायचे होते. इंजिनीयर व्हायचे होते पण हे कसे शक्य

आहे. यामुळे ती अस्वस्थ होती. ते सत्र संपल्यावर नमुने डॉक्टर नानिवडेकर यांनाच गाठायचे ठरविले.

याच सत्रात यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कारही डॉक्टर नानिवडेकर सरांच्या हस्ते करण्यात आले. नमुचा सत्कार करताना तिला तिचे मनोगत मांडण्यास सांगितले तिने डॉक्टर नानिवडेकर यांना सांगितले मला सायन्सला जायचे आहे व पुढे इंजिनियर व्हायचे आहे. पण माझी व्यवस्था कशी होणार? आम्ही गरीब शेतकऱ्यांची मुले. कॉलेजचा खर्च, होस्टेलचा खर्च कसा परवडणार. ती म्हणाली...

"सर मला तुमच्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा आहे, काही मदत करू शकता का?" नमू

डॉ. नानिवडेकर सरांनी तिची विनंती मान्य केली. तिची फी होस्टेलचा खर्च स्वतः करण्याचे जाहीर केले. त्यावेळी गावचे एक सदन गृहस्थ ॲडव्होकेट यशवंतराव यांनी हे काम तुम्ही आमच्यावर सोपावली, ती आमच्या गावातील हुशार विद्यार्थिनी आहे आणि तिचे भवितव्य घडवण्याचे कार्य आम्ही स्वीकारतो असे सांगितले. नमूचा प्रश्न सुटला होता. तिच्या अशा आकांक्षाची जबाबदारी गावाने घेतली. खूप चांगले काम गाव आपल्या अंगावर घेतो याचे स्वागत झाले. डॉ. नानिवडेकर यांच्या या योजनेतून चार विद्यार्थ्यांचा फायदा झाला. हे चांगले काम झाल्याने गावातील लोकांनी सुर्वे सरांचेही आभार मानले, तसेच डॉ. नानिवडेकर यांचेही आभार मानले. आज खूप काही विद्यार्थ्यांना शिकता आले.

नमुने डॉ. नानिवडेकर यांच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला व हॉस्टेलमध्ये राहून तिने बारावीला चांगले मार्क मिळवले. शिवाय इंजिनिअरिंगच्या ऍडमिशन साठी लागणारे मार्क स्पर्धा परीक्षेतही मिळवले.

प्रश्न होता पुढचे शिक्षण कसे घ्यायचे याचा. स्थानिक आमदार निकम यांनी ती जबाबदारी स्वीकारली त्यासाठी गावाचे एक शिष्ट मंडळ त्यांना भेटले. आता बी ई होण्याचा नमुचा मार्ग मोकळा झाला होता.


खरे तर तो गाव (टेरव) माजी सैनिकांचा. तेव्हा लहानपणापासून नमुला ही वाटत होते की आपण मिलिटरी वा एअर फोर्स मध्ये जावे. अधिकारी व्हावे आणि देशाची सेवा करावी. आजवर कोणीही डायरेक्ट कॅप्टन झाला नव्हता. तिची ती इच्छा आता नक्कीच पूर्ण होणार असे तिचे मन सांगत होते. त्यासाठी तिला एनडीएला जायचे होते. बी.ई. झाल्यावर तिने एनडीए मध्ये प्रवेश घेतला व दोन वर्षाचा अभ्यासक्रम पुरा करून कॅप्टन हे कमिशन तिने मिळविले. त्यासाठी तिने एअर फोर्स मध्ये जाऊन विमान चालवण्याचा कोर्स पुरा केला. खडकवासल्याला तिची पोस्टिंग झाली.


कमिशन मिळाल्यावर नमू आपल्या गावाला आली. टेरव गावच्या माजी सैनिकांच्या संस्थेने तिचा भव्य सत्कार केला. गावातील स्त्री पुरुष झाडून या सत्काराला हजर होते. नमुने आपला पहिला पगार त्या संस्थेला दिला. तीच संस्था तिची स्फूर्तीदायी होती कारण तिचे वडीलही दुसऱ्या महायुद्धात लढाईवर होते. एका मुलीने मुलीच्या जन्माला येऊन गावाचे वडीलांचे पांग फेडले. जीवनाचे सार्थक झाले.


आज हा सत्कार तिच्या स्वप्नपूर्तीचा गौरव होता. नाहीं का? !!


ॲड. यशवंत कदम यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके.


कव्हरवर क्लिक करताच उघडतील.




**ई साहित्य प्रतिष्ठान सोळा वर्षांचे होत आहे.**

**ॲड. यशवंत कदम यांचे हे ई साहित्यवरील सातवे पुस्तक.**

ॲड. यशवंत कदम हे इन्कमटॅक्स कमिशनर व शिक्षणाने वकील. या दोन्हीही व्यवसायांत त्यांना असंख्य मानव प्रवृत्ती पहायला मिळाल्या. इन्कम टॅक्स मधे लोक पैसे कमावतात पण यांनी अनुभव आणि मैत्री कमावली. अध्यात्मिक वृत्तीचे श्री. कदम आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य आपल्या वाडवडलांच्या गावी ईश्वरसेवा आणि साहित्यसेवेसाठी व्यतीत करत आहेत. त्यांची आजवर सुमारे तीस पुस्तके विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत. त्यांच्या कथा व कादंबऱ्यांतून मानवी आयुष्यातील व्यावहारिक व अध्यात्मिक मूल्यांचा बोध होतो. त्यांच्या कथा विविध दिवाळी अंकांतून व नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा मनुष्य संग्रह व वाचक संग्रह फार मोठा आहे.

ॲड. यशवंत कदम यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५),

a

अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(७), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस(२), मिलिंद कपाळे, श्रीराम काळे (२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

a

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।



लेखक

## ॲड. यशवंत बाबुराव कदम

(नमनेश्वर)

ॲड यशवंत कदम लिखित 'चांदण्यांचा पाऊस' या कथासंग्रहात उत्तम संवाद आहेत. गावात घडणाऱ्या घटना, गावातील माणसांची मानसिकता, नैतिकता–अनैतिकता, आर्थिक व्यवहार, तडजोड, शिक्षणाचे महत्त्व, अवयवदानाचे महत्त्व, राजकारण –समाजकारण– कौटुंबिक कलह याचा माणसाच्या मनावर होणारा परिणाम, आजच्या काळातील माणसाचे तुटलेपण या सर्वांचा उहापोह या कथांमधून केला आहे.

प्रादेशिक संस्कृतीची बीजे अचूकपणे अधोरेखित करून 'परिवर्तन हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे' त्याला स्वीकारण्याचा अप्रत्यक्ष संदेश या कथांमधून आपल्याला लेखकाने दिला आहे.कथा जितक्या मनोरंजक आहेत तितक्याच वैचारिक प्रगल्भतेकडे नेणाऱ्या आहेत म्हणूनच सुज्ञ रसिक वाचक 'चांदण्यांचा पाऊस' या कथासंग्रहाचे स्वागत करतील!

– प्रा. प्रतिभा सराफ

(ज्येष्ठ साहित्यिक)